
आशय

के. जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय

# मराठी विभाग

# आशय (२०१८-१९)

दुसऱ्या सत्रातील अंक

हस्ते

डॉ. समृध्दी म्हात्रे
डॉ. सुधा व्यास

२७ फेब्रुवारी २०१९

# विद्यार्थी संपादक

गौरी पाताडे
पूनम पाताडे
तुषार आमने
वर्षा चांदणे
हेमांगी महामुनी
रसिका येरम
अस्मिना सावंत
कविना गाडगे
निनेश शिंदे

मुखपृष्ठ
– दिव्या चुनावाला

आशयस्था या उपक्रमात आम्ही सुधीर फडके. जन्म २५ जुलै १९१९ यांनी अनेक मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीवर राज्य केल. ५० वर्षे मराठी व हिंदी चित्रपटसृष्टी गाजवली. बाबूजींनी संगीतकार म्हणून एकूण १११ चित्रपटांना संगीतबद्ध केल. या पैकी २१ चित्रपट हिंदी भाषेतील आहेत. या संगीतप्रवासात बाबूजींनी अनेक पुरस्कार प्राप्त केले.

त्याचबरोबर ग.दि. माडगुळकर यांनी अनेक प्रकारची संगीतबद्ध केलेली गाणी याची ही नोंद आम्ही या प्रकरणात केली आहे. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १९१९ त्यांना 'महाराष्ट्राचे वाल्मिकी' असे म्हटले जाते. त्यांनी लिहलेले गीतरामायण आजही लोकांच्या ओठांवर आहे. तसेच राम गणेश गडकरी जन्म २६ मे १८८५ 'एकच प्याला' प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, भावबंधन अशा नाटकांची निर्मिती केली व ते ही कवी, नाटककार, विनोदी लेखक, अशी ओळख आहे. व त्याचबरोबर गोविंदाग्रज या टोपणनावाने त्यांनी १५० कवितांचा लिखाण केल.

वासुदेव (स्नेहल) भाटकर. यांनी संगीतकार म्हणून कामगिरी केली. सुप्रसिद्ध अभिनेते रमेश भाटकर याचे ते वडिल मराठी सोबतच हिंदी चित्रपटांनाही त्यांनी संगीत दिले.

संदर्भ 1) सुधीर फडके यांचे पुस्तक २) जगाच्या पाठीवर पुस्तक ३) वृत्तीय कागदे ४) आंतरजालावरील माहिती.

अशा प्रकारे हा उपक्रम आम्ही पूर्णत्वाला आणला. व २७ फेब्रुवारी २०१९ रोजी थोर कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी म्हणजेच मराठी भाषा दिना दिवशी कार्यक्रमात आशयाचे प्रकाशन केले. या उपक्रमामुळे किंवा या अंकाचे संपादन कसे करावे. तसेच संदर्भ कसे शोधावे. याचा अनुभव आम्हाला मिळाला. त्यापुढे कार्यकारिणी, संशोधन, अशा अनेक क्षेत्रांमध्ये आम्हाला उपयोग होऊ शकतो.

२४ वर्षापासून चालत आलेली आमची आशयची परंपरा आम्ही आत्तापर्यंत उत्तम पद्धतीने पार पाडत आलो. आशयच्या उपक्रमामध्ये आम्ही उत्तम साहित्यिक, संगीतकार. समाजसेवक अशा थोर व महान व्यक्तींच्या अभिमानास्पद वाटणाऱ्या गोष्टींचा उत्तम पद्धतीने समावेश करून घेतला यामध्ये बाबा आमटे. कविता कट्टा (शिक्षकांच्या कवितांचा संग्रह, प्रा डॉ नागनाथ कोत्तापल्ले, महाराष्ट्राची लोकधारा, कवी मंगेश पाडगावकर. यासारख्या महान व्यक्तींचा परिचय आशयाच्या उपक्रमात करून घेतला आहे. व अशा अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तींवर आम्ही दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी आशयचा उपक्रम केला. याची संपूर्ण तयारी मराठी विभागाच्या प्रमुख व आमच्या शिक्षिका डॉ वीणा सानेकर यांनीच २४ वर्षापासून चालवत आणलेली परंपरा आम्ही याही वर्षी पूर्णत्वाला आणली. याचा आम्हाला प्रचंड अभिमान वाटतो. तसेच याही वर्षी आम्ही आशयाचा कारभार यांच्या सहाय्याने पार पाडला.

त्याचबरोबर यावर्षीच्या आशयाच्या उपक्रमात आम्ही महान कवी गजानन दिगंबर माडगूळकर (गदिमा), सुधीर विनायक फडके (बाबूजी), वासुदेव (स्नेहल) भाटकर, या महान व्यक्तींच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त आशय तयार केला. त्याचबरोबर सुप्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरी (गोविंदाग्रज) यांच्या स्मृतीशताब्दीचाही आम्ही आशयाच्या उपक्रमात सहभाग करून घेतला. आशयाचा उपक्रम करताना आमच्या ज्ञानात जास्तीची भर पडली. आम्ही हा उपक्रम करताना सुधीर फडके, ग. दि. माडगूळकर, राम गणेश गडकरी यांच्या पुस्तकातील लेखांचा समावेश आशयात करून घेतला. त्याचबरोबर आशयाच्या उपक्रमाच्या निमित्ताने आम्हाला आमच्या थोर व महान संगीतकारांशी ओळख होऊन आली. यामध्ये सुप्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' नाटकाचा ही समावेश आहे.

सुधीर विनायक फडके.

गजानन दिगंबर माडगुळकर.

राम गणेश गडकरी.

(स्नेहल) वासुदेव भाटकर.

# अनुक्रमाणिका


१. नाजहरातून दिसणारे सुधीर फडके.

२. पंधराव्या वर्षीच नामकरण

३. सुधीर फडके नावाचं गाणं

४. प्रतिभेचा उत्फुल्ल मळा

५ सुधीर फडके म्हणत...

६ दूर रे किनारा...

७ आशा निराशेचा खेळ

८ चित्रपट सृष्टीतलं फडके युग

९ पुस्तकांच्या चोरीचा आळ

१० काही आठवणी / ललिता फडके.

११ मुंबईतले पहिले रामायण

१२ रामाचीकृपा

१३ असाही मांसाहार

१४ गदिमा मराठी संस्कृतीचा सारांश

१५ वामनाचा पत्रा / ग. दि. माडगूळकर.

१६ शतकोत्तरी शोकांतिका / राम गणेश गडकरी.

१७ महाराष्ट्राचे वाल्मिकी: ग. दि. माडगुळकर.

१८ पहिली रेकॉर्ड झाली. (सुधीर फडके)

१९ सुधीर फडके: व्रतस्थ स्वरयात्री

२० भाइयापोटी वादरा गहाण! (सुधीर फडके)

२१ सुधीर फडके नावाचं गाणं

२२ शतकोत्तरी शोकांतिका (राम गणेश गडकरी)

२३ 'एकच प्याला'... शंभर वर्षांचा!

२४ गणदेवी - राम गणेश गडकरी यांचे जन्मगाव

२५ गजानन दिगंबर माडगुळकर
मराठी साहित्य व चित्रपट सृष्टीतील अलौकिक प्रतिभा

२६ आठवणीतले 'स्नेहल' स्वर

जन्म नाव - राम गणेश गडकरी.

टोपणनाव - गोविंदाग्रज , बाळकराम
सवाई नाटकी

जन्म - २६ मे १८८५ गणदेवी ,
जि. नवसारी गुजराथ

राष्ट्रीयत्व - भारतीय

कार्यक्षेत्र - नाटककार , कवी , लेखक

भाषा - मराठी

साहित्य प्रकार - कविता , नाटके , विनोदी कथा

प्रसिद्ध साहित्यकृती (नाटके)
'एकच प्याला', प्रेमसंन्यास
पुण्यप्रभाव , भावबंधन

वडिल - गणेश वासुदेव गडकरी

पत्नी - प्रथम - सीताबाई गडकरी.
द्वितीय - रमाबाई गडकरी.

गडकरी महाराष्ट्राचे शेक्सपीयर समजले जात.

नाटकांची वैशिष्टे नाटकांची नावे पाच अक्षरी
गोविंदाग्रज या टोपणनावानं १५० कवितांच
लिखाण.

मृत्यू - २३ जानेवारी १९१९
सावनेरी, जि नागपूर

नाव - गजानन दिगंबर माडगुळकर.

जन्म - १ ऑक्टोबर - १९१९

सांगली जिल्ह्यातील, आटपाडी तालुक्यातील

माडगुळे या गावी

टोपण नाव - गदिमा

कामाचे स्वरूप - कवी, लेखक, कलावंत, भाष्यकार

नागरिकत्व - भारतीय

मातृभाषा - मराठी

विषय - विविध

बहुतांश लेखन - मराठी भाषेत

जगप्रसिद्ध लेखन - गीतरामायण

मृत्यू - १४ डिसेंबर - १९७७ (५८ व्या वर्षी)

पत्नी - सौ विद्या गजानन माडगुळकर.

अपत्ये - कल्पलता, श्रीधर, शरतकुमार, दीपा,

शुभदा.

## प्राप्त मानसन्मान :

- संगित नाटक अकादमी सन्मान (१९५७)
- "मॉडर्न वाल्मिकी" सन्मान गीतरामायणाकरीता

## विशेष :

- गदिमांची गीते सुगम संगीत, भाव गीते, भक्ती गीते व लावणी अशा विविध संगीत प्रकारात मोडतात.
- गदिमांनी चित्रपट सृष्टीत १९३८ साली कोल्हापुरातून पदार्पण केले. एकूण १५७ मराठी व २३ हिंदी चित्रपटांत गदिमांनी त्यांचे योगदान दिले आहे.
- गदिमांना मुकंदर दहा भाषा अवगत आहेत:
मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, बंगाली, गुजराथी, पंजाबी, कन्नड, तमिळ, तेलगू. इत्यादी
- गदिमा हे प्रसिद्ध कवी व लेखक व्यंकटेश माडगूळकर यांचे थोरले बंधू.

सुधीर फडके - सुधीर विनायक फडके.

जन्म - २५ जुलै १९१९ कोल्हापूर, महाराष्ट्र

मृत्यू - २९ जुलै २००२ मुंबई . महाराष्ट्र

मृत्यू

५० वर्षे मराठी चित्रपट सृष्टीवर राज्य केले.

संगीतकार म्हणून बाबूजी एकूण १११ चित्रपटांना संगीतबद्ध केले. त्यापैकी २१ चित्रपट हे हिंदी भाषेतील आहे.

बाबूजींना प्राप्त पुरस्कार

राष्ट्रपती पदक (१९६३) हा माझा मार्ग एकला चित्रपटासाठी

सह्याद्री स्वररत्न पुरस्कार - (२००२)

दिनानाथ मंगेशकर पुरस्कार - (१९९८)

लता मंगेशकर पुरस्कार - (२००१)

अल्फा जीवन गौरव पुरस्कार - (२००१)

# माजघरातून दिसणारे सुधीर फडके

वयाला फारसे महत्व नाही. महत्व आहे ते एका अतिशय कष्टप्रद, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून साकारलेल्या अष्टपैलू जीवनाला! श्री. सुधीर फडके यांनी २५ जुलै ९३ ला वयाची ७४ वर्षे पूर्ण करून ७५ व्या वर्षात पदार्पण केले. दिवस कधी संपले ते कळलेच नाही.

सुधीर स्वतः मिळून पाच भावंडे. यांचा नंबर तिसरा. वयाच्या दहाव्या वर्षीच मातृछत्र हरपलं. आईच्या मायेची चौघडी फार दिवस पांघरायला मिळाली नाही. वडील एकाकी पडले. खचले. पाच मुलांचा सांभाळ करायचा. सगळ्याच गोष्टींची भ्रांत. त्यातच वयाच्या सोळाव्या वर्षी पितृछत्रही हरपलं. 'रम्य ते बालपण' याला वंचित व्हावं लागलं. सगळी भावंडं कुठे, कशीतरी वाढू लागली. कोण कुणाची वास्तपुस्त करणार. धड शिक्षणाशी गाठ नाही, पण लहानपणापासून सुधीरने मनात एका कप्प्यात कुठेतरी संगीताच्या सुरांचे अंकुर जोपासले होते. एखादा भिकारी जरी सुरेल आवाजात गाणं म्हणताना दिसला, तरी ते सूर कानात शिरत. परिस्थितीमुळे वृत्ती कामसू झाली. थोडं गात येऊ लागलं. म्हणून त्याने डॉ. भाजेकरांचं लक्ष वेधलं. ते स्वतः त्याला आपल्याकडे घेऊन गेले. पण दुर्दैव तिथेही आड आलं. डॉ. भाजेकरांचा मृत्यू झाला. पुन्हा सुधीरवर 'ये रे माझ्या मागल्या' प्रसंग आला. भावंडं हळूहळू मोठी होत होती. सर्वांवरच 'उद्धवा अजब तुझे सरकार' म्हणायची पाळी आली होती.

काही दिवसांनंतर सुधीरला कोल्हापूरला श्री वामनराव पाध्ये यांच्याकडे संगीताचा श्रीगणेशा शिकायला मिळाला. तेवढंच भांडवल! बाकी सगळं स्वतःच स्वतः गुरू व शिष्य. थोडसं गायला लागले, चार पैसे मिळवायचा प्रयत्न सुरू झाला. कधी मित्राबरोबर, तरी कधी कुठे एकलसंगी फुटपाथसुद्धा आसरा द्यावा लागला. आपलं प्रेमाचं

कुणी नाही. आजचा दिवस गेला, उद्याचा कसा जाईल, या हेतूने वऱ्हाडकडे दौरा सुरू केला. केव्हा केव्हा आयुष्य संपवून टाकावं. इतपत मनाची धारणा व्हायची. पण नाही! शेवटी पुढे सगळं वेगळंच घडायचं होतं. भविष्यकाळ अज्ञात असतो. तो उज्ज्वल होता. ४० साली भटकंती सुरू केल्यावर वणीला लहानशा गावात माझ्या माहेरी रा. तात्याजी वाटवे यांच्याकडे काही दिवस. त्यांच्या मुक्काम झाला. हीच आमची पहिली ओळख ओळखीतून एक जवळीक व आत्मीयता निर्माण झाली तेव्हापासूनच एक बहीणभावाचं निर्व्याज नातं निर्माण झालं. आजही त्याची जपणूक केली जाते.

त्या भागात काहीसे कार्यक्रम मिळाले. आशेचे किरण निर्माण झाले. तिथून मोर्चा पुन्हा पुण्याकडे. भविष्याचे वेध होत पुढील आयुष्याला सुरुवात. पुण्याला पुण्याच्या अडचणीच्या काळात स्वतःची गाणं विकणी लागली व पकून जावं लागलं.

पुढे काही दिवसांनी प्रभातमध्ये नोकरी मिळाली. ती सोडून स्वतंत्ररीत्या संगीत दिग्दर्शित करायला सुरुवात केली. बाप्पांच्या ओघात बालगंधर्वांचा विषय निघाला, तेव्हा त्यांनी सांगितल की, मी दिग्दर्शित केलेल्या 'विठ्ठल रखुमाई' या चित्रपटात गंधर्वांना काम करायची विनंती केली. ते त्यांचं पहिलं चित्रपटातलं संगीत दिग्दर्शन! नंतर अनेक चित्रपट केले. कवी ग. दि. माडगूळकर व सुधीर फडके संगीत दिग्दर्शक, गायक! हे समीकरणच होऊन बसलं!

४९ साली विवाहाचा योग आला. तोही मोठ्या मजेशीरपणे. योग यावे लागतात. प्रसिद्ध गायक गजानन वाटवे यांनी एक ऑपेरा बसवला. गायिका त्यावेळच्या प्रसिद्ध गायिका ललिता देऊळकर होत्या आणि फडक्यांचं दिग्दर्शन. त्यावेळेला ललिताच्या आईच्या मनांत आलं की, आपण ललितासाठी विवाहाचा प्रस्ताव सुधीरजवळ मांडावा.

तो त्यांनी त्यांच्या वहिनीजवळ बोलून दाखवला. नंदिनीच्या ललिताशी एक-दोनदा संबंध आल्यावर त्यांनाही तो विचार पसंत पडला, म्हणून वहिनींनी आपल्या भावजींना विचारलं, 'लग्न करता का?' तसे सुधीर म्हणाले, "वहिनी माझ्यासारख्याला कोण मुलगी देणार?" वहिनींनी सांगितलं "अहो, आपली ललिता आहे." तसे ते म्हणाले "वहिनी ती लायक आहे. माझं तिचं कसं जमणार?" वहिनी म्हणाल्या "भावजी, मला खात्री आहे, ललिता आपल्या घरी आली की, सर्व व्यवस्थित होईल." परिस्थितीमुळे ललिताही थोड्याशा लायक झाल्या होत्या आणि सर्व संमतीनं ठरलं. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे एक फुलाची वेणी, एक कापडं, पेढ्याचा पुडा देऊन विवाह ठरल्याचं शिक्कामोर्तब झालं. सौ. कडके होताना आमच्या ललितावहिनींनी एक विचार केला की आजच्या आधुनिक स्त्रियांप्रमाणे करिअर सांभाळायचं की संसार करायचा? अर्थात पारडं संसाराकडे झुकलं आणि त्यांनी आपलं करिअर गुंडाळत आणलं.

श्रीधरच्या जन्मानंतर ५५ सालापासून मुंबईत वास्तव्य. त्याचवेळी श्री. माडगूळकर लिखित गीत-रामायणाचा जन्म झाला म्हटलं, तरी चालेल. त्याबद्दल जास्त लिहिण्याची गरज नाही. तेव्हापासून ते सर्व आबालवृद्धांना प्रिय झालेत.

एक मानसभगिनी या नात्याने त्यांच्या ८५व्या वाढदिवसाला माझ्या शुभेच्छा! चांगलं आरोग्य व दिर्घायुष्य प्राप्त होवो, ही परमेश्वर-जवळ प्रार्थना!!!

# पंधराव्या वर्षीचं नामकरण

श्री रामचंद्र विनायक फडके.
आता सुधीर फडके या नावानं ओळखला जाणार.
आमच्या घराण्याचा आईकडून किंवा वडिलांकडून संगीताशी कधीच संबंध आला नव्हता. तशी माझ्या वडिलांना गाण्याची बरीच आवड होती. व्यवसायानं वकिली असूनही त्या काळच्या अनेक नामवंत गवयांच्या ध्वनिमुद्रिका त्यांनी जमविल्या होत्या. रहिमत खाँच्या बांगडीच्या रेकॉर्डसही आमच्या घरी होत्या. कोल्हापुरातील पहिल्याकाही फोनोग्राफ्सपैकी एक आमच्या वडिलांनी घेतला होता. त्या काळातले मोठमोठे नट आणि मालक आमच्या घरी येत असत.
वडिलांना माणसं जमवायची खूप हौस होती. वकिलीही चांगली चालत होती कोल्हापूरसारख्या संस्थानातले कडक राजकीय निर्बंध सांभाळूनही त्यातल्या त्यात जमेल तितकं राजकीय आणि सामाजिक काम ते करीत असत, असं त्यांच्या काही समकालीनांनी सांगितलं आहे. राजकीय कारणामुळं व क्रांतिकार्यामुळं कडक आणि प्रदीर्घ शिक्षा भोगलेले काही राजबंदी त्याही काळात आमच्या घरी येत असतं 'शिवाजी क्लब' च्या क्रांतिकारक सभासदांनी वर्दळ आमच्या घरी सतत असे. गायक, नट, राजकारणी, समाजसुधारक असे नाना तऱ्हेचे लोक वडिलांच्याकडे येत, राहत. हाच वारसा मला वाटतं, माझ्यात उतरला आहे. पण गाणं माझ्यात कुठून आलं हे मात्र मला समजत नाही.
आमच्या पाच भावंडांपैकी माझ्याशिवाय कुणीच गाणं शिकायच्या भानगीत पडला नाही माझ्यासंबंधी माग असं सांगतात की, मी अगदी लहान म्हणजे दोन-अडीच वर्षांचा असल्यापासून घराबाहेर कोणी बैरागी, गोसावी, भिकारी गाणं म्हणू लागला की, त्याची हुबेहुब नक्कल करीत असे माझा गळाही चांगला होता.

माझे मोठे मामा डॉ. भा. वि. पटवर्धन जमखंडीला चीफ मेडिकल ऑफिसर होते. शास्त्रीय गाणं चांगलं समजतही असे. त्यांचे धाकटे भाऊ - माझे धाकटे मामा - मिरजेला वैद्य होते. त्यांचाही आवाज चांगला होता. या दोन्ही मामांचा आमच्या कुटुंबात फार मोठा आधार होता. पाध्येबुवा, विनायकबुवा नारायणराव व्यास, वझेबुवा, ओंकारनाथ, अब्दुल करीम खाँ सवाई गंधर्व, बालगंधर्व हे सगळे माझ्या मोठ्या मामाचे मित्र होते. जमखंडीला सरकार दरबारात यापैकी कुणाचंही गाणं ठरलं की, त्यानंतर त्यांची एक बैठक मामांच्या घरी बसत असे. अशा संगीतप्रेमी मामांनी आणि वडिलांनी माझ्यातला हा 'कुठून कुणास ठाऊक' आलेला गुण हेरून मला अगदी लहानपणापासून गाणं शिकायला पाठवायचं ठरलं.

कोल्हापूर हे कलेचं माहेरघर अनेक चांगले गवई तिथं होते. त्यापैकी एक गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये. अखिल भारतीय किर्तीचे श्रेष्ठ गायक. हिंदुस्थानात ठिकठिकाणी दरवर्षी होणाऱ्या मोठमोठ्या म्यूझिक कॉन्फरन्सना त्यांना आवर्जून निमंत्रण यायचं असलं 'प्रसिद्धी आणि पैसा' यांच्यापासून जाणूनबुजून दूर राहणारे तपस्वी ऋषी' असंच त्यांचं वर्णन करता येईल. पं. नारायणराव व्यास, पं. शंकरराव व्यास या त्यांच्या गुरुबंधूंनी 'वामनराव, मुंबईला या, खोऱ्यानं पैसा मिळवाल,' असा आग्रह अनेक वेळा करूनही कोल्हापूरकरांच्या भाग्यानं त्यांनी कोल्हापूरातच 'गंधर्व महाविद्यालय' स्थापून विद्यादानाचं पवित्र कार्य सुरू ठेवलं होतं.

FOR EDUCATIONAL USE

# * सुधीर फडके नावाचं गाणं *

सुधीर फडके नावाचं 'रसायन' कलावंत आणि माणूस ह्या दोन्ही दृष्टिकोनातून साकल्यानं समजून घेणं ही मुळात महाकठीण गोष्ट आहे. मग ते व्यक्तिमत्व शब्दात पकडू पाहणं ही गोष्ट तर दुरस्थ! तरीही आज तो खटाटोप करायचाच असं ठरवून लिहायला बसलो आहे.

एक गोष्ट निश्चित की, सुधीर फडके हे अनेक अर्थांनी एक चालतंबोलतं 'युग' च म्हणावं लागेल.

कलाक्षेत्रात स्वतःचं 'घराणं' निर्माण करणारा प्रतिभाशाली भावगायक, संगीतकार, रचयकवी व धाडसी चित्रपटनिर्माता, स्वतःचं प्रखर राष्ट्रीय तत्वज्ञान असलेला ज्वलंत सक्रीय देशभक्त आणि ह्या सर्वापलीकडे उत्कट गुणदोषांनी युक्त असलेला हाडामासाचा लखलखीत व धगधगीत माणूस ... हे सर्व स्वतंत्र संबोधनाचे आणि विवेचनाचे विषय आहेत.

अर्थात हे सारं खरं असलं तरी आपल्याला जवळचे आहेत ते गीतसंगीताशी नातं असलेले सुधीर फडके!

सुमारे १९४०-४५ पासून, म्हणजे उणंपुरं अर्ध शतक, त्यांची ही अद्भुत वाटचाल चालू आहे आणि तीही यशाची कमान सतत चढती ठेवत! आज ७५ वर्षाच्या वयालाही, प्रयोगशाली संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांची प्रज्ञा सतेज आहे आणि ५।१० हजारांच्या श्रोतृसमुदाय एकाजागी खिळवून ठेवण्याइतकी त्यांची गायनप्रतिभा सशक्त आहे.

संगीतकार म्हणून त्यांची प्रतिभा पोसली गेली ती ह्या काळात त्यांनी जोपासलेल्या श्रवणभक्तीतून! त्यांच्यामधला आजच्या भाषेतला 'परफॉर्मर' हळूहळू घडत गेला तो ह्याच काळातल्या त्यांच्या असंख्य बऱ्यावाईट मैफिलीतील अनुभवातुन आणि त्यांच्यामधला लढाऊ अशरण पिंड तावून सुलाखून निश्चित होत गेला आहे तो त्या काळातल्याच त्यांनी सोसलेल्या परिस्थितीच्या दारुण आणि दाहक चटक्यांतून!

मराठी चित्रपटांच्या आरंभापासून गोविंदराव टेंबे, मा. कृष्णराव, केशवराव भोळे यांसारखे विख्यात संगीतकार एकापाठोपाठ कार्यरत होते. त्यातले टेंबे थेट उपशास्त्रीय नाट्यसंगीताच्या वळणाचे. मा. कृष्णराव अधिक प्रसादिक, मधुर तर केशवराव भोळे कवितेच्या, भावगीताच्या अधिक जवळ जाणाऱ्या चाली बांधणारे आणि मुख्यतः चित्रपट माध्यमाची आणि साहित्याची खूप डोळस जाण असणारे!

सुधीर फडके हे ह्या सर्वांचं मर्म जाणणारे तरीही त्यांच्या काळाच्या दृष्टीनं खूप आधुनिक व ताजे होते. साहजिकच त्यांच्या आगमनानं मराठी चित्रपट संगीताचा प्रवाह मूळ तत्त्व हरवू न देता, पण जणू कात टाकावी तसा, नवीन झाला.

सुधीर फडक्यांच्या स्वररचनांमधल्या वैशिष्ट्यांचा विचार करू लागलं की अनेक गोष्टी नव्यानं जाणवू लागतात. एक म्हणजे त्यांच्या चालींमधला साधेपणा! 'प्रासादिकता' हा शब्दही जिथं अवघड आणि अवजड वाटेल इतका अपरंपार साधेपणा म्हणजे सर्व-सामान्य सोपेपणा नव्हे. त्यांच्या स्वररचनांमधून खेळणारी लयकारीची जाणीव ही त्यांची एक फार विलोभनीय गोष्ट आहे. कारण ही लयकारी मागच्या ठेक्यातून येणारी लयकारी नव्हे, तर ती बोलू लागते कवितेच्या शब्दांच्या भानातून... त्या शब्दांच्या, अर्थांच्या आणि वजनाच्या सूक्ष्म जाणिवेतून! त्यामुळं त्यांच्या चालींमध्ये स्वर 'शब्दांनो, मागुते या' म्हणत उद्दामपणे पुढं जात नाहीत तर स्वतः शब्दांचा मागोवा घेत मागुते जात राहतात.

पण तरीही ते केवळ शब्दाच्या अर्थाचं ओझं वाहणारे किंवा शब्दांच्या प्रकाशात चाचपडणारे नसतात. त्यांना त्यांचा स्वतःचा प्रकाश असतो आणि शब्दांतील अर्थही. 'लाखाची गोष्ट' मधलं सांग तू माझा होशील का' हे एकच गाणं अभ्यासलं तरी सुधीर फडक्यांच्या स्वररचनेतल्या अनलंकृत सहज सौंदर्याचा साक्षात्कार घडतो. 'सांग तू' ह्या शब्दांना जोडून येणारा उकारात्मक आलाप किंवा 'वसंतकाली वनी दिनान्ती' नंतर हलकीशी चटका लावून जाणारी चिमणी स्वरावली हे केवळ शब्दांना जोडणारे पूल नव्हेत, जगातल्या चिरंतन प्रेमभावनेचे ते कोवळे आविष्कार वाटू लागतात.

सामान्यपणे एखाद्या चित्रपटातलं एखादं सुरेल गाणं गाजलं तरी संबंधितांचे हात स्वर्गाला पोचतात. इथं पहावं तर चित्रपटातील एकरकमी सर्व गाणी गाजण्याचे अनेक विक्रम सुधीर फडक्यांनी वारंवार केले आहेत आणि स्वतःच ते मोडके आहेत. सीतास्वयंवर, मायाबाजार, पुढचं पाऊल, वंशाचा दिवा, लाखाची गोष्ट, जगाच्या पाठीवर, सुवासिनी... ही अधिक विचार न करता ओठावर येणारी नावं!

पूर्वसुरींच्या संस्कारांचा प्रभाव ही कुणाही कलाकाराबाबतीत अटळ गोष्ट असते. अभिजात कलाकारामध्ये ते संस्कार खूपदा वरच्या थरावर जाणवत नाहीत, पण ते त्याच्या आत खोलवर मुरलेले असतात आणि बाहेर व्यक्त होताना ते त्याचे होऊन प्रकट होतात. सुधीर फडके ह्याला अपवाद नाहीत. त्यांच्यामध्ये मुरलेली बालगंधर्व गायकी, विशेषतः त्यांचा आवडता भीमपलास, ते मांडू लागतात तेव्हा त्याहून नकळत त्यांचे आवडते बालगंधर्वही कुठे कुठे डोकावू लागतात. खास बालगंधर्वांसाठी बांधलेली त्यांची एक चाल 'शरण शरण नारायणा' नीट ऐकली तर मी काय म्हणतो ते नेमकं कळेल.

'हा माझा मार्ग एकला' हे गीत ऐकताना 'दुखके अब दिन बीतत नाही' गाणाऱ्या सैगलची एक धूसर छाया मागे साकार होऊ लागले. त्या गाण्याच्या म्युझिकल ट्रीटमेंटमध्ये आणि गायकेमध्येही! ती सैगलची नक्कल नक्कीच नव्हे, पण सुधीर फडक्यांना संगीतकार आणि गायक म्हणून जाणवलेल्या सैगल गायकीचा तो मराठी आविष्कार नक्कीच भासतो.

सुधीर फडक्यांची 'गायकी' हा पुन्हा एक स्वतंत्र विषय आहे. एरवी बऱ्याचदा बहुतेक संगीतकारांना त्यांच्या प्रतिभेनं कितीही अप्रतिम स्वररचना केली तरी ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी कुणातरी गळ्यावर अवलंबून रहावं लागतं. दिग्दर्शक-अभिनेता हा जसा दुर्मिळ भाग्ययोग, तसाच संगीत दिग्दर्शक-गायक हाही! सुधीर फडक्यांच्या कलाकार कुंडलीत तोही योग त्यांना लाभला. त्यामुळेच योजलेल्या गायक-गायिकेकडून आपली स्वररचना आपल्याला हवी तशीच गाऊन घेणं हे त्यांना आयुष्यभर शक्य झालं नाही. शिवाय ते स्वतः मराठीचे एकमेव पुरुष पार्श्वगायक म्हणून प्रदीर्घ काळ उभे राहिले ते वेगळेच!

कवी ग.दि. माडगूळकर आणि संगीतकार सुधीर फडके हे मराठी जाणकार रसिकांच्या अंतःकरणात त्यांच्या चित्रपटगीतांमुळं स्थिरावले होतेच, पण 'गीतरामायणा' नं सर्व घरातल्या सर्वसामान्य आबालवृद्धांच्या ते जणू एक अविभाज्य अंग बनून गेले. गीत-रामायणाचं काव्य हा जसा एक शोधप्रबंधाचा विषय आहे, त्याचप्रमाणं 'गीतरामायणा'चं संगीत हाही आस्वादाचा आणि अभ्यासाचा विषय आहे. भारतीय रागदारी संगीताची एक भक्कम बैठक सुधीर फडक्यांनी गीतरामायणाला दिली आहे. गीतरामायणातील काव्य स्वरबद्ध करणं ही एरवीची भावगीतं संगीतबद्ध करण्यापेक्षाही अधिक अवघड गोष्ट होती. गीतांच्या आकृतीबंधाला अपरिहार्यपणे पडणाऱ्या मर्यादा संगीत दिग्दर्शकाची कसोटी पाहणाऱ्या होत्या. १२/१४, १३/१३ अंतर असलेली आणि संस्कृतप्रचुर शब्द भरपूर प्रमाणात खेळविलेली ती गाणी अर्थवाही स्वरांच्या जोडणीनं प्रवाही आणि प्रभावी करणं ही नितांत अट होती. आणि हे सारं काही जणू आपसूक घडत गेलं. मराठी भावसंगीताच्या विश्वात एक इतिहास घडला.

पण तेवढ्या श्रेयावरच समाधान मानून निवांत जगतील तर ते फडके कसले? ... व्हायोलीनवादक सहकारी प्रभाकर जोग आणि तबलावादक अण्णा जोशी ह्यांना बरोबर घेऊन गीतरामायणाचे एका परीनं 'वन मॅन शो' त्यांनी सुरू केले आणि –

'झंकारल्या कंठवीणा
आले चांदण्याला सूर
भावमाधुर्याला आला
महाराष्ट्री महापूर

ह्या कविराजांच्या काव्यपंक्ति साक्षात खऱ्या केल्या.

शालेय वयापासूनच मी गायक-संगीतकार सुधीर फडक्यांचा आधी मनस्वी भाबडा आणि नंतर डोळस निःसीम चाहता, मग थोडासा त्यांचा एकलव्य कलाकार, पुढं जोडीनं कामाला बसणारा कवी-गीतकार आणि नंतर त्यांच्या घरचाच होऊन गेलेला सुहृद अशा विविध भूमिकांतून बाबूजींना मी पहात आलो आहे. गेल्या काही वर्षांत तर खूप जवळून! आणि त्यांच्या खूप सोप्या आणि खूप अवघड व्यक्तिमत्वाविषयी एक गूढ वाढतं आकर्षक जोपासत आलो आहे. त्यातही काही निरीक्षणं मोजक्या शब्दात मांडायची झाली तर ...

मराठी भावसंगीतात एक युग निर्माण करणाऱ्या या माणसाच्या आयुष्यात वरकरणी तरी संगीताला पहिलं प्राधान्य दिसत नाही.

कवितेच्या ओढीनं गीतं शोधत राहणं आणि तशाच अनामिक ओढीनं ती स्वांतः सुखाय स्वरबद्ध करणं ही घटना चुकूनही त्यांच्या दिनक्रमात पाहायला मिळत नाही.

व्यवसायाचा किंवा कामाचा भाग म्हणूनच ते संगीत दिग्दर्शनाकडे वळताना दिसतात.

त्यांची चाल लावण्याच्या बैठकीची प्रक्रियाही वरवर पाहता खूपशी कोरडी आणि यांत्रिक वाटते. त्यासाठी काही वेगळ्या एकांततेची, एकाग्रतेची त्यांना गरजही वाटत नाही.

त्यांच्या संघर्षमय आयुष्यातच संगीत - दिग्दर्शनाचं काम चालू राहिल्याने असं झालं असेल का?

आयुष्यातले संघर्ष हे नियतीनेच लिहिले असले तरी संघर्षमय परिस्थितीत स्वतःहून पुन्हा पुन्हा चालत जाणं हा ह्या माणसाच्या रक्तातल्याच ओढीचा भाग नसेल का?

चित्रपटनिर्मितीचे अंगावर घेतलेले प्रकल्प, दीवदमण मुक्तते-पासून मोहन रानडे सुटका आणि परवाच्या अयोध्येच्या राममंदिर सत्याग्रहापर्यंत त्यात जातीनं सहभागी होण्याचा अनावर अट्टाहास.

# प्रतिभेचा उत्फुल्ल मळा

सुधीर फडके.

माडगूळकर म्हणजे 'थोरली पाती'... ते देहानं थोरले होते. गीतकाव्याच्या परंपरेतही थोरलेच होते. आणि मराठी रसिकतेला थोर श्रीमंत करणारे होते! बऱ्याच वेळा विपुल लेखन आणि लोकप्रियता हा साहित्याच्या किंवा कलावंताचा दोषच मानला जातो. लोकप्रिय असणं म्हणजेच कमअस्सल असणं, सामान्य असणं गुणवत्तेनं कमी प्रतीचं असणं असं समजलं जातं हे बहुतांश वेळा खरंही असतं पण ज्यांच्या बाबतीत हा समज तपासून घ्यावा लागतो आणि दूरच ठेवावा लागतो. अशा पैकी होते गदिमा... आपली रुची समृद्ध करणारे होते ते.

गीत आणि कविता यांच्यामधलं अंतर पुसून टाकलं त्यांनी. आपल्या रसिकतेचा दर्जा वाढवत नेणाऱ्या अनंत संधी त्यांनी आपल्या काव्यातून निर्माण केल्या. आपल्याला पुस्तकं वाचायला आवडलं; आपल्याला गाणं ऐकायला म्हणायला आवडतं, कशामुळे आवडलं याचा शोध घ्यायला उत्सुक करणारी गीतं त्यांनी लिहिली. आस्वादाच्या वेगवेगळ्या पातळ्या शोधत, अर्थांचे वेगवेगळे धागे उकलत त्यांनी आपली अभिरुची आपण समृद्ध करायची असते. माणसामध्ये ती हळूहळू पिकत रसमधुर होत जावी लागते आणि अभिरुचीची योग्य त्या फळाला लागावी लागते. गदिमांच्या गीतांनी याची उत्कट जाणीव आपल्याला करून दिली आहे. उत्तम गीत ही एक उत्तम कविताच असते. याची जाणीव त्यांनी करून दिली.

त्यांनी कथा लिहल्या, नृत्यनाटिका लिहिल्या. नाटक लिहली. कादंबऱ्या लिहल्या. ललित लेखन केलं 'धरती' मासिकाचं संपादन केलं. मुलांसाठी लिहिलं 'रामजोशी' ते 'देवकीनंदन गोपाला' पर्यंत जवळजवळ ऐंशी मराठी चित्रपटांच्या कथा लिहिल्या. तेवीस हिंदी चित्रपटांच्या पटकथा लिहिल्या. शंभराहून अधिक चित्रपटांसाठी गाणी लिहिली.

मॅट्रिक परिक्षेचा उंबरठा न ओलांडणारा हा माणूस आपल्या प्रतिभाबळावर इतका मोठा झाला, की राष्ट्रीय संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळाला, विष्णुदास भावे सुवर्ण पदकाचा सन्मान मिळाला, ग्वाल्हेरच्या नाट्य संमेलनातं आणि यवतमाळच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मिळालं 'पद्मश्री' किताब मिळाला. इतरही अनेक शासकीय - अशासकीय पदांचे ते आणि गौरवांचे ते मानकरी होते.

गौरवाचं पद त्यांना मिळालं ते मराठी भावगीत परंपरेच्या सोपानावरून चढत जात मराठी हृदयातले रसिकांच्या हृदयातले अनभिषिक्त असे राजे झाले. केवळ अठ्ठावन्न वर्षाच्या आयुष्याचं ते फलित होतं.

माणसाचा आणि समाजाचाही वर्तमान जसा भविष्याशी तसाच भूतकाळाशी जोडलेला असतो. वर्तमानाच्या उभारणीसाठी त्या भूतकाळातल्या संचिताच्या कोणत्या विटा, कोणते दगड उपयोगी पडतील याचा विवेक जसा शहाणा माणूस करत असतो किंवा जाणता समाज करत असतो, तसा प्रगल्भ कलावंतही करत असतो. माडगूळकर हाडाचे कलावंत होते. संस्कृती परंपरामधलं पुष्कळ काही त्यांनी जाणले- आजणतेपणी वेचलेलं होतं. त्यांच्या काव्याच्या हाडीत त्याचा आपूक आणि देखणा वापर झाला.

त्यांनी आईकडून ओव्या, लोकगीतं, पुराणं, ऐकली होती. वाडच्या वयात उत्तमं कीर्तन प्रवचनं ऐकली होती. स्तोत्रं, पदं, लोकगीत ऐकली होती. उत्तमं वाचलं होतं आणि पाहिलेलं ही होतं. त्यांच्या अभिजात प्रतिभेला मौखिक आणि लिखित परंपरांची मोठी रसद होती. शिवाय संस्कृताची अभिज्ञता, अदद्वैची आणि भावगर्भ तत्वचिंतनांची सन्मुखता आणि भावगर्भ तत्वचिंतनाची सन्मुखता आणि भाषा म्हणून मराठीच्या स्वभाव- प्रकृतीची जाण त्यांना होती. बाजारूपणा आणि सवंगपणा यांचा स्पर्श नसलेला शृंगार त्यांच्या काव्यात शालीन हिराईनं त्यागाच्या आणि संग्रामाच्या रंग दाखवणाऱ्या शांतरसाचा होत थडन होत होता. आणि देशी शब्दांबरोबरच संस्कृत शब्दांचा अर्थवाही वापर सहज होत होता.

त्यांचा शब्द मोठा झाला तो त्यांच्या आशयाच्या बहुमुखी सांस्कृतिक संपन्नतेमुळे. ही संपन्नता म्हणजे मोले हातलेला उमाळा नव्हता. शतमशपणा टाकून नाहिरी आणि आति आध्यात्मिकता टाळून संतवाणी त्यांनी सहज आपलीशी केली. प्रसंन्नता हा तर गीतांचा प्रधान गुण आश्चर्य वाटू नये की मढकरांसारख्या कवीलाही याच गुणानं मोहिनी घातली होती. माडगूळकरांचा 'जोगिया' कवितासंग्रह १९५६ मध्ये प्रसिद्ध आला. त्याला प्रस्तावना लिहिण्याचं मर्ढेकरांनी ठरवलं होतं. ग. रा कामतांना त्यांनी १९५२ च्या प्रारंभी एक पत्र लिहिलं होतं. त्यात म्हटलं होतं: 'प्रस्तावना लिहिण्याचं एकदा कबूल केलं होतं, आजही तीव्र इच्छा आहे. पण कसं जमेल ते स्वरं एक तर सध्या माझा माझ्यावरचा विश्वास पूर्ण

# * सुधीर फडके, एकच ! *

फुलांच्या रंग आणि सुगंधाप्रमाणं आविष्कृत होणारे सूर आणि भाव, हे सुधीर फडके यांच्या गाण्याचं वैशिष्ट्य त्यांच्या गाण्यातील सूर आणि शब्द यांचं एकरूप होणं अनेक वेळेस विचारास प्रवृत्त करतं. या गाण्यात सुरांसाठी शब्द लिहिले की, शब्दांसाठी सूर योजले असा प्रश्न पडतो. शास्त्रीय संगीताची बैठक असलेलं सुधीर फडके यांचं गाणं शास्त्रीय संगीतातील क्लिष्टपणा, अवघड घडण टाळून रागांच्या धर्मे न सोडता अतिशय सहज सुंदर, सुगम आणि सोपं तयार झालेलं आहे. लोकांच्या सहज गुणगुणण्यात बसेल असं संगीत आणि अशा चालींमुळेच हे गाणं साऱ्यांना आपलंसं झालं आहे. गीतरामायणामुळे त्यांना मिळालेली लोकप्रियता हा साऱ्या जाणत्या समाजानं दिलेला अतिमोलाचा पुरस्कार आहे.

सुधीर फडके आणि गदिमा यांच्या गुणांचा समन्वय हा एक ईश्वरी संकेतच होता असं मला वाटतं. खरं तर तो अशीवतीच, अपूर्व असा योग होता. अगदी चांदण्याला सुगंध असावा तसा. शब्द आणि सूर यांच्या समरसतेत न्हाऊन निघालेल्या कित्येक चाली, अनेकविध गाणी आणि त्यांची विभिन्न रूपं समोर येतात. गदिमांच्या शब्दांच्या वजनाशी समतोल असणारे सुधीर फडके यांची सुरांची टक्कर ही नैसर्गिक होती. तालासाठी शब्दांची कुचंबणा झालेली आहे. असं कधीच वाटलं नाही. किंबहुना सुधीर फडके यांच्या सुरावटीचं जे महत्वाचं लक्षण दिसतं, ते त्यामध्ये जे जे काही मधुर आहे, ते ते टिपल्यासारखं स्मरणात राहणं. एखादी ऐकलेली सुरावट जशीच्या तशी फेरफार करून वापरली अशी कधीच गरज भासली नाही. तसंच आज माझा मूड लागत नाही. असंही आजपर्यंत त्यांच्या तोंडून ऐकलं नाही.

शब्द आणि सूर यांच्या सुयोग्य आकृतिबंध बांधणारे संगीत दिग्दर्शक सुधीर फडके, स्वतः उत्तम प्रतिचे गायक असल्यामुळेच वेगवेगळ्या रचनांचा योग्य तो आविष्कार झाला आहे.

सुधीर फडके यांच्या वैशिष्ट्यांमुळेच अनेक पार्श्वगायकही आपण असंती चाल आणि चालीचे बारकावे लक्षात न घेता आपल्याला सुधीरजींसारखं गाता आलं पाहिजे अशी तीव्र इच्छा बाळगत असत, असतात.

राष्ट्रगीतं, देशभक्तीपर गीतं, भावगीतं, भक्तीगीतं, नाट्यसंगीत, संगीतीका, दोहे, ओव्या, लोकगीतं, पोवाडे, लावण्या, विडंबन गीतं, शास्त्रोक्त संगीतावर आधारित गीतं असे सुरांच्या आविष्कारातील सर्व प्रकार सुधीर फडके यांनी यशस्वी रीत्या हाताळलेले दिसतात. जीवनातील, समाजातील, विविध वातावरणांना साजेसं चित्र त्यांनी आपल्या सुरातून उभं केलं आहे. संगीत दिग्दर्शक आणि संगीत क्षेत्रात अद्वितीय काम करणारी व्यक्ती म्हणून समाजातील, कुटुंबातील, आबालवृद्धांना अभिमान वाटावं असं, सुधीर फडके यांचं व्यक्तिमत्व आहे.

सुधीर फडक्यांच्या व्यक्तिमत्वात स्वाभिमान अवश्य आहे, पण दुराभिमान नाही. काही चांगलं, त्यांच्या कुणाच्या वादक-कलाकडून जरा सुचलं गेलं तरी ते समजून घेऊन त्याचा कौतुकानं उपयोग करून घेण्याचा मनाचा मोठेपणा त्यांच्यात आहे.

सुधीर फडक्यांच्या घरी कुणालाही, मग तो निकटचा असो, परभाषीय, परप्रांतीय किंवा परदेशी असो, कधीही परकेपणा वाटणं शक्य नाही. अनेक गरजू, अडचणीत असलेल्यांना त्यांच्या कधीही उच्चार न करता त्यांनी आधार आसरा दिला आहे. आणि त्यांच्या अन्नपूर्णा पत्नीनं मनापासून कष्ट सोसून त्यांना पूर्णपणे साथ दिली आहे. सुधीर फडक्यांनी आता आपल्याला वेळ नाही, भेटणं अशक्य आहे. असं तुटकपणानं किंवा कुणाला टाळण्यासाठी म्हटलेलं इतक्या अनेक वर्षांत माझ्या पाहण्यात नाही. माणसाच्या हाती असलेल्या वेळाचं, कदाचित नैसर्गिक जलाशयातल्या पाण्यासारखं असावं. ज्याला इतरांसाठी वेळ देण्याची इच्छा असते, त्याच्याकडे वेळ भरपूर असते.

सुधीर फडके यांच्या स्वभावात एक बालसदृश मिश्किलपणा आहे, विनोदबुद्धी आहे. तो त्यांना कामाचा ताण सहन करण्याची क्षमता देतो. माझ्यासारख्या जुन्या आणि निकटच्या मित्रांशी भेट झाल्यानंतर हा निर्मळ खोडकरपणा जागृत होतो. आणि दोघांनाही असे प्रसंग अत्यंत सुखद वाटतात.

ज्ञानी, वयोवृद्ध आणि साधी राहणी असणाऱ्या व्यक्तींविषयी नितांत आदर बाळगणारे सुधीर फडके, कोणतेही अप्रसन्न समझौते न करता आपल्या तत्वाशी, मतप्रणालीशी एकनिष्ठ राहिलेले आहेत. या साऱ्या शोधाच्या, विश्लेषणाच्या पलीकडे, त्यांच्या यशामागे, एक अदृश्य अशी ईश्वरी कृपा आहे. देणगी आहे. एक स्वयंपूर्ण व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्यात जगण्याचं धारिष्ट्य आहे. त्यांना जे-जे काही करावं असं वाटत असेल, ते करण्याची शक्ती, प्रेरणा त्यांना मिळत रहावी. दीर्घायुष्य आणि जीवनातला भरमाप आनंद त्यांना मिळत राहावा, हीच माझ्यासारख्या एक निकटच्या मित्राची परमेश्वराजवळ प्रार्थना.

# दूर रे किनारा...

सुधीर फडके.

हवेत तरंगतच मी घरी आलो. दादा घरी नव्हता. ऑफिसला गेला होता. वहिनींना सगळं सांगितलं. त्यांना आनंद झाला. त्याच दिवशी दुपारी माडगूळकरांनी दुसरं गाणं लिहिलं, 'दूर रे किनारा, सागरी पिसाटला वारा' पालकुरशा माडीवर बसून मी लगेच त्याही गीताला चाल लावली. दुसऱ्या दिवशी त्या मंडळींच्या बरोबरच रेकॉर्डिंग पहायला गेलो. तोपर्यंत प्रत्यक्ष रेकॉर्डिंग कसं करतात ते पाहिलेलं नव्हतं. माझं रेकॉर्डिंग आठ-दहा दिवसांनंतर करायचं ठरलं. तोपर्यंत इतर कलावंतांचं रेकॉर्डिंग ठरलं होतं. रंकाळ्याच्या पलीकडील शालिनी स्टुडिओत हे रेकॉर्डिंग चाले. हल्लीचा 'शांतकिरण स्टुडिओ' तो हाच.

या सगळ्या वातावरणात माझा मूड हळूहळू बदलत होता. कलाकलाने ज्या कारकिर्दीच्या जवळपास मी गेलो, त्यात आता मी प्रत्यक्ष वावरत होतो. 'एच.एम.व्ही.'च्या रेकॉर्डिंगसाठी अनेक कलावंत गायक, वादक, शाहीर, नकलाकार, भावगीतकार स्त्री-पुरुष तिथं एकत्र येत होते. त्या सर्वांशी माझा परिचय होत होता.

कशी कुणास ठाऊक, त्या पहिल्या दिवसांपासूनच माडगूळकरांची आणि माझी जोडी जमली. रोज ते नवनवीन गीत लिहायचे. काव्यातले इतके विविध प्रकार एकच व्यक्ती इतक्या चांगल्या तऱ्हेने लिहिते, हा अनुभव मी प्रथमच घेत होतो. त्या रेकॉर्डिंगच्या निमित्ताने एकत्र आलेल्या साऱ्या लोकांत त्यांच्या भारदस्त देहयष्टीबरोबर दुसऱ्यांवर हुकूमत गाजवण्याच्या त्यांच्या सहज स्वभावामुळे इतर सर्वांपेक्षा माडगूळकर वेगळे वाटत होते. अगदी पहिल्या भेटीतच मला जाणवलं की, या माणसाला स्वतःच्या मोठेपणाची जाणीव आहे. पहिल्या काही दिवसांतच मी पाहत होतो की, हे एकदम कुणावरही रागवतात. प्रसंगी तोडून बोलतात. पण थोड्यावेळाने शांत झाल्यावर खेळीमेळीनं वागतात. या अशा माणसांविषयी सर्वांना असलेला आदरही मी पाहत होतो. हे सगळं जगच मला नवीन होतं. त्यामुळे मी त्यातली प्रत्येक लहान सहान गोष्ट जाणीवपूर्वक टिपून घेत होतो.

आता मी घरी फारच थोडा वेळ असे. बहुतेक सारा वेळ या घोळक्यात जाई.

मास्टर्स व्हॉइस कंपनी' आली आहे. त्यांचं रेकॉर्डिंग सुरू आहे. मी कविता स्वत: गाऊन रेकॉर्ड करणार आहे."

मी कोल्हापूरला आल्यापासून पानकर मला भेटत होता. मी कलकत्त्याला जाणार हे त्याला माहीत होतं. केव्हा जायचं, तो दिवस नक्की नव्हता.

सवस्थ बसून काम करायचं. म्हणून मी त्याला 'हो' म्हटलं. कविता वाचून पाहिली चांगली होती. त्या काळात मराठवाड्यात दर्यागीतांची लाट आली होती. 'आला खुशीत समिंदर, त्याला नाही धीर' हे सौ. ज्योत्स्ना भोळ्यांचं आणि 'नाखवा वल्हव वल्हव' हे श्री गजानन वाटव्यांचं अशी कोळीगीतं अपार लोकप्रिय होती. पानकरांनं आणलेलं असंच एक दर्यागीत होतं. पहिली ओळ होती, 'दर्यावरी नाच करी होडी चाले कशी झिरीमिरी'

कवी कुणास ठाऊक, पण चाल चटकन लागली. त्या काळातल्या त्या नागरी कोळीगीतांत सहजपणे सामावून जाईल, अशी ती चाल होती.

तीच चाल ऐकल्यावर पानकर म्हणाला, "अशी चाल गाता येणं कठीण आहे. पानकर गवई नव्हता. गाणं शिकलाही नव्हता.

माझ्या कोल्हापुरातल्या पाच - सव्वापाच वर्षांच्या अनुपस्थितीत त्या गोष्टी घडल्या होत्या, त्यांतच माधव पानकरच्या रेकॉर्ड्स होणं ही एक होती. त्या रेकॉर्ड्स कसल्या प्रकारच्या होत्या. ते मला माहीत नव्हतं. तेही त्यांच्याकडूनच कळलं. तो लावण्या, कलाव, कटके, वग अशा आज ज्याला लोकनाट्य म्हणतात. अशा पद्धतीची गाणी

आणि त्याचबरोबरच पोवाडेही छान म्हणत असे. त्याच्या गाण्याचा हा प्रकार आधी कळला असता, तर त्याला गायला जमेल, अशा तऱ्हेची चाल त्या गीताला लावण्याचा प्रयत्न मी केला असता. पण झालं ते बरंच झालं. माझ्या आयुष्याची पटकथा ज्या प्रकारे नियतीनं लिहिली, त्याला अनुरूप अशीच ही गोष्ट घडली.

# आशा-निराशेचा खेळ



तो दिवस मला चांगला आठवतो. रेकॉर्डिंग साधारणपणे दुपारी तीनपासून सुरू करायचं होतं. आम्ही सगळे त्याआधीच शालिनी स्टुडिओत पोचलो. स्टुडिओत मा. विनायकांच्या एका चित्रपटातल्या एका गाण्याचं रेकॉर्डिंग चाललं होतं. संगीत दिग्दर्शक दत्ता डावजेकर होते. ते रेकॉर्डिंग संपता संपेना. संध्याकाळचे पाच वाजले तरी संपलं नाही. कामेरकर, माडगावकर आत जाऊन बसले होते. आम्ही बाहेरच एका पारावर बसलो होतो. मनात आशा-निराशेचा नेहमीचाच खेळ चालला होता. पाच वाजून गेल्यावर एकेकजण स्टुडिओतून बाहेर येऊ लागले. यांच्यामागून देवदूतांसारखे असणारे मा. विनायक आणि दत्ता डावजेकर आले. श्री. डावजेकर त्या काळीही लोकप्रिय संगीत दिग्दर्शक होते. अत्यंत कल्पक संगीत-दिग्दर्शक असलेला हा माणूस बाहेर आल्यावर त्यांनी दिसू नये, म्हणून मी थोडासा बाजूला झालो. त्या वेळच्या मोठ्या माणसांसमोर मी कोणीच नव्हतो. 1939 साली 'ओडियन' रेकॉर्ड कंपनीत माझी गाणी रेकॉर्ड करण्यासाठी त्यांनी मला दोन गाणी शिकवली होती. त्यानंतर चित्रपटसृष्टीत संगीत-दिग्दर्शक या उच्चपदाला ते पोचले होते. मी मात्र तसाच होतो. एच. एम. व्ही. च्या नाक्यावरून निघ आलो होतो. त्यांना भेटायची माझी मलाच लाज वाटली. पण डावजेकरांनीच मला पाहिलं आणि म्हणाले, "काय सुधीर, इकडे कुठे?" मग माझी भीड चेपली. मी त्यांना कशासाठी आलो, ते सांगितलं. त्यांनी 'विश' केलं आणि ते निघून गेले. मा. विनायकांनीही मी कुठं असतो, काय करतो, त्याची चौकशी केली. खरं म्हणजे त्या क्षणापर्यंत मी कोणीही नव्हतो. पण त्यानंतर काही तासांनी जेव्हा माझी पहिली चाल रेकॉर्ड झाली. तेव्हा माझ्या मनातली ती स्वतः विषयीची न्यूनगंडाची भावना बरीचशी कमी झाली.

चित्रपटात नसलो तरी ग्रामोफोन रेकॉर्डिंग कंपनीसाठी का होईना, मीही आता संगीत दिग्दर्शक झालो होतो!

'चांदाची किरणे विरली, प्रीतीच्या माझ्या राजा,
वाट किती पाहू रे? वाट किती पाहू रे'

हे पहिलं गाणं रेकॉर्ड झालं आणि माझ्या मनावरचं रेकॉर्डिंगच्या नवीविषयीचं दडपण नाहीसं झालं. 'झुम झुम झुम झुम नाच मोरा' हे दुसरं

# * चित्रपटसृष्टीतलं फडके युग *

'मनोरथा चल त्या नगरीला' या सुमधुर गीतानं ४७/४८ सालाच्या त्या काळात वेढावून न गेलेला रसीक महाराष्ट्रात सापडणं विरळाच. मीही ते गाणं अनेकदा गाऊन, व्हायोलिनवर वाजवून, मनसोक्त आनंद लुटला. त्याच गीताचे जनक फडकेसाहिब यांच्या मी पुढील आयुष्यात सहकारी म्हणून काम करेन, असं स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. खरं तर शाळेत असल्यापासूनच मी त्यांच्या संगीताच्या व गायनाच्या चाहता होतो. पं. गजाननबुवा जोशांकडे मी शास्त्रीय गायनाचे धडे घेत होतो, तरी सुगम संगीताकडे माझा तेव्हापासूनच ओढा होता. १९४४ साली वडिलांच्या अपघाती निधनामुळे शिक्षण चालू असतानाच पैसे मिळवण्याकरता जे अनेक व्यवसाय मी करत होतो, त्यात व्हायोलिन वादनाचा क्लास चालवणं, बबनराव नावडीकर, मालती पांडे, रोहिणी भाटे, इत्यादी गायक-गायिकांबरोबर व्हायोलिनची साथ करणं, गणपती उत्सवात पुण्यातल्या छोट्या-मोठ्या वाड्यांमधील गणपती उत्सवात सव्वा रुपया व नारळ अशी बिदागी घेऊन कार्यक्रम करणं इत्यादी गोष्टी असत. त्या कार्यक्रमात फडकेसाहेबांचीही त्या वेळी लोकप्रिय असलेली सीता, स्वयंवर, मायाबाजार वगैरे चित्रपटातील गाणी मी वाजवीत असे.

फडकेसाहेबांबरोबर काम करताना एक गोष्ट प्रकर्षानं जाणवायची - अजूनही जाणवते - ती त्यांची प्रगल्भ अशी काव्याची जाण. कवीला नेमकं काय सांगायचंय ते जाणण्याची ताकद तर हवीच; पण त्याबरोबर स्वरांच्या माध्यमातून ती व्यक्त करण्याकरता जी जबरदस्त प्रतिभा लागते तिची मी अनेक वर्षं अनुभव घेत गेलो, हे मी माझं फार मोठं भाग्य समजतो.

गायकाला गाणं शिकवताना त्यांचे जे विविध पैलू आढळायचे त्यानं मन चक्क व्हायचं. गीताचा अर्थ, शब्दोच्चार त्यातील भाव या सर्व गोष्टी स्वरांच्या माध्यमातून श्रोत्यांपर्यंत पोचवायच्या असतात. याची पुरेपूर जाण त्यांना स्वतःला असल्यानं गायकानंसुद्धा या सर्व गोष्टींचा जाणीवपूर्वक विचार करून ते गीत गायला हवं, असं त्यांचं मत होतं.

मधल्या काळात मराठी चित्रपटसृष्टीला पडता काळ आला. पुण्यातले स्टुडिओ बंद पडले. मग फडकेसाहेबांनी गायनाचे कार्यक्रम करायचं ठरवलं. सुरुवातीला सुगम संगीताचे कार्यक्रम करताना केवळ गीतरामायणातील गीतांचा स्वतंत्र कार्यक्रम करण्याची कल्पना त्यांच्या मनात आली. या काळात फडकेसाहेबांचा बऱ्याचदा माझ्या घरी मुक्काम असे. कारण विश्वास कुठे जागा सोडून मुंबईत गेले होते. आमच्या कुटुंबापैकीच ते एक असल्यासारखे राहत असत. मोठेपणाचा कसलाही अंश त्यांच्या वागण्यात नसे. गीतरामायणाचा पहिला कार्यक्रम कुठे झाला ते मला नीटसं आठवत नाही; पण हा कार्यक्रम लोकांना कितपत आवडेल, अशी काहीशी शंका फडक्यांच्या मनात असावी. त्यामुळे पहिल्या कार्यक्रमाला जाताना ते गमतीनं माझ्या पत्नीला म्हणाले, "वहिनी, तुमच्याबरोबर तुमच्या आजूबाजूच्या ओळखीच्या लोकांना कार्यक्रमाला घेऊन या बरं का! समोर माणसंच नसली तर माझी पंचाईत होईल!" पण तशी वेळ कधीच आली नाही. आजही त्यांच्या गीतरामायणाच्या कार्यक्रमाकरता हजारोंनी श्रोते उपस्थित राहून गाण्याचा आनंद लुटतात. केवळ पुण्या-मुंबईतच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानात जिथं जिथं मराठी भाषिक लोक आहेत त्या सर्व ठिकाणी गीतरामायणाचं मोठ्या उत्साहानं स्वागत झालं. सुमारे साडेचारशे-पाचशे कार्यक्रमात मी स्वतः फडकेसाहेबांना व्हायोलिनची साथ केली. विदर्भात तर आम्ही जवळजवळ दीड-दोन वर्षं जाऊन-येऊन असू. एकट्या नागपुरातच त्यांचे शंभराहून अधिक कार्यक्रम झाले. नागपुरात पहिला कार्यक्रम ३ फेब्रुवारी १९५८ रोजी झाला. तेथील रसिकांनी त्याचं प्रचंड उत्साहानं स्वागत केलं आणि एक वर्षाच्या आत तिथं पंचवीस कार्यक्रम होऊनही गेले. पंचविसावा कार्यक्रम खूप वेगळ्या तऱ्हेनं साजरा केला गेला. त्यासाठी नागपुरात 'गीतरामायण रजत महोत्सव समिती' स्थापन झाली होती. त्या कार्यक्रमाची आणखी दोन वैशिष्ट्यं म्हणजे त्या कार्यक्रमाकरता आकाशवाणीवर प्रथम गीतरामायण सादर होताना ज्या ज्या प्रमुख गायक कलाकारांचा सहभाग होता, त्यांना नागपुरात बोलावून त्यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय त्या कार्यक्रमाला त्या वेळी पंजाबचे राज्यपाल असलेले काकासाहेब गाडगीळ, ग. दि. माडगूळकर, राजाभाऊ प-

रांजपे व नागपुरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. प्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या 'रंजन कला मंदिर' या संस्थेनं गीतरामायणातील कोणतंही एक गीत गायनाच्या स्पर्धा आयोजित केल्या. तेथील होतकरु गायक-गायिकांनी त्यात प्रचंड उत्साहानं भाग घेतला. मी अशा सुमारे पाचशे कार्यक्रमात अविस्मरणीय आनंद मिळत असे. कधीही कंटाळा आला नाही. त्यातील ताजेपणा, टवटवीतपणा जराही कमी झाला नाही. प्रथम एका दिवसात निवडक चौदा गाण्यांचा कार्यक्रम ते करीत. अजूनही करतात.

माझी पत्नी नीला फडकेसाहेबांना 'काका' म्हणते, तर ते तिला 'वहिनी', या त्यांच्या वहिनींनी होमिओपथीचा थोडा अभ्यास केलाय व औषधंही देतात. एखादयाच्या गुणांचं कौतुक करताना हातचं काही राखायचं नाही हा फडकेसाहेबांचा गुण. मोहन रानडे एकदा मुंबईत असताना त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना इंदूरला जायचं होतं. नेहमीच्या औषधांनी गुण येईना. फडकेसाहेबांनी सौ. नीलाला बोलावून घेतलं. आता बघा यांची करामत. तुम्हाला लगेच आराम वाटेल वगैरे. नीलानं औषध दिलं. रानड्यांनी इंदूरहून ~~पत्रांतून~~ पत्तानंच फडकेसाहेबांनी आमच्याकडे येऊन लगेच सारं सांगून हेचं पुन्हा कौतुक केलं.

एकदा एका गाण्याचं काम चालू होतं. गदिमांच्या कॅन्सर-च्या शस्त्रक्रिये नंतरचं हे पहिलंच गाणं होतं. गदिमांना त्रास लागली. तो त्रास काही कमी होईना. काम व्हायचं कसं. फडकेसाहेब म्हणाले, थांबा. मी आमच्या वहिनींना बोलावतो. त्या देतील औषध. त्या वेळी खरं तर ही एका अवघड शस्त्रक्रियेतून नुकतीच उठली होती, पण फडकेसाहेबांचा फोन म्हणताच ती तिथं कशीबशी पोहोचली. तिनं औषधांच्या गोळ्या दिल्या. गदिमा म्हणतात, "अगं, मी हा एवढा आणि मला या एवढ्याशा दोनच गोळ्या..." त्यावर ही म्हणाली, "अहो वाटलं तर चार द्या, पण त्यानं काही जास्त लवकर गुण येणार नाही." मग ती गेली. आमचं काम पुढे चालू झालं. तिचं औषध लागू पडलं. माडगूळकर म्हणाले, "अरे जोगा, तुझी बायको म्हणजे जादुगारच आहे की!" फडकेसाहेबांनी हेही हिला कौतुकानं सांगितलं. त्या दिवशी रात्रीपर्यंत माडगूळकरांनी-

तीन गाणी लिहून दिली.

संगीतक्षेत्रात इतकी अजोड कामगिरी बजावणाऱ्या या कलावंताच्या आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे त्यांच्या ज्वलंत देशाभिमान. ज्या तत्वप्रणालीचा त्यांनी अंगीकार केला, तिच्याशी ते सतत प्रामाणिकच राहिले. प्रसंगी त्या तत्व-प्रणालीविषयी आपली मते सडेतोडपणे, परखडपणे मांडताना त्यांनी कधीही कुणाचा मुलाहिजा ठेवला नाही. गोवा मुक्तीसंग्रामातील त्यांची कामगिरी अविस्मरणीय अशी आहे. त्या कामगिरीतला माझा एक खारीचा वाटा म्हणजे सेल्वासा जिंकण्यासाठी जाताना माझ्या एका जुन्या व्हायोलिनच्या केसचा त्यांनी बंदुक घेऊन जाण्यासाठी वापर केला होता. पोर्तुगीजांच्या कैदेतील मोहन रानडे व डॉ. तेलो मस्कारेन्हस यांना सोडविण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. या वयातसुद्धा स्वातंत्र्यवीर सावरकरांवर तयार करावयाच्या चित्रपटासाठी निधी जमविण्यासाठी व इतर तयारीसाठी तरुणालाही लाजवतील असे त्यांचे परिश्रम असतात.

अशा या प्रतिभावान, प्रखर देशाभिमानी, सामाजीक बांधीलकीची सतत जाण असलेल्या माझ्या गुरुजींना फडकेसाहेबांना - 'जीवेत् शरद: शतम्' अशा शुभेच्छा देण्याशिवाय मी वेगळे काय लिहिणार ?

# पुस्तकांच्या चोरीचा आळ

सुधीर फडके

घरातल्या वस्तू हळूहळू बाजारात गेल्यात होत्या. फारच थोड्या राहिल्या होत्या. दागदागिने संपले होते. घरात तिजोरी होती एककाळी मोठ्या दिमाखात मिरवली जाणारी तिजोरी आता दुधाडुभत्यासाठीसुद्धा वापरली जाऊ शकत नसे. कारण दूध आणि दही हे प्रकार नावापुरतेच असत. वडिलांची कायद्याची मूल्यवान पुस्तकं आतापर्यंत शाबूत राहिली होती. एके दिवशी मन घट्ट करुन मला त्यांनी त्यातली दोन पुस्तकं विकून यायला सांगितली. एखाद्या वकिलानं ती पुस्तकं कदाचित योग्य किंमतीला घेतली असती. पण एके काळच्या नामवंत वकिलाला हे करणं कसं शक्य होतं? अन्नाला मोताद झाल्यावेळीही स्वाभिमानी माणसाच्या हातून असली लाचारी होवू शकत नाही. फडके वकिलांनी पैशाकरता आपली कायद्याची पुस्तकंसुद्धा विकली, अशी आवई पसरली असती, तर त्यांनी खरोखरच आत्महत्याच केली असती.

जुनी पुस्तकं विकत घेणारे एक सभ्य आणि प्रतिष्ठित म्हणून मिरवणारे गृहस्थ माझ्या माहितीचे होते. त्यांच्याकडे मी ती दोन पुस्तकं घेवून गेलो. म्हटलं, "विकायची आहेत. हवी असल्यास योग्य ते पैसे द्या."

त्यांनी पुस्तकं पाहिली आणि चाळली दोन-चार मिनिटं गेली.

मी म्हटलं, "किती पैसे देता?"

ते म्हणाले, "पुस्तकं ठेव, उद्या ये योग्य पैसे देईन."

गृहस्थ ओळखीचे होते, म्हणून मी परत गेलो.

दुसऱ्या दिवशी त्यांनी वेगळाच पवित्रा घेतला. माझ्याकडे रोखून बघत म्हणाले, "चोरून आणलीस ना?"

मी म्हटलं, "नाही चोरून नाही आणली. आमचीच आहेत."

"मग का आणलीस?" त्यांनी विचारलं.

मी गप्प राहिलो वडिलांनी - एका प्रसिद्ध वकिलानं - आपली ~~कायद्य~~ कायद्याची पुस्तकं रद्दीत विकायला काढली, ही गोष्ट बाहेर यायला नको होती. म्हणूनं तर मला ती विकून यायला सांगितलं होतं.

तो सभ्य दरोडेखोर - हो, दरोडेखोरच होता! - हसून म्हणाला, "ही पुस्तकं चोरून आणली आहेस. तुला एकही पैसा देणार नाही!"

मी भयंकर संतापलो पुस्तकं परत मागितली पण तरीही त्या भल्या माणसांनं दिली नाहीत. मी घरी येवून वडिलांना हे सर्व सांगितलं

पण त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेली वेदना अंतःकरण हेलावून टाकणारी होती.

मी स्तब्ध राहलो. काकांनी पाठीवरून माझ्या हात फिरवला. मला शांत केलं.. पण त्यांच्या चेहऱ्यावरची वेदना ही त्यांच्या अंतःकरणात उठलेल्या वादळाची खूण होती. त्या क्षणी त्यांच्या मनात. असंख्य विचारांचं वादळ उसळून आलं असणार. आपल्यासारख्यांवर ही परिस्थिती यावी ? आपल्या मुलावर चोरीचा आरोप केला जावा? आपल्यासाठी निमूटपणे तो त्याला ऐकून घ्यावा लागावा ? वास्तविक आपणच त्याला विकायला सांगितलं होतं. पोटासाठी. सगळ्यांच्या ते काही बोलले नाहित. आतल्या आत त्यांनी सगळं वादळ दडपलं. पण चेहऱ्यावरची वेदना ? त्या वेदनांनी व्याकूळ झालेल्या त्यांच्या त्या वेळच्या चेहरा मी कधीही विसरू शकणार नाही.

दादाला कुठंतरी नोकरीला लावायची काकांनी (माझ्या वडिलांनी) खटपट चालूच होती. देवानं हाक ऐकली. कोल्हापूरमध्ये नवकरच सुरू होणाऱ्या साखरेच्या कारखान्यात त्याला नोकरी मिळाली. छोटी कारकून. पगार दरमहा वीस रुपये. पण घराला थोडा तरी आधार झाला. घर घराचं भाडं दरमहा पाच रुपये. उरलेल्या पंधरा रुपयांत दोन वेळा तिघांचं कसंबसं जेवण होई. काकांची धडपड चालूच असे. तरीपण मुकंदहीन हालच होते. माझं वयं लहान असलं, तरी मी हाडहाकट होती. आणं येत होत. प्रयत्नानं मला थोडेसे तरी पैसे मिळवता येतील, निदान माझा भार तरी हलका करता येईल; हा विचार माझ्या मनात सारखा येऊ लागला.

# काही आठवणी

ललिता फडके.

बाबूजींच्या सहधर्मचारिणी श्रीमती ललिता फडके यांनी लिहलेल्या या आठवणी सर्वांगपरिपूर्ण माहित प्रकृती म्हणावी तशी साथ देत नसतानाही आंतरिक उमाळ्यापोटी त्यांनी या आठवणी लिहून काढल्या. प्रामुख्याने 'गीतरामायण' च्या ठिकठिकाणच्या कार्यक्रमांबद्दलच्या, मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी बाबूजींनी केलेल्या प्रयत्नांबद्दल-च्या आणि दादरा नगरहवेली मुक्तिसंग्रामातल्या बाबूजींच्या सहभागाबद्दलच्या या आठवणी ललिता फडके यांनी रंजक पणे मांडल्या.

ललिताबाई फडके

classmate
Date :
Page :

मुंबईतले पहिले 'गीतरामायण'

पुणे रेडिओवरुन गीतरामायण सादर करताना बाबुजींची अनेकदा फार ओढाताण होई. कधी गाणे उशिरा हातात मिळे - मग तालमीला पुरेसा वेळ मिळत नसे. कधी योग्य गायक न मिळाल्याने स्वत:बाबूजीच ती गाणी गात असत. श्रोते साडेआठच्या ठोक्याला रेडिओला कुले वाहुन कान लावून बसलेले असत. सावेळी प्रत्येक घरी रेडिओ नसल्याने गाणे ऐकण्यासाठी रस्त्यावर बाहेरही लोक एकत्र जमत.

पुणे 'आकाशवाणी' वरचे सादर होणारे कार्यक्रम, 'गीतरामायण' मुंबईला ऐकू येत नसे. त्यामुळे मुंबईकरांना 'गीतरामायण' हा प्रकार काय आहे; ते माहित नव्हते.

अंदाजे १९५७ मध्ये श्रीगणपती - उत्सवात हिंदु कॉलनीत हयांच्या कार्यक्रम ठेवण्यासाठी काही विद्यार्थी आमच्या घरी आले. ते बाबुजींकडे सुगमसंगीताचा कार्यक्रम मागत होते. मी त्यांना म्हटले, "सुगमसंगीताऐवजी 'गीतरामायण' का नाही ठेवत?"

"गीतरामायण म्हणजे प्रवचन आहे का? ते काय आहे आम्हांला माहीत नाही", असे ते विद्यार्थी म्हणाले. मग मी त्या मंडळींना सांगितले, "गीतरामायण ही एक रामकथा आहे व ती सर्वांना आवडेल." त्यावर असेसुद्धा म्हटले की, "तुम्हांला जर तो कार्यक्रम आवडला नाही, तर पैसे देऊ नका."

शेवटी हिंदु कॉलनीत 'गीतरामायणा'चा कार्यक्रम ठरला. दोन्ही बाजूंचे रस्ते - गॅलच्या माणसांनी गच्च भरुन गेल्या होत्या. बाबूजींचा प्रत्येक कार्यक्रम रंगतोच. त्यातच हा मुंबईतला पहिला 'गीतरामायणा'चा

कार्यक्रम होता. तो खूपच रंगला. कार्यक्रम संपला आणि कॉलेज-युवकांबरोबर बाबुजी घरी आले. त्या मुलांनी बाबुजींचे पाय धरले व म्हणाले, "आम्ही इतक्या चांगल्या कार्यक्रमाला मुकणार होतो. वहिनीसाहेबांनी हे आम्हांला सांगितले म्हणून खूप छान झाले." त्या मुलांनी ठरलेल्या पैशांपेक्षा दुप्पट पैसे बाबुजींना दिले.

त्या दिवसापासून 'गीतरामायणा'चे कार्यक्रम मुंबईला सुरू झाले.

'गीतरामायणा'ची वही हरवली!

बाबुजी पुण्याहून मुंबईला एकदा आगगाडीने आले. दादरला टॅक्सी केली. टॅक्सी रानडे रोडवरून धावू लागली. संध्याकाळी सातची वेळ होती व रात्री नऊ वाजता 'किंग जॉर्ज शाळे'च्या पटांगणात कार्यक्रम होता. आपल्याला आज खूप उशीर झाला आहे, त्यामुळे रियाज करायला वेळ मिळणार नाही, हे ह्यांच्या ध्यानात आले. रानडे रोडवर संध्याकाळी नेहमीच खूप गर्दी असते. गाडी चालवणे म्हणजे एक प्रकारची सर्कसच. गाडी चालू असताना ड्रायव्हरच्या मागच्या बाजूचे दार अचानक उघडले गेले. ते बाहेरच्या एका माणसाने धाडकन लावूनही टाकले. ह्यांना काय झाले, ते कळलेच नाही.

टॅक्सी घरी आल्यावर सामान काढताना ह्यांच्या लक्षात आले की, आपली शबनम हरवली आहे. ड्रायव्हरने व ह्यांनी खूप शोधाशोध केली, पण पिशवी काही सापडली नाही. सामान घेऊन हे घरात आले व मला म्हणाले, "माझी पिशवी हरवलीय आणि त्यात 'गीतरामायणा'ची वही होती. आज माझा कार्यक्रम आहे. मी कसा गाऊ?"

CLASSMATE
Date :
Page :

त्यावेळी त्यांना चष्मा लागला होता. त्यांना सर्व 'गीतरामायण' मी जाड पेनने चटकन वाचता येईल, अशा पद्धतीने लिहून दिलेले होते आणि आता तीच वही हरवली होती. मी त्यांना म्हणाले, "अजून एक तास आहे. मला जेवढी गाणी लिहिता येतील, तेवढी मी लिहून देते. उतरलेली गाणी तुम्ही 'गीतरामायण' पुस्तकात बघून म्हणा." तेव्हा ते म्हणाले "मला गाताना प्रेक्षकांकडेही बघावं लागतं. तिथून परत पुस्तकाकडे बघितलं तर पुस्तकातली अक्षरं चष्मा लावला तरी कळत नाहीत." मी म्हणाले, "तुम्ही थोडा गाण्यांची यादी द्या. प्रेक्षकांमध्ये माझ्या ओळखीची माणसे भेटतील. कार्यक्रम चालू असताना त्यांच्याकडून मी एक एक गाणं लिहून घेईन."

त्यांचा माझ्यावर विश्वास होता. मी स्टेशनरीच्या ~~मी एक~~ ~~अमणं~~ दुकानातून कागदाचे मोठे ताव आणले. जाडशाईची बॉलपेन्सही आणली. आम्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी पोचलो.

बाबुजींचे मित्रच व्हॉलेंटियर होते. त्यांपैकी एकाला मी माझी अडचण सांगितली. प्रेक्षकांमधून अक्षरांचे नमुने मागवून ज्यांचे अक्षर उठावदार होते, त्यांच्याकडून गाणे लिहून घ्यायचे ठरवले. त्यासाठी त्यांना कागदाचा एकेक ताव दिला. बाबुजींना कागद जसा वहीच्या दोन्ही बाजूंसमोर दिसावयास पाहिजे असे कागद दुमडून दिले. अंतरा झाल्यावर एक एक रेघ मध्ये सोडावी लागते, हेही सांगितले. पहिली दोन गाणी मी लिहिली होतीच. त्यानंतर गाण्याचा कोणता क्रमांक प्रथम येतो. तेही त्यांना सांगून प्रथम तेच गाणे लिहा, नंतर दुसऱ्या क्रमांकाचे गाणे लिहा, असे सांगितले. 'गीतरामायणा'चे एकच पुस्तक असल्याने एक गाणे लिहिल्यानंतर दुसरे गाणे लिहावे लागणार होते.

classmate
Date :
Page :

इकडे नेहमीप्रमाणे कार्यक्रम सुरू झाला. गाणी लिहून होत होती व स्टेजवर जात होती. बाबुजींना गाताना अडचण आली नाही. निवेदन करताना बाबुजींनी, "आपली गाण्याची वही आजच हरवली, त्यामुळे मी जरा अस्वस्थ होतो, पण रामकृपेमुळे तुमच्या मदतीनं मला प्रत्येक वेळी मोठ्या अक्षरांत गाणं मिळत राहिल्याने कार्यक्रमात खंड पडला नाही," हे सांगितले.

कार्यक्रम खूपच छान झाला. आम्ही सर्वजण घरी आलो. तेव्हा मी त्यांना सहज विचारले, "पिशवीत वहीव्यतिरिक्त काय काय होतं?"

"काही नाही, माझं घड्याळ व पैसे होते" म्हणाले. मी पैशाचा आकडा विचारल्यावर म्हणाले, "फक्त दीड हजार रुपये होते. घड्याळाचा पट्टा तुटल्यानं तेही पिशवीत ठेवलं होतं."

कार्यक्रम किती महागात पडला. याची मला जाणीव झाली. एवढ्या अडचणी येऊनही बाबुजी शांतपणे गाणी गात होते. यासंबंध मला, आम्हा सर्वांना खूप कौतुक वाटले.

रामाची कृपा

गीतरामायणासाठी बाबुजी विदर्भातील एका गावात गेले होते. आगगाडीचा प्रवास होता. थंडी बरीच होती. कार्यक्रम खूप रंगला. परत आगगाडीने जायचे होते व स्टेशन ३० किलोमीटरवर. वेळ कमी असल्याने सर्वांनी भराभर सामान उचलले व बाहेर एक उघडी गाडी होती, त्यात जाऊन बसले. गाडी गावातून जात होती, तोपर्यंत काही जाणवले नाही. गावाबाहेर आल्यावर गाडीचा वेगही वाढला आणि गार वाराही झोंबायला लागला.

S

classmate
Date :
Page :

स्वेटर मफलर घालूनही थंडी वाजतच होती. चंद्रकांत बाबूजींना म्हणाला, "तुम्ही डोके वाऱ्यावर ठेवू नका. खाली वाका." पण ह्यांनी कोणाचेच ऐकले नाही. ह्यांना काळजी गाडी वेळेवर मिळते की नाही, याचीच! शेवटी सर्वजण स्टेशनवर पोचले व गाडी मिळाली.

हे मुंबईला सकाळी ८ वाजता घरी आले. संध्याकाळी लगेच रंगभवन मध्ये कार्यक्रम होता.

गावाहून आल्यावर हे बेसिनवर हात व तोंड धुवावयास गेले असताना चूळ सरळ पडत नव्हती. नंतर आरशात पाहिले, तर एक डोळा मिटत नव्हता. तेव्हा ह्यांच्या लक्षात आले की, हे काहीतरी निराळेच आहे. आम्ही दोघे डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी चेहरा पाहिल्याबरोबर फेशियल पॅरॅलिसिस झाल्याचे सांगितले. डोळ्याला गॉगल लावायला सांगितला, कारण डोळा मिटत नव्हता. "थंडी किंवा ऊन तोंडावर आले की असे होते," असे डॉक्टर म्हणाले. "कानाच्या मागच्या बाजूस जो उंचवटा आहे तो फार सांभाळावा लागतो. तुम्ही शेतकऱ्याकडे कधी बघितले, तर तुमच्या लक्षात येईल. तो उन्हात शर्ट-सदरा घालत नाही, पण डोक्यावर मोठा फेटा कानामागून बांधतो."

डॉक्टरांकडून येता येता गॉगल विकत घेतला. घरी आलो. ह्यांना मी म्हटले, "रात्रीचे जागरण, प्रवास झाला आहे, आधी जेवून घ्या. झोप काढा. परत रात्री कार्यक्रम आहे." हे म्हणाले, "आता मी कसचा झोपतो-कार्यक्रम होईल की नाही, शंका वाटते."

रात्री हे गॉगल लावून कार्यक्रमाला गेले. साडेआठ वाजता कार्यक्रम होता. ह्यांना येताना पाहून प्रेक्षकांत थोडी चुळबूळ झाली, स्टेजवर बसल्यावर ह्यांनी गॉगल काढला. तंबोरे सुरात लावले व लोकांना म्हटले, "मी आज

तुम्हांला निराळा दिसतो ना ? त्याचं कारण असं असं" म्हणून रात्रीच्या प्रवासाचे वर्णन केले. बोलता बोलता शेवटी म्हणाले, "त्या आजारामुळे माझे उच्चार चुकले, स्वर बोबडे आले तर मी कार्यक्रम तिथेच थांबवीन. नाहीतर मी संपूर्ण कार्यक्रम करीन."

हे स्वतःच निवेदन करीत होते. वाणी स्वच्छ होती. कार्यक्रम सुरु झाला. तरीही ह्यांनी विचारले, "माझे बोलणं तुम्हांला स्वच्छ कळतं आहे ना ?" सर्वांनी 'हो' म्हणून मोठ्याने कोरस होकार दिल्यावर हे हसले. "ही रामाची कृपा" म्हणून दुसरे गाणे गाऊ लागले.

## असाही मांसाहार

मे महिन्याच्या अखेरीस पावसाळी दिवसांमुळे स्टेजवर किडे, डास, पिलटे फिरत. बाबूजींच्या पुस्तकाजवळ दिवा असल्याने त्यांना फारच त्रास होई. गाताना तोंड उघडायचा अवकाश, लगेच एखादा कीटक तोंडात जाई. खाकरुन किती वेळा काढणार ? मग ते सरळ पाणी पिऊन कीटक पोटात ढकलत. त्या दिवशी बाबूजी मांसाहारी होत. एकदा एक ख्रिस्तरच्या किडा कानात चावून खूप आग आग झाली. फोड आला. पण बाबूजींची सहनशक्ती अचाट ! त्यांनी कार्यक्रम पूर्ण केला.

जाहीर कार्यक्रमात अनेकदा चेहऱ्यावर वारा येईल, अशा रीतीने संयोजकांकडून स्टेज लावले जाई. यामुळे आवाज बसण्याचीही शक्यता असे. हे लक्षात आल्यावर संयोजक स्टेज व्यवस्था बदलू पाहात. पण बाबूजी त्यांना रोखत. श्रोत्यांची गैरसोय आयत्या वेळी करुन माझी सोय नको, असे ते म्हणत.

एकदा त्यांना एका ठिकाणी अध्यक्ष म्हणून बोलावले होते. त्यावेळी एका ८-९ वर्षांच्या मुलीने 'मज आणुनी द्या तो हरिण अयोध्यानाथा' हे गाणे इतके लाडिकपणे आणि सुंदर म्हटले की, बाबूजींनी खूष होऊन तिला पटकन शंभर रुपये बक्षीस म्हणून दिले. त्या मुलीला खरे म्हणजे सीतेने हट्टासाठी रामाकडे काय मागितले, हे कळलेसुद्धा नव्हते. अर्थ समजला असता, तर ती लाजली असती.

एका ठिकाणी देवस्थानच्या गावात कार्यक्रम होता. चहापानासाठी आत गेल्याचे निमित्त झाले आणि बाबूजींच्या पेटीचा स्टँड आणि चपलाही चोरीला गेल्या. तेव्हा मुंबईला परत आल्यावर सावधगिरी म्हणून दोन स्टँड करुन घेतले, ते अजूनही आहेत.

'गीतरामायणा'च्या प्रयोगांप्रमाणे बरीच शाळकरी मुलेही येत. हळूहळू त्यांचा उत्साह ओसरून ती पेंगू लागत. त्यांना प्रतीक्षा असे, ती एकाच गाण्याची - "सेतू बांधा रे!" ते गाणे आले की मुले एकमेकांना उठवत, "अरे उठा, आपलं गाणं आलं." मग 'सियावर रामचंद्र की जय' या ओळीतील 'जय' हा शब्द हा बालचमू इतक्या जोरात म्हणत असे की, सारा परिसर दुमदुमून जाई. इतर श्रोतेही त्यात सामील होत. पुण्याच्या गरवारे कॉलेजच्या मैदानावर श्रोत्यांनी दुमदुमून टाकलेला 'जय' रेकॉर्डवरील बाबूजींच्या 'चित्रकुटी'तही ऐकायला येई.

classmate
Date :
Page :



★ गदिमा - मराठी संस्कृतीचा सारांश

ज्यांचे वर्णन मराठी संस्कृतीचा सारांश असे करता येईल अशा मोजक्या कलावंतात ग.दि. माडगूळकर यांचा समावेश करावाच लागेल. बहुरंगी, बहुढंगी असे हे व्यक्तिमत्त्व असले तरी त्यांचा पिंड कवीचा. त्यातही गीतकाराचा होता. गीतात काव्य नसते असे मानणाऱ्या समीक्षकांनी गदिमांना कवी मानले नसले तरी त्यांच्या गीतांनी रसिकमनावर घातलेली मोहिनी आजही कायम आहे. साध्या शब्दात मोठा आशय पेलून सूत निघावं इतक्या सहजपणे शब्दात गुंफून सुरेल सुरात घोळून श्रोत्यांच्या मनी मानसी मुरवल्या गेल्याने गदिमा हे नाव विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घराघरात पोहोचले. मराठी साहित्य संस्कृतीचा संपूर्ण पट समोर घेतला तर अभिजन बहुजन अशा सगळ्यांना आकृष्ट करणारे श्रेष्ठ लेखक, कवी असतात. बहुतेकांचा मुक्काम दोन पाच वर्षे विद्यापीठी अभ्यासक्रमात राहतो. त्यात पहिल्या पंक्तीत अर्थातच संतांची प्रभावळ आणि पुढे लोकसाहित्याची माया मराठीवर पाखरलेली दिसते. या सगळ्या परंपरेचा अर्क म्हणजे गदिमा होत. त्यांच्या चरित्राचा धांडोळा घेतला तर गदिमा ही गावगाड्याची, आजी-पणजीचे सांगितलेल्या गोष्टींची, ग्रामीण अवकाशातली आत्राप माणसं, झाडझाडोरा, मंदिराच्या ओवऱ्यात होणाऱ्या कथा-कीर्तनांनी लोकशाहिरांच्या डफ तुणतुण्याच्या ठेक्यातून आपसूक झालेली निर्मिती होती. मुक्त श्रीमंत सांस्कृतिक पेस आपल्या अंगावर घालणाऱ्या मराठी संस्कृती नावाच्या गोधडीची ऊब ज्या पिढ्यांना मिळाली त्या भाग्यवान होत.

आज जागतिकीकरणाने ही गोधडी उसवायला घेतली असताना अण्णांचे महत्त्व आणखी अधोरेखित होते. दुष्काळ पाचवीला पुजलेल्या माणदेशातल्या शेटफळ या गावच्या गावात गरीब ब्राह्मणाच्या घरात जन्मलेल्या गदिमांना तशा अर्थाने साहित्याची काही परंपरा नव्हती.

बामणाला बामन म्हणण्याचा तो काळ. (पुढे गदिमांनी माडगूळातल्या त्या शेतघरात बसून सिनेमाच्या कथा लिहिल्या त्याला 'बामणाचा पत्रा' असे संबोधले जायचे. तिथल्या लोकांचा तो राजा होता आणि त्यांच्यासाठी ते नायक होते). लिहिणे हेच ज्यांचे जगणे झाले अशांपैकी माडगूळकर एक होते. 'थोडे शब्द, थोडी गाणी, हेच माझे अन्नपाणी' हेच त्यांच्या जीवनाचे ब्रीद होते. (ही ओळ नाशिकचे दिवंगत कवी प्रमोद कुलकर्णी यांची आहे).

अंकगणितात फर्डीस नंबर आला; पण शब्दगणितात अव्वल. वि.स.खांडेकरांचे लेखनिक म्हणून काम करताना या अवलगिरीला आणखी पैलू पडले असणार. महालक्ष्मीच्या स्तुतिगीताने सुरवात करणारे गदिमा पुढे जीवनलक्ष्मीचे स्तुतिपाठक झाले. औंधच्या राजाचे बाळ गदिमांना टाकीत म्हणजे सिनेमात जाण्याचा सल्ला दिला. राजाज्ञा पाळायचीच असते. मराठी चित्रपटाचा तो काळ होता. मराठी नाटक मूळ बदलत होते. सिनेमाला सूर गवसल्यासारखी स्थिती होती. कोल्हापूर हा या घडामोडींचा मोक्या होता आणि कविराज तेथेच मंगेशकर कुटुंब ज्या घरात राहत होते त्याच्या वरच्या मजल्यावर मुक्कामी होते. संसारही सुरू झाला होता. पण चित्त सगळे कलेत गुंतलेले. अभिनेता व्हायचे होते. सिनेमात मिळतील त्या भूमिका पत्करल्या. [illegible]साठी गाणी लिहीली. शीघ्रकवी लहरी हैदर यांचा प्रभाव पडला आणि शब्द गाण्यातूनच अन्नपाणी मिळवायचे हे नक्की झाले. 'भक्त दामाजी', 'पहिला पाळणा' पासून हा सिलसिला सुरू झाला. 'राजकमल' च्या रामशास्त्रीसाठी कविराजांनी, कथा, संवाद आणि गाणी लिहली वर एक छोटी भूमिका केली. सिनेमा गाजला. सिलसिला पुढे हिंदीत गेला. शेकड्यांनी मराठी सिनेमे केले. गदिमा हा गोष्ट सांगणारा माणूस होता. कधी कवितेतून, कधी पटकथेतून किंवा संवादातून ते गोष्टच सांगत राहिले.

CLASSMATE
Date :
Page :

③

त्यांच्यातला हा कथक कवीच नंतर आधुनिक वाल्मीकी म्हणून समोर आला तो गीतरामायणाच्या रूपाने. कोल्हापुरातच त्यांची गाठ सुधीर फडकेंशी पडली होती. त्यांच्यामुळे गदिमा पुण्यात आले. आकाशवाणी तेव्हा जम बसवत होती. सीताकांत लाड यांच्यासारखे कलेचे जाणकार कारभारी होते. गदिमांचे ते मित्र. या मैत्रीतून १९५५ साली जन्मले गीतरामायण. फडकेंनी ही गीते गायली. सगळी गीते आधी लिहून झालेली नव्हती. माध्यमे वेळेच्या ताणलेल्या प्रत्यंचेवर चालत असतात. त्यातून अनेक ताणाचे पण नंतर आनंदात पर्यवसित होणारे प्रसंग घडले. 'स्वये श्री रामप्रभू ऐकती' हे पहिले गीत मित्रवर्य लाड यांनी कविराजांना खोलीत कोंडून लिहून घेतले होते. या कार्यक्रमाने अमाप लोकप्रियता मिळवली. आकाशवाणी हे माध्यम महाराष्ट्रात रुजवण्यात त्यातून हातभार लागला. माध्यमांचे एक अर्थकारण असते. कलावंत हेच त्यांचे वंगण असते. कोल्हापुरात माडगूळकर, फडके, राजा परांजपे या त्रिकुटाने सिनेमाला सुवर्णकाळ दाखवला. गदिमांनी मराठी सिनेमाला कथा, पटकथा, संवाद, गाणी पुरवून फुलते ठेवले तसे गीतरामायणाने रेडिओ घरोघर नेला. आज सहा दशकांनंतरही या कथन काव्याची मोहिनी ओसरलेली नाही. २००५ साली पुण्यात रमणबागेत गीतरामायणाचा दिमाखदार सुवर्ण महोत्सवी सोहळा झाला होता. अन्य भाषा भगिनी आणि मराठी यांच्यात मराठीला अधिक श्रीमंत करणारी रचना आहे. संत, पंत आणि तंत या तिन्ही परंपरांचे वारसदार असल्याने गदिमांच्या रचनांना आपला डौल प्राप्त झाला. त्यांचे संवाद लोकांची बोली बोलणारे. त्यात अस्सल मराठी बाज होता. असे चौफेर यश मिळत होते तरी कवीच्या मनात एक सल होती. जोगिया या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत ती व्यक्त झाली आहे. जीवन व्यवसाय म्हणून लेखनिशी अनेकदा बेईमानी करण्याचा प्रसंग मजवर आला. या संग्रहातील कविता ही मात्र व्रतस्थपणे केलेली काव्यनिर्मिती आहे. विशुद्ध कवीच्या व्याख्या त्यांना हुकवल्या गेल्याने त्यांनी हा

खुलासा केलेला असू शकेल; पण खर तर त्याची गरज नव्हती. गीतरामायण संस्कृतसह विविध भारतीय भाषांमध्ये गेले. शिर्डीला साईबाबांच्या मंदिरात सकाळी जी काकड आरती होते ती गदिमांनी लिहलेली आहे. अजय - अतुल सारख्या नव्या पिढीतल्या संगीतकारांना गदिमांच्या रचना खुणावतात हुवढा खुलासा पुरेसा आहे.

शेवटी एका लेखाचा उल्लेख पूर्ण केल्याशिवाय गदिमांचे स्मरण पूर्ण होणार नाही. कविराजांना कर्करोगाने गाठले. कविप्रकृतीची माणसे अशा संकटांना गडबडतात, गोंधळतात. प्रकृती आणखी ढासळते. समोर मृत्यु दिसत असताना माणूस कसा वागतो याला खूप महत्व असते. त्यातूनही माणूस कळतो. गदिमांनी या अनुभवावर एक लेख लिहला. 'हॅलो मिस्टर डेथ' हा तो लेख. सरळ साधेसोपे गद्य ही त्यांचे बंधू व्यंकटेश यांची ख्यातीच होती. पण या लेखात गदिमांनी बोट न दाखवता मिस्टर डेथ यांचे जे काही केले आहे ते गद्य-काव्यच आहे. त्यांचा पिंड कवीचा होता. कवीत तत्वज्ञ ही असतोच.

Page No.
Date

# बामणाचा पत्रा - ग. दि. माडगूळकर.

गावंदरी मळ्यातील आमच्या झोपडीला गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्त नाव दिले आहे - 'बामणाचा पत्रा'!

गावातील सर्व घरे धाब्याची आहेत, आमच्या या झोपडीच्या माथ्यावरच फक्त पत्रा आहे. वैशिष्ट्याच्या उल्लेखाने वस्तूची ओळख जमद पटते. माळावरचा ज्ञानोबा, निराचा सोपाना, ढांगुळा सीताराम.... तसाच हा 'बामणाचा पत्रा'!

आमच्या गावंदरीचा मळा 'पाव' या नावाने ओळखला जातो. शहरातल्या मुली वेणीला बांधतात तसल्या काळ्या रिबीनसारखी ही एक लांबच लांब जमिनीची पट्टी आहे. ओली अधिक आहे, सुकी कमी आहे. मळ्याच्या मधोमध पूर्वाभिमुख बांधलेली एक छोटी पाच खणांची झोपडी आहे. गांधीवधाच्या दंगलीत आमच्या गावातील सर्व ब्राम्हणांची घरे जळाली. गावात नांदायचे तर ती पुन्हा बांधणे आवश्यक झाले. जाळणाऱ्यांच्याच मदतीने माझ्या धाकट्या भावाने आमचे घर पुन्हा बांधले. त्या बांधकामाच्या निमित्ताने बरेच सामान आणले गेले. त्यातल्या उर्वरित सामानातून ही झोपडी उभी राहिली. मूळ बांधताना त्याने हा जनावरांचा गोठा म्हणून बांधला. घरात वर्दळ फार; म्हणून एक साल मी या झोपडीत मुक्काम केला आणि त्या गुरांच्या झोपडीचे मानवी निवासस्थान झाले. १९५० सालच्या जून महिन्यात 'जनाबाई' या प्रभातच्या प्रसिद्ध दिग्दर्शक गोविंदराव घाणेकर विश्रांतीसाठी म्हणून माझ्याबरोबर माडगूळला आले. तीन-चार आठवडे आम्ही त्यावेळी या झोपडीत मुक्काम केला. दळणाऱ्या बायांच्या गीतांनी उजाडणारी येथील सकाळ आणि जनावरांच्या घुंगरनादाने सुपावन येणारी संध्याकाळ आम्हाला अत्यंत रमणीय वाटली. झोपडीतल्या एकांतात आम्ही दोघेच बोलत

बसू लागली. या निर्हेतुक बोलण्यातून पुढे मी लिहिलेल्या 'पेडगावचे शहाणे', 'भाग्याची गोष्ट', या आणि अशा अनेक चित्रपटकथांची बीजे हाती आली. आम्हा दोघांना वाटलं - ही झोपडी केवळ निवासस्थान नाही तर स्फूर्तिस्थान आहे. पाठीमागे चालणारी मोटेची घरघर अवतीभवती प्रत्यक्ष वहाताना दिसणारे हिरवे जीवन.... ईश्वरी निर्मितीच्या अद्भुत साक्षात्काराचं तिथे होत होता! धान्याच्या बीयाप्रमाणे या भूमीत कथाबीजदेखील अंकुरित होतील असं आम्हाला वाटलं. पुण्याच्या 'प्रभात बाउंड' करून आम्ही शेपन्नास रोपे मागवली आणि या झोपडीच्या अवतीभवती वन महोत्सव साजरा करून टाकला. माणसाला सदैव छळून टाकणाऱ्या दुष्काळाने आमची ही हौस मधल्या दुष्काळातच नवकल्पच पार भस्मसात करून टाकली. रातराणी, मधुमालती, गुलाब ही फुलझाडे नामशेष झाली. ओढ्याने कधीच मूळ धरलं नाही. पेरू फळाला येऊन कोळपले. चिकूच्या झाडांना पाणी मुळातच कमी पडलं नाही म्हणायला गुलमोहराच्या आठ-दहा रोपांनी मात्र आपली चिकाटी सोडली नाही हं. हे गुलमोहराचे वृक्ष आजमितीला तिथे उभे आहेत. त्यांची चैत्रातली रंगपंचमी आम्हाला क्वचित पाहायला मिळते. पण गावात राहणारे माझे पुतणे आपण गुलमोहराच्या फुलांतील खोबरे खाल्ल्याची साक्ष सदैव देतात

माझ्या येण्याची वार्ता लागताच आमच्या मळ्यावरील मुधरीण (बामणाच्या पत्र्या) खालील जमीन मेहराच्या हिस्यागार निशाने सारवून घेते. मोटर स्टँडवरून आणलेले माझे आणि माझ्या मित्रांचे सामान रामोशाची पोरे व्यवस्थितपणे लावून ठेवतात. आल्याच्या भेटीनंतर नाबडतोब मी झोपडीच्या भेटीला येतो. भर उन्हातदेखील या झोपडीच्या दर्शनाने माझे डोळे थंड होतात. केवळ तीनच बाजूला भिंती असल्यामुळे झोपडीचे

स्वरूप एखाद्या धर्मशाळेसारखे दिसते. पाठभिंतीला असलेल्या खुंट्यावर नाडा, सौंदर, आपत्या इत्यादी शेतीच्या वस्तू लटकत असतात. कोनाड्यातून बी-बियाणांची गाडगी मृगाची वाट पाहत थांबलेली असतात. मी तिथे गेलो की तिथल्या या वस्तू अदृश्य होतात. खुंट्यावर कुडक इस्त्रीचे सदरे कोट जाकिटे लटकू लागतात. कोनाड्यातल्या बियाणांच्या जागा संदर्भग्रंथ घेतात. गोठा म्हणून बांधलेल्या या जागेवर गादी-तक्क्यांची सुरेख बैठक ठाण मांडते. नसूतसूने वाढत असलेल्या पिकाला आणि उगवत्या-मावळत्या नारायणाला साक्षी ठेवून मी येथे माझे लेखन सुरू करतो.

झोपडीला दार मुळीच नसल्यामुळे आपण मुक्त आहोत याची सुखद जाण मनात सदैव राहते. उघड्या असल्यामुळे पहाटेचा गार वारा सरळ अंगावर येतो आणि जागवतो. अंथरुणावर उठून बसलो की पूर्वाकाशात प्रकाशत असलेला शुक्र पहिले दर्शन देतो. गावात चाललेल्या जात्यावरील ओव्या झोपलेल्या कवित्वशक्तीला जागे करतात. पहाटे वाऱ्यावर येणारा वाढत्या पिकांचा वास हिरव्या चाफ्याच्या वासासारखा उत्तेजक वाटतो. ते सारे वातावरणच असे असते की पुन्हा झोप नको वाटते. अशा वेळी मी मुक्टाच उठून उभ्या पिकांतून हिंडून येतो. दवात भिजलेली जोंधळ्याची पाने पायाला आहि मादक स्पर्श करतात. ओला हरभरा मज गमतीदार चव काढतो. तर करडईची काटेरी झोंबाडे पायावर पांढऱ्या आणि बोचऱ्या रेघोट्या मारतात.

झोपडीमागील विहिरीचे पाणी पहाटे पहाटे अगदी गरम असते. झुंजुरक्याच्या प्रकाशात त्यातून निघत असलेल्या वाफादेखील नजरेस पडतात. सुळकांडी मारण्यात जी

आनंद असतो. तो भोगल्यावाचून कळणार नाही. सुस्नात अवस्थेत परत झोपडीवर येईतोपर्यंत सूर्य उगवून येतो. रानारानातून शेतकऱ्यांच्या हालचाली सुरु होतात. मी बैठकीवर येतो आणि लिखाणास प्रारंभ करतो. एकांताच्या परिणामामुळे असो की बीज अंकुरीत करण्याच्या त्या भूमिच्या सामर्थ्यामुळे असो डोक्यातल्या कल्पना साकार होण्यासाठी धडपडू लागतात. माझे लेखन सुरु होते. कधी मी स्वतः लिहितो कधी मी सांगून बरोबरीच्या सहकारी ते उतरवून घेतो. लिहिण्याचे व सांगण्याचे काम एकदा सुरु झाले की मग ते अडखळत नाही. विचारांची चाती फिरत राहते. मेंदू कापसासारख्या हलका आणि फुगीर होतो. कथानकाचा पिळदार धागा अतूटपणे निघत राहतो. मध्येच घराकडून न्याहारी येते. त्यात बाजरीची खरपूस भाकरी लसणीची खमंग चटणी. सोबत सोयीचे दही असा खास ग्रामीण वस्तू असतात. त्यांच्या सेवनाने पोट आहारात नाही की कंटाळा आसपास फिरकत नाही. न्याहारीच्या वेळी सोडलेले बैल पुन्हा शिवळ खांद्यावर घेतात तसा मेंदू पुन्हा विचाराखाली मान देतो आणि लिखाणाचे काम निष्ठेने सुरु होते.

झोपडी पूर्वाभिमुख असल्यामुळे सूर्याचा उष्ण उजेड विचारांना आणखीच चैतन्य देतो. अंगाला चटके बसू लागतोपर्यंत कामाचा वेग आवरत नाही.

दुपार मात्र पोळू लागते. पुन्हा स्नानाची आवश्यकता भासू लागते. सकाळी गरम असलेले विहिरीचे पाणी दुपारी केळीच्या कांड्यासारखे थंडगार होते. डोळे तांबडेलाल होईपर्यंत मी त्यात डुंबत राहतो. नंतर घरून जेवणाचे बोलावणे येते. आपल्या स्वतःच्या रानात पिकलेल्या शाळूची पांढरीशुभ्र भाकरी, उसातल्या पालेभाज्या, घरच्या गाई-म्हशींचे दूधदुभते. मावळात पिकणाऱ्या गुलाबी तांदळाचा चवदार भात आणि

SDS Page No.
Date

वाढणारी प्रत्यक्ष आई! जगातल्या कुठल्याही पक्वान्नाने येणार नाही इतकी तृप्ततृप्ती त्या जेवणाने येते. मेहनते विचारही हातपाय पसरतात. त्यांना धावपळ नको वाटते. घरात उकाडा होत असतो. रानातला पत्रादेखील त्यावेळी नव्यासारख्या नापतो. पाटाच्या कडेला उभ्या असलेल्या गुलमोहराच्या गार सावलीचे आकर्षण अशा वेळी मला झोपडीपर्यंत जाऊ देत नाही. उजव्या हाताची उशी करून मी मातीतच आडवा होतो. त्या भूमीतली ढेकळे मला रुतत नाहीत. खडे टोचत नाहीत. झोप अगदी ~~स्वस्थ~~ गाढ लागते.

चार-साडेचार वाजता उन्हे खालती होतात. कुठूनतरी कुणाला तरी कुणीतरी मारत असलेल्या हाका ऐकू येत असतात. मग आपोआप जाग येते. ~~असतात~~. गावातली माणसे भेटल्या त्यांच्या हातात धरून बोलत बोलत झोपडीकडे येतात. गावात घडून गेलेल्या घटनांवर बातचीत करीत ती माणसे सांजड पडेपर्यंत बसून राहतात. पाच-साडेपाच वाजता सूर्य मावळतीला जातो. सांज पडते. रानातली गुरे परतू लागतात. कुंभाराच्या लिंबावर कावळ्यांचे संमेलन भरते. पांढऱ्या बगळ्यांचा थवा आकाश उल्लंघून जाताना दिसतो. मग मी फिरायला म्हणून उठतो. बोलत बसलेली मंडळीही बरोबर येतात. त्यांच्या सुखदुःखाच्या कहाण्यांतून अनेक कथाबीजे निर्माण होतात. पुढल्या मृगासाठी म्हणून ते बियाणे मी माझ्या ओच्यात साठवून ठेवतो.

किर्र रात्र होते. घराघरातून दिवे लुकलुकू लागतात तो अंधार भयाण वाटत नाही. शांत. आल्हाददायक वाटतो.

गावातून जेवणखाण आटोपून आठ-साडेआठ वाजता मी पुन्हा झोपडीत येतो. मध्ये पूर्णपणे विसरलेला बिछान्याचा जागा उरल्यासारखा विनासायास सापडतो.

SDS Page No.
Date

पुन्हा काम सुरु होते.

नित्यनियमाने पऱ्यावर झोपायला येणारी मंडळी घोंगड्याच्या खोळी पांघरुन वेताबेताने येत राहतात. कंदिलाच्या प्रकाशात माझे लिहिणे अगर सांगणे चालूच असते. त्यांच्या येण्याने त्यात अंतराय येत नाही. ते माझ्याशी काही बोलत नाहीत, मी त्यांच्याशी काही बोलत नाहीत. झोपडीच्या जोत्याच्या टोकावर ते अशीच घोंगडी पांघरुन बसून राहतात. नासा - अर्ध्या तासाने बसल्या जागीच कलंडतात. गाढ झोपी जातात. पुष्कळ वेळ, मी माझे लिखाण, माझा लेखक पुढल्याचेच अस्तित्व मला भासत राहते. कंदिलावर येणाऱ्या पाखरांची फडफड होते. एक विचार दुसऱ्या विचारात गुंततांना जणू कुड्यांचा खटका वाजत राहतो.

एखादा महत्त्वाचा भाग आकारला येतो डोळे चुरचुरु लागतात, तेव्हा आता झोपावे म्हणून मी अंगाला आळोखेपिळोखे देतो. झोपडीत दहा - वीस वीस गडी अवतीभवती झोपलेले दिसतात. वातावरण अगदी निःशब्द शांतीने असते. गावात गस्त घालणाऱ्या माणसाची एखादी हरळी, कुत्र्यांनी केलेला गलगा एखादा आवाज आला तर ऐकू येतो. नाहीतर सारे चिडीचीप झालेले असते.

हाती असलेले माझे काम आटोक्यात आले आहे, ही बातमी घरच्या कुणा माणसाकडून गावात कुठे आणि मग एखाद्या दिवशी रात्री जेवून हरळ्या देत बंडूकाका झोपडीवर येतो. बाकीच्या गावकऱ्यांसारखा तो गुपचूप येऊन झोपत नाही; मला तर तो हलवून जागे करतो. बंडूकाकाच्या येण्याने झोपडीतला आनंद अधिकच वाढतो. अर्ध्या रात्रीदेखील त्याच्या कथा सुरु होतात. त्याची सांगण्याची पद्धत इतकी रसाळ असते की शहरातून आलेली माझी

मित्रमंडळी आमीत्चन जागरण करून त्याच्या कथा ऐकत राहतात.

दुसऱ्या दिवशी माझा अगदी जुना बालमित्र शेजारच्या आटपाडी गावाहून माझ्या भेटीला येतो. तो स्वतःची दुःस्थिती कधी सांगत नाही. माझ्या प्रगतीचीच विचारणा करीत राहतो. माझ्या उत्कर्षाचा आनंद त्याच्या डोळ्यांत लुकलुकत राहतो माझ्यापासून त्याला कसलीही अपेक्षा नसते. आपल्या दरिद्री आयुष्यातील चार दिवस तो माझ्या संगतीत सुखात काढतो. माझा अधिक उत्कर्ष व्हावा असे मनोमन इच्छून एका सकाळी अनवाणी पायांनी निघून जातो. त्याच्या किंवा आणखी कुणाच्याही आगमनाने माझ्या लिहिण्याच्या कामात खंड पडत नाही. शेतकऱ्यांची कामे जितक्या ठरीव पद्धतीने माझे नित्य लिखाण संपते.

माझे काम संपले हे कळल्यावर मग रानातले गडी हुरड्याच्या कणसांना हात घालतात. भल्या सकाळी हुरडा भाजला जातो. हुळा होरपळला जातो. रताळ्याच्या होड्या उकडल्या जातात. शेता-शेतांवरून हुरड्यासाठी निमंत्रणे येतात. दरवेशांची मुले डफ-तुणतुणे घेऊन हजर होतात. आटपाडीहून 'किट्सन'ची बत्ती आणवली जाते आणि 'बामणाच्या पत्त्यात' दरवेशांच्या पोरांच्या भावण्या रंगतात. त्या भावण्यांचे विषय शृंगारिक नसतात. कृष्ण-अर्जुन, माया-ब्रह्म, गीता तत्त्वज्ञान अशा अवघड विषयांना त्या मुखरित करतात.

ठरलेला वेळ संपून जातो आणि मला परत निघण्याची सिद्धता करावी लागते. दरवेळी मला गाव सोडताना भडभडून येते. रानातल्या झोपडीत घेतलेला शांततेचा आनंद आणि तयार झालेली चित्रकथा बरोबर घेऊन मी पुन्हा गजबजलेल्या शहराकडे निघतो. सासरी निघालेल्या लेकीला करवून घालतात.

Page No.
Date

नक्षा पाठवणीच्या पायवड्या आणि मुरडींचे कामवले आई मला करून घालते. ~~✗~~

शक्य तितक्या लवकरच परत यावे असे ठरवून मी पुन्हा कुसटीस बसतो. दरवेळी मला निरोप द्यायला अर्धा गाव कुंभाराच्या लिंबाखाली जमा होतो. मोठ्या कष्टाने मी गावची शीव ओलांडतो. माझा मुक्काम हलल्यावर रानातल्या झोपडीची अवस्था कापणी झालेल्या रानासारखी होते.

शुभ्र बैठक, इस्त्रीचे कपडे, इंग्रजी मराठी ग्रंथ नियतकालिके सारे सारे तिथून नाहीसे होते. ~~✗~~ काही दिवस वाङ्मयीन निर्मितीकडे कौतुकाने पाहत असे राहिलेला तो 'बामणाचा पट्टा' पुन्हा निसर्गाच्या निर्मितीकडे आपले डोळे वळवतो.

मी शहरात येऊन आपल्या कामाला लागतो. शहरातल्या धबडग्याच्या कोंडाळा येतो. जीव आंबतो. भिंतीणी सुन्नसे होते. समोर असलेल्या कोऱ्या कागदावर अक्षरे उमटत नाही. ~~✗~~ माझ्या स्मरणीतून अभावितपणे एक रेखाचित्र उमटू लागते. तीन भिंती, वर पत्रा, मागेपुढे गुलमोहराची झाडे, अवतीभवती वाढणारी शेती 'बामणाच्या पट्ट्या' ची आठवण करीत करीत मी माझ्या प्रतिभाशक्तीला वचने देत राहतो - "आता वर्ष संपले की पुन्हा जाऊ बामणाच्या पट्ट्यावर!"

classmate
Date :
Page :

राम गणेश गडकरी :-

[ टोपणनावे :- गोविंदाग्रज, बाळकराम ] [मे २६, इ.स. १८८५ : नवसारी, गुजरात - जानेवारी २३, इ.स. १९१९ : सावनेर ] हे मराठी कवी नाटककार, आणि विनोदी लेखक होते. गोविंदाग्रज ह्या टोपणनावाने त्यांनी सुमारे १५० कविता लिहिल्या आणि बाळकराम ह्या टोपणनावाने काही विनोदी लेख लिहिले. ह्या साहित्याच्या जोडीला 'एकच प्याला', 'प्रेमसंन्यास,' 'पुण्यप्रभाव,' आणि 'भावबंधन' ही चार पूर्ण नाटके [ आणि 'राजसंन्यास' आणि 'वेड्यांचा बाजार ही दोन अपुरी राहिलेली नाटके ] लिहून गडकरींनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

राम गणेश गडकरी यांना महाराष्ट्राचा 'शेक्सपियर' समजले जाते.

विविध नाट्यप्रेमी संस्थांनी, राम गणेश यांच्या आणि त्यांची पत्नी रमाबाई यांच्या नावाने नाटककारांसाठी आणि नाट्याभिनयासाठी अनेक गडकरी पुरस्कार ठेवले आहेत.

नागपूरला 'राम गणेश गडकरी' या नावाचा एक सहकारी साखर कारखाना आहे.

2

CLASSMATE
Date :
Page :

* राम गणेश गडकरी यांच्या जीवनावर व साहित्यावर लिहिली गेलेली पुस्तके :-

1) अप्रकाशित गडकरी - [ आचार्य अत्रे , १९६२ ]

2) कवी गोविंदाग्रज - [ भ. श्री. पंडित ]

3) किर्लोस्कर, देवल, गडकरी यांच्या नाट्यकृतीचे मूल्यमापन व रसग्रहण - [ ना. सी. फडके ]

4) गडकरी, ह्यांच्या आठवणी - [ गो. गो. अधिकारी ]

5) गडकरी, व्यक्ती आणि वाङ्मय - [ वि. स. खांडेकर, [ १९३२ ]

6) गडकरी - सर्वस्व - [ आचार्य अत्रे ]

7) गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी - [ वसंत वरखेडकर ]

8) गडकऱ्यांची नाट्य शैली - [ कृ. पा. पाजणकर ]

9) गडकऱ्यांची नाट्य सृष्टी - [ वसंत शांताराम देसाई ]

10) गडकऱ्यांचा वाग्विलास - [ पां. ग. क्षीरसागर ]

11) गडकऱ्यांचा विनोद - [ शि. गो. भावे ]

3

CLASSMATE
Date :
Page :

12] गडकऱ्यांची संसार नाटके - [ त्र्यं. वि. सरदेशमुख ]

13] गडकऱ्यांचे म अंतरंग - [ श्री. शं. वाकिंबे ]

14] गोविंदाग्रज - [ श्री. ग. हर्षे ]

15] गोविंदाग्रज शैली : स्वरुप व समीक्षा
[ डॉ. सुरेश भृगुवार ]

16] गोविंदाग्रज समीक्षा [ अक्षय कुमार काळे ] या
पुस्तकाचे प्रकाशन १९८५ साली वसंत दादा
पाटील यांच्या हस्ते झाले होते.

17] गोविंदाग्रज - समीक्षा [ साहित्य समीक्षा ] :-
लेखक - उल्हास कोल्हटकर

18] नाट्यस्वरुप गडकरी - [ श्री. ना. सहस्त्रबुद्धे ]

19] प्रभिभावंत राम गणेश गडकरी - [ डॉ. नीला पांढरे ]

20] प्रतिभासम्राट राम गणेश गडकरी -
[ माधव यशवंत गडकरी ]

21] संगीत भाव बंधन नाटकावरील टीका - [ वा. ह. धारपुरे ]

22] मराठी नाटक .... राम गणेश गडकरी [ ललित
कुंभोजकर ]

classmate
Date :
Page :

23] राम गणेश गडकरी - [ चिं. ग. कोल्हटकर ]

24] कै. राम गणेश गडकरी यांच्या आठवणी -
[प्रभाकर सीताराम गडकरी]
[१९३८ व १९४४]

25] राम-सुधा अथवा गडकऱ्यांच्या नाटकातील सुभाषिते - [समुंत जोशी]

26] राष्ट्रीय चरित्र माला - राम गणेश गडकरी
[चरित्र, १९८२].

CLASSMATE
Date :
Page:

सुधीर फडके [बाबुजी] यांची गाणी ....

1] धुंदी कळ्यांना

2] फिटे अंधाराचे जाळे

3] चंद्र आहे साक्षीला

4] कशी नशिबाने थट्टा आज मांडली

5] बाई मी विकत घेतला श्याम

6] सखी मंद झाल्या तारका

7] तोच चंद्रमा नभात

8] आकाशी झेप घेरे पाखरा

9] एक धागा सुखाचा

10] नवीन आज चंद्रमा

11] अशी पाखरे येती.

12] तुझे गीत गाण्यासाठी

13] आज प्रितीला पंख हे.

14] आज राणी पूर्वीची प्रीत.

15] स्वये श्री रामप्रभू ऐकती

16] धुंद एकांत हा

17] नमोस्तु गौतमा

18] तुला ना कळाले

19] प्रिया आज माझी नसे साथ दयाया.

20] जे वेड मजला लागले.

21] मानवतेचे मंदिर माझे

22] त्या तारुतली विसरले गीत

23] डाव मोडू नको

24] स्वर आले धरुनी

25] जग हे बंधीशाले

26] रुपास भाळलो मी

27] दाम करी काम

28] अंतरीच्या गुढ गरभी

29] तुझ्या गळा माझ्या गळा.

Classmate
Date :
Page :

30) आज चंदन उन्हात हसते.

31) दान दिल्याने ज्ञान वाढते.

32) मधुराणी तुला सांगु का.

33) स्वप्नात रंगले मी.

34) असा नेसुन शालू हिरवा

35) शक्ती मंद झाल्या तारखा

36) दिसलीस तू फुलले ऋतू

37) भावभिकाल आढावर

38) पावसात नाहती.

39) धुंद येथे मी.

40) डोळ्यामधले आसू.

41) तुझे गीत गाण्यासाठी

42) माझ्या रे प्रीती फुला

43) त्याला जिव्हाळा शब्दच खोटे.

44) रवी आले होते.

45] एकावर पंखा वरुनी

46] विसर प्रीत विसर गीत

47] प्रेम गीत अळवीता

48] आकाशी झेप घेरे पाखरा.

49] नाम होते मुखी राखवाचे

50] डोळयात वाच्य माझ्या

51] ये मिलनी रात्र ही रंगली

52] गेलीस सोडुनी का.

53] बघत राहु दे

54] पडद्या लाजेच्या लाजेच्या

55] तुझी माझी प्रीत जगावेगळी

56] जय जयकार करा.

57] कसा ग विसरु तो क्षणाला

58] भंगलेल्या या स्मृतींना

59] बोलत नाही वीणा.

CLASSMATE
Date :
Page :

60] एक एक एकाक

61] ते स्वप्न भाव वेडे.

62] ज्ञान उजळा जगी.

63] हाती नवीन येणे.

64] तुला या कुळाची शपथ

65] स्त्री जन्म ही तुझी कहाणी.

66] दर्यात होडी हाकर

67] अंतरंगी गुढगारथी

68] कामा पुरता मामा

69] यशवंत हो जयवंत हो.

70] बाजार फुलांचा भरला

71] रात चांदणी

72] उमलती एक नवीन भावना

73] इवल्या इवल्या वाळूचे

74] उगी उगी रे उगी.

75] हा हात प्राण नाथ

76] तांबुस गोरा हात साजीरा

77] आधी कळस मग पयारे

78] हा माझा मार्ग एकला

79] सुर गेले दुर आता

80] चल सोडुन हा देश

81] मुसाफिरा रे जा

82] जा शोध जा किनारा

83] सं[illegible]ाळ्याला पैसा दे आता.

84] चंद्रातुनी तुझेया या.

85] विकल साज वेळी

86] अपराध मीच केला

87] आता हो भावजी

88] लाडकी शकुंतला

89] अशी न राहिली रात.

९८

९०) उकाळलेली रात राया.

९१) जगाला नाही रे मंजुर

९२) पथ शिवा हो पथ शिवा

९३) नीज माझ्या सोनुल्या

९४) जगी पैशाला भाव

९५) तु नजरेने हो म्हंटले

९६) बिन भिंतीची उघडी शाळा

९७) तु अन मी...

९८) ससा उपजला कसा

९९) अय्याबाई इश्श बाई

१००) थुंकू येथे मी.

# महाराष्ट्राचे वाल्मिकी : ग. दि. माडगूळकर.

आपल्या अलौकिक लेखणीतून काव्यांचे सप्तरंगी इंद्रधनुष्य स्मय आविष्कार निर्माण करून जन मानसातील नभांगणात पूर्ण चंद्राप्रमाणे स्थान असलेले थोर व्यक्तीमत्व म्हणजेच गदिमा! या तीन अक्षरांत साहित्य, चित्रपट कथा, काव्य या त्रिवेणीचा संगम झाला आहे. सांगली जिल्ह्यातील शेटफळ या खेडेगावात बुधवार दिनांक १ ऑक्टोबर १९१९ रोजी सरस्वती आवाहनाच्या दिवशी या सारस्वताचा जन्म झाला. त्यांचे वडील कै. दिगंबर बळवंत माडगूळकर हे औंध संस्थानात कारकुनी करत होते. मातोश्री बनुताई या सुसंस्कृत व गृहकृत्यदक्ष होत्या. गदिमा बालपणापासूनच हुशार असून जरा मिस्किल होते. त्यांची एक आठवण म्हणजे एकदा एका इसमाने त्यांना वडिलांचे नाव विचारले. त्यावर ते उत्तरले, दिगंबर बळवंत माडगुळकर सब जज म्हातारा आणि औंधचा राजा म्हातारा।

बालपण गरिबीत गेले. औंधच्या शेटफळ गावाच्या शाळेत त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. यानंतर पुढील शिक्षण ते आटपाडी, कुंडल, औंध या शाळांमध्ये पूर्ण केले. मॅट्रिकच्या परिक्षेत गणितात अपयश आल्याने शिक्षणाचा नाद त्यांनी सोडला. त्यानंतर ते कोल्हापूरला आले. तेथे मास्टर विनायकांच्या हंस पिक्चरमध्ये ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांचे लेखनिक झाले. त्याच काळात त्यांना वाचनाची गोडी लागली. दि ११ मे १९४२ रोजी त्यांचा विवाह कै. दिनकर गणेश पाटणकर यांची कन्या पद्मजा यांच्याशी दैवज्ञ बोर्डिंग, हाऊस टॉकीज जवळ, कोल्हापूरच्या मंगलवार पेठेत झाला. व कुमारी पद्मा दिनकर पाटणकर या सौ. विद्या गजानन माडगुळकर झाल्या. या उभयतांना कल्पलता, श्रीधर, शरत्कुमार दीपा व शुभदा ही अपत्ये झाली. पुढे आचार्य अत्रेंच्या नवयुग चित्रसंस्थेत के. नारायण काळे यांच्या हाताखाली दिग्दर्शन व पटकथालेखनाचे धडे घेतले. याच सुमारास त्यांच्या काव्यांचा श्रीगणेशा झाला.

त्यांचे काव्य म्हणजे प्रस्तादचा तेजस्वी ताऱ्याप्रमाणे असून त्यांनी पुढे आलेली गीते म्हणजे जणू पौर्णिमेचे चांदणे! भक्त दामाजी, पहिला पाळणा या चित्रपटासाठी लिहलेली गीते ही अवीट गोडीच होती. रामजोशी चित्रपटातही गीतांबरोबर संवाद, पटकथा लिहिली. प्राचिन मराठी गीत परंपरेचा, संत - पंडित - शाहिरांचा त्यांना लाभला होता. त्यांचा गीतांची वैशिष्ट्ये म्हणजे ती लयबद्ध, नादमधूर, थोर असल्यामुळे त्या गीतांना एक प्रकारचा गोडवा लाभला होता. पुढे त्यांनी कथा, पटकथा

कादंबरी, नाटक असा साहित्याच्या क्षेत्रात लिलया संचार केला. पण ते गीतकार म्हणूनच आजरामर झाले. सुगंधी वीणा, जोगिया, चार संगिलिका, काव्यकथा, चैत्रबन, गीतगोपाल, गीतसौभद्र, कृष्णाची करंगळी, तुपाचा नंदादीप, चंदनी उदबत्ती असे १० कथासंग्रह, आकाशाची फळे, उभे धागे आडवे धागे या कादंबऱ्या मंतरलेले दिवस, वाटेवरल्या सावल्या, तीळ आणि तांदूळ हे ललित लेखन, युद्धाच्या सावल्या हे नाटक अशा साहित्य प्रकारचे लेखन त्यांनी केले.

वाल्या कोळ्याचा वाल्मिकी झाला तसे रामायणाचे गीत रामायण मध्ये रूपांतर करून ते महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी झाले. या गीत रामायणामध्ये ५६ बहारदार, प्रसादिक गीते त्यांनी लिहिली आणि ती महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये पोहोचवली. कै. सुधीर फडके यांनी ही सारी गीते आपल्या संगीताने आणि गायनाने आजरामर केली. दि. १ एप्रिल १९५५ (रामनवमी) पासून गीत रामायण आकाशवाणी पुणे वर सादर झाले. आणि बाबुजींचा आवाज आणि अण्णांची गीते घराघरात गाईली गेली.

यांची एक आठवण इथे सांगाविशी वाटते. एकदा गदिमा पंचवटीच्या मागच्या अंगणात असलेल्या तुळशीच्या कट्ट्याजवळच्या पारावर बसले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या गीताचे ध्वनीमुद्रण होते. गीत काही केल्या जमेना. त्या म्हणाल्या,

का हो! झाला की नाही रामजन्म!

एकदा गदिमांना चित्रकार सत्येन टण्णू यांचा फोन आला. विचारले तर म्हणाले, मी चित्रकार सत्येन टण्णू बोललोय! ते म्हणाले बोला! मी माडगुळकर अण्णू बोलतोय! असा विनोद त्यांनी केला.

गदिमांचा काव्यलेखनाबरोबर स्वातंत्र्य संग्रामातही सहभाग होता. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारामध्ये ते सहभागी झाले. त्यांनी लोकजागृती करता गीते लिहिली. ते उत्तम अभिनेता होते.

त्यांनी वऱ्हाडी आणि वाजंत्री, पुढचं पाऊल, भाग्याची गोष्ट, पेडगावचे शहाणे इत्यादी चित्रपटांतून भूमिका केल्या होत्या. हिंदीतूनही त्यांनी दो आँखे बारह हात, तुफान और दिया, गुंज उठी शहनाईया या चित्रपटांच्या पटकथा लिहिल्या होत्या. १९७३ मध्ये यवतमाळ येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या चैत्रबन, जोगिया, मंतरलेले दिवस या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्त झाले.

गदिमांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले गेले. महाराष्ट्र विधान परिषदेवर त्यांना सन्माननीय सदस्यत्व मिळाले होते.

बुधवार दिनांक १४ डिसेंबर १९७७ रोजी त्यांच्या पुण्यात कर्तृत्ववान मातांचा सत्कार आयोजित केला होता. गदिमांची त्या वेळी तब्येत बरी नव्हती. सायंकाळी त्यांच्या मातोश्री, व त्यांचे बंधु सत्कार घेण्यासाठी निघाले; व परंतु बनुताईंच्या सत्काराच्या वेळीच त्यांची प्राणज्योत मालवली. गदिमा गेले सगळीकडे बातमी पसरली. अनेकांनी ११, पंचवटी वाकडे वाडी. येथे अर्दि गर्दी केली होती.

गदिमा आज आपल्यामध्ये नसले तरी. त्यांच्या साहित्यातून, गीतरामायणातून अजरामर ठरले आहेत.

# पहिली रेकॉर्ड झाली

माझ्या आयुष्यातले चढउतार दाखवणारे जे टप्पे आहेत, ज्यांना 'माइलस्टोन्स' म्हणतात, त्यांत कऱ्हाड गावाला सर्वाधिक महत्त्वाचं स्थान आहे. मालेगावनं भयाण अंधाराच्या गर्तेतून बाहेर काढणारा प्रकाशाचा एक लहानसा किरण दाखवला होता. पण कऱ्हाड पुन्हा एकदा भयानक निराशेच्या दरीत लोटलं. मी ओगलेवाडीला आणि कऱ्हाडला उतरलोच नसतो, तर माझं आजारपण कदाचित मुंबई-कलकत्ता प्रवासात किंवा कलकत्त्यात आलं असतं. आणि यांपैकी काहीही घडलं असतं. तरी मी कलकत्त्यात राहिलो असतो.

आज त्या वेळची मनःस्थिती मला जशीच्या तशी आठवते. पाच-साडेपाच वर्षांपूर्वी मी कोल्हापूर सोडलं. ते सोन्या भावावर भर नको, याबरोबरच पिकतं तिथं विकत नाही. या अनुभवामुळे. त्या वेळी मी निर्विकारपणानं कोल्हापूर सोडलं होतं. पाच-साडेपाच वर्षं नाना तऱ्हेच्या बऱ्यावाईट प्रसंगांतून गेलो होतो. या काळात आशानिराशेचे अनेक फेरे माझ्याभोवती विणले गेले. गुदमरून जाणं आणि मोकळा श्वास घेणं या अवस्था अनेक वेळा येऊन गेल्या. या सगळ्या अवस्थांतून नियतीनं मला शेवटी कलकत्त्यात आणून सोडलं होतं. आशानिराशेचा खेळ आता संपला. असा विश्वास मला कलकत्त्यात निर्माण झाला न झाला. तोच पुन्हा मी कोल्हापुरात येऊन पडलो. चार-सहा दिवस काय करावं. या विचारानं डोकं भणाणून गेलं होतं. शेवटी मनाशी निश्चय केला की पुन्हा कलकत्त्यालाच जायचं. जिथं नशिबानं पहिल्याप्रथम अनुकूल कौल दिला. तिथंच पुन्हा प्रयत्न करायचा. काही दिवस थोडेसे हाल होतील, पण त्यांची पर्वा करायची नाही.

ज्या दिवशी हा माझा निश्चय मी दादाला सांगितला, त्याच दिवशी माझ्याच शेजारी राहणारा माझा एक बालमित्र माधव पातकर एक कविता घेऊन माझ्याकडे आला. माझ्या त्या आयुष्याकडं आज पाहिलं, की मला मोठी गंमत वाटते. ज्या नियतीनं मला कलकत्त्याहून कोल्हापुरात परत फेकून दिलं, ती नियती त्याच वेळी माझ्याकरता वेगळीच खेळी खेळत होती. त्या खेळीतला एक फासा माधव पातकरच्या रूपानं त्या दिवशी माझ्याकडे आला. पातकर काय म्हणाला, "कलकत्त्याला जाण्यापूर्वी या एका कवितेला चाल लावून देतोस का? इथं 'हिज

# * सुधीर फडके : व्रतस्थ स्वरयात्री *

बडोदा शहरातील राज्याभिषेकाचा सोहळा. सारे शहर विद्युत रोषणाईने सजविलेले होते. मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला होता. ती व्यक्ती मोठ्या आशेने आपल्याला गायला मिळेल, बिदागी मिळेल, म्हणून आली होती; पण संधी नाही मिळाली. आख्खे शहर आनंदात असताना ती व्यक्ती उद्विग्न, विमनस्क मनःस्थितीत होती. या निराशेच्या सुरात एक निर्धारही होता. 'भविष्यात याच शहरात माझा कार्यक्रम होईल, कौतुक व पैसा चालत येईल...' भविष्यात तसेच घडले.

कानपूरच्या कॉलेजात विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमात गायची संधी मिळाली. मित्रांनी कल्पना देऊनही ही व्यक्ती शास्त्रीय संगीत गायली. विद्यार्थ्यांनी केवळ 'हुर्यो' केला नाही तर चक्क पळवून लावले. पोटासाठी त्या व्यक्तीला सुगम संगीताची वाट धरावी लागली अंगात प्रचंड ताप. अखेर स्नेह्यांनी स्वतःच्या बंगल्यात विश्रांतीसाठी बोलावले. गया ते मोगलसराई हा प्रवास रेल्वेने फर्स्टक्लासने आयुष्यात प्रथमच केला. या विश्रांतीच्या काळात या कलाकाराला या बंगल्यात खऱ्या अर्थाने खजिना प्राप्त झाला. सैगल, काननवाला, के. सी. डे. यांच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका मिळाल्या. जे भावते, ते गळ्यावाटे कसे प्रकट करायचे, हे ऐकून शिकायला मिळाले. त्या वेळी खऱ्या अर्थाने पुनर्जन्म झाला. सुगम संगीतच गायचे ठरविले. बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर यांचे गाणे ऐकून व त्यांची पदे गाऊन गळा अधिक सकस झाला.

'विझलेली वात' या नाटकाला त्यांनी प्रथम संगीत दिले. यातील एक हिंदी गझल अभिनेते नाना पळशीकर यांनी लिहिली होती. या नाटकात बाबूजींनी कामही केले होते. या वेळचा अनुभव सांगताना ते म्हणाले, 'बैराग्याच्या वेशात एका हातात चिपळी व एका हातात चिपळी व दुसऱ्या हातात एकतारी घेऊन गाणे म्हणायचे होते. स्टेजवरून फिरताना चिपळी वाजवावी, तर गाणे म्हणताना गोंधळ होई.

अखेर युवती सुचली. स्टेजवरून अशा पद्धतीने फिरलो, की मकतारी वाजविण्याची अॅक्शन दिसे, त्याचप्रमाणे चिपळीची, त्यामुळे गाण्यावर अधिक ध्यान देऊन नीट गाऊ शकलो. या नाटकाचे २५ ते ३० प्रयोग झाले."

शेकडो गीतांचे संगीत बाबूजींनी दिले आहे. संगीताचे वैशिष्ट्य म्हणजे शब्द व त्याच्या अर्थाला, भावाला अनन्यसाधारण असे महत्व ते देतात. त्यामुळेच शब्द आधी व नंतर चाल की आधी चाल व नंतर शब्द या संदर्भात ते म्हणाले, 'दोन्ही प्रकारांनी मी संगीत दिलेले आहे. अर्थवाही गीत असेल तर संगीतकार जर त्यावर स्वररचना करीत असेल तर मग स्वररचनेवर गीतरचना करायला गीतकाराला काय हरकत आहे? ग. दि. माडगूळकरांसारख्या शब्दप्रभूला हे कधीच अवघड गेले नाही. स्वररचनेला अगदी अनुरूप, त्या मीटरमध्ये बसतील अशा पद्धतीने ते शब्दरचना करीत. याचे उदाहरण म्हणजे 'त्या तिथे पलीकडे तिकडे' ही शब्दरचना आहे. स्वररचनेनुसार त्यात तिकडे हा शब्द शेवटी घेतला व तो चपखलपणे बसला. सांगायचा मुद्दा असा की, शेवटी गीत सुंदर होणे महत्वाचे आहे. त्याचा योग्य परिणाम साधत असेल तर शब्दरचनेवर चाल की चालीवर शब्दरचना हा भाग गौण ठरतो."

"मक खंत वाटते"... बाबूजी सांगतात. "हिंदी चित्रपटसृष्टीत संगीतकार म्हणून जेवढे नाव व्हायला पाहिजे होते, तेवढे झाले नाही. तशी कारकीर्दीची सुरुवात ही हिंदी चित्रपटानेच झाली.

कोल्हापूरला बालपण घालवलेले बाबूजी त्या वेळच्या संस्कारांचे महत्व आजही मनात जपून आहेत. व्यवसायाने वकील असलेले त्यांचे वडील टिळकांचे अभिमानी होते. कोल्हापुरात टिळकांबद्दल अभिमान बाळगणारी माणसे तेव्हा तशी दुर्मिळच होती. कीर्तिकारां-पासून नाट्य व गायक कलावंतांपर्यंत विविध लोकांचा राबता त्यांच्या घरी होता. बाबूजींचे मामादेखील स्वदेशीचे भोक्ते होते. जानाईडीला वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या या मामांकडे साखरेऐवजी गुळाचा चहा प्यायला मिळे. स्वदेशी कपडा वापरण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

या संस्कारापेक्षा अधीक खोलवर संस्कार बाबूजींच्या मनावर झाला तो सावरकर भेटले, त्यावेळी. वडिलांबरोबर ते १९३० मध्ये सावरकरांना भेटले. त्यांना गाणी म्हणून दाखविली. 'गाण्याचा अभ्यास सोडू नकोस' असा उपदेश करून सावरकरांनी स्वतःचे 'मला काय' अथवा त्यांचे 'मोपल्यांचे बंड' हे पुस्तक बाबूजींना बक्षीस म्हणून दिले. या पुस्तकाचा बाबुजींवर खोल परिणाम झाला. व सावरकरराचीत सर्व साहित्य त्यांनी वाचून काढले. त्या काळी सावरकर स्थानबद्तेत होते व त्यांच्या पुस्तकांवर बंदी होती, पण ही पुस्तके गुप्तपणे उपलब्ध होत होती.

गांधी हत्येनंतर १९४८ मध्ये ज्या संघ कार्यकर्त्यांना पकडण्यात आले, त्यांच्या कुटुंबियांना बाबूजींनी मदत केली. त्यासाठी पं. रविशंकर व हिराबाई बडोदेकर यांचा कार्यक्रम लिमये नाट्यगृहात आयोजित केला. कार्यक्रम कशासाठी आयोजित केला आहे, ते समजल्यावर या दोघांनीही मोबदला घेतला नाही. बाबूजींचे चारही बंधू त्या वेळी अटकेत होते. बाबूजी तेवढे बाहेर राहिले. कारण कोल्हापूरला ना. सी. फडके यांचा मुलगा 'सुधीर' यालाच पोलिसांनी पकडले. हाही बाबूजींचा मित्रच होता.

आज बाबूजींचे सारे लक्ष केवळ 'सावरकर' चित्रपटावर केंद्रित झाले आहे. हा चित्रपट पूर्ण झाल्यानंतरच आयुष्यातले एक अत्यंत महत्वाचे कार्य पार पडेल, असे त्यांना वाटते. चित्रपट तयार झाल्यावर सेन्सॉरची अडचण निर्माण झालीच तर त्यासाठी न्यायालयीन लढा देण्याची तयारी त्यांनी आत्ताच करून ठेवली आहे.

# भाड्यापोटी वाद्य गहाण !

सुधीर फडके

एक तंबोरा, एक बजाची पेटी, एक व्हायोलिन, एक बॅग, एक वळकटी या सार्‍या वस्तू माझ्या तीन मित्रांनी, त्यांना मिळालेल्या आदेशाप्रमाणे संघ कार्यालयासमोरच्या चौकात 'वेस्टएंड' (आजच्या 'नाझ') सिनेमासमोरच्या रस्त्यावर आणून ठेवल्या. गाडगीळनं मुकाट्यानं त्याचं स्वतःचं सामान खाली आणलं. मी सुन्नपणानं माझ्या सामानावर बसून राहिलो. मन बाहेर झालं ही घटना इतकी आकस्मिक होती की, कसलाही विचार करायची शक्तीच नाहिशी झाली होती.

दोन-चार मिनिटांत झटकन्यात उठलो. त्या जागेवर प्रभात शाखा सुरू व्हायची वेळ झाली होती. स्वयंसेवक यायला सुरवात झाली होती. त्यांच्यासमोर माझी ही असली शोभा तरीच वाढू देणं योग्य नव्हतं. कुठं जायचं याचा विचार करायच्या आधी हे सगळं सामान कुठं ठेवायचं, हा विचार करायला हवा होता. संघ कार्यालयाच्या शेजारच्या ब्लॉकमध्येच चित्रपट व्यवसायाशी संबंध असलेलं एक ऑफिस होतं. त्या सर्व लोकांशी नेहमीचाच माझा संबंध होता. एक कर्मचारी त्या ऑफिसमध्येच झोपत होता. आमचं सामान खाली आणून रस्त्यावर ठेवलेलं तो पाहत होता. मी सामानावर बसून राहिलेला पाहून तो मदतीला धावून आला. त्याच्या मदतीनं आम्ही आमचं सामान त्या ऑफिसमध्ये नेऊन ठेवलं. त्याला आमच्या परिस्थिती कल्पना आली. त्यानं सांगितलं त्या वेळी अचानक आणलेल्या मदत करणारा हा कर्मचारी गेली अनेक वर्षे 'इंपा' च्या ऑफिसमधील कर्मचारी आहे. मला अनेकवेळा भेटतो.

गाडगीळ आणि मी सडे बाहेर पडलो. जागेच्या शोधात आता मी एकटा नव्हतो. गाडगीळचीही जबाबदारी माझ्यावर होती. त्याला काही उद्योग नव्हता. कुठंतरी नोकरी किंवा काम मिळवायच्या खटपटीत तो होताच पण अजून कुठं काही जमलं नव्हतं. तसा तो माझा कोणी नव्हता. मूळचा शतनमाळचा स्वयंसेवक नशीब काढण्यासाठी मुंबईत आलेला. संघाच्या कार्यालयात राहण्याची सोय झाल्यामुळे हातपाय हलवू शकणारा. स्वभावानं उमदा, खेळकर, माझ्या कल्पनेप्रमाणे मुंबईतली हिंदू कॉलनीची शाखा त्यानं सुरू केली. त्याच्यावर ही परिस्थिती आली. ती केवळ तो मला साथ देत होता म्हणून कार्यालय टिकून राहण्यासाठी. ते कार्यालय भाडेकरू म्हणून श्री. गोपाळराव येरकुंटवारांच्या नावावर असल्यामुळे.

त्यांचं नाव बदनाम न व्हावं यासाठी चाललेली धडपड, त्यातून उद्भवलेला शेवटचा प्रेमप्रसंग, त्याचा परिणाम म्हणून माझं हार आणि माझी माणसं पूर्णपणे तुटणं हे सगळं तो पाहत होता. त्याला याचं वाईट वाटत होतं.

माझ्यासारखी परिस्थिती आणि कुणावर येऊ नये. म्हणून इतर कार्यकर्त्यांना जागं करण्यासाठी माझ्या प्रयत्नात तोही मनापासून मला साथ करीत होता. त्याच्या या 'भयंकर' अपराधांमुळेच त्यालाही माझ्याबरोबर ही शिक्षा भोगावी लागली. ही. म्हणजेच चुका दृष्टीने अप्रत्यक्षपणे. का होईना, त्याला ह्या परिस्थितीत आणायला मीच कारणीभूत होतो. आता त्याची काळजीही मलाच घ्यायला हवी होती.

# सुधीर फडके नावाचं गाणं

सुधीर मोघे.

मी मॅट्रिकच्या वर्गाच्या आसपास असताना भावगीताचं क्षेत्र गजाननं वाटवे यांनी व्यापून टाकलं होत. वाटवे किंवा त्यांचं अनुकरणं करणारे गायक म्हणजेच मराठी भावगीत. असं समीकरण त्या काळात झालं होतं; असं म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. गणेशोत्सवात वाटवे यांचा गाण्याचा कार्यक्रम असला की, तिथं उभं राहण्यासाठी जागा मिळणं मुश्कील होत असे. शाळेत असताना वाटवे यांचा असाच एक कार्यक्रम मी गर्दीत दोन तास उभा राहून ऐकल्याचं मला स्मरतं. सुशिक्षित मध्यमवर्गीय श्रोत्यांना वाटव्यांनी भारून टाकलं होतं

कुठलाही कलावंत यशस्वी झाला की कळत-नकळत त्यांच्या शैलीची एक चाकोरी तयार होऊ लागते. अपयशामुळं सगळेच कलावंत अस्वस्थ होतात. पण यशामुळं अस्वस्थ होऊन स्वतःच निर्माण केलेली कोंडी स्वतःच फोडायला उद्युक्त होणारे कलावंत फार थोडे असतात. दुसरं असं की, अशी कोंडी फोडण्याचा प्रयत्न करणंही कलावंतांना धोकयाच वाटू लागत याचं कारण असं की, त्यांच्या कलेला आश्रय देणाऱ्या श्रोत्यांना त्यांच्या विशिष्ट शैलीच्या रचनांची, गाण्याच्या पद्धतीची सवय लागलेली असते. तंबाखू खाणाऱ्याला एका विशिष्ट छापाच्या तंबाखूखेरीज अन्य तंबाखू चालत नाही, तसंच या संगीताच्या आस्वादाचं होऊन बसतं! लोकांना अशी सवयीची झालेली धाटणी आपण बदलली तर आपले आश्रयाला श्रोते आपल्यापासून दूर जातील. इतकचं नव्हे तर आपली सही सही नक्कल करणाऱ्यांना ते आश्रय देतील. अशी भीती कलावंताना वाटू लागते. आणि एका अदृश्य दडपणाखाली ते स्वतःचंच यशस्वी अनुकरण करणं पसंत करतो.

# शतकोत्तरी शोकांतिका

(1)

राम गणेश गडकरी.

राम गणेश गडकरी - आजच्या काळात बघायचे झाले तर संभाजी ब्रिगेडने मागच्या वर्षी पुण्यात ज्यांचा पुतळा फोडला ते .... त्यामुळे असे एक नाटककार होऊन गेले याची नव्याने लोकांना माहिती झाली. ठाण्यात गडकरी रंगायतनला लोक जाताना तेव्हाही ती नाट्यमहालाची एक वस्तू आहे एवढंच लोकांना माहिती असतं. मग ते 'राम गणेश गडाकरी रंगायतन' आहे की, 'नितीन गडकरी रंगायतन' आहे असे एखाद्याला वाटले तर फार आश्चर्य वाटायला नको इतपत राम गणेश गडकरींबद्दल जाणीव असण्याची वानवा आहे. हे दुर्दैव आहे. गडकरी नक्की कोण होते ? कसे होते ? याची सामान्य लोकांना फार सविस्तर माहिती नाही. नाट्य क्षेत्रातील लोक विचारात घेतले तरी, गडकरी हे नाट्य नाटककार होते, त्यांनी 'एकच प्याला' नाटक लिहिले एवढी जुजबी माहिती असते.

23 जानेवारी २०१८ पासून ज्येष्ठ नाटककार राम गणेश गडकरी यांचे स्मृतिशताब्दी वर्ष सुरु होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या नाट्यकारकिर्दिचा विश्लेषक आढावा...

राम गणेश गडकरी यांचा जन्म २६ मे १८८५ रोजी गुजरातमधील नवसारी येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षणही गुजरातमधेच झाले. त्यामुळेच गडकरींना गुजराती भाषा उत्तम अवगत होती. ते पुण्यात आले तेव्हा हाती पैसे नाहीत अशी परिस्थिती होती. तरीही त्यांनी काबाडकष्ट करून फर्ग्युसन कॉलेजमधून कला शाखेत पदवी मिळवली. त्यावेळी त्यांना नाटकांचा ओढा होता. शिडशिडीत शरीरयष्टी, सडपातळ बांधा आणि मितभाषी असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. एखादया नाट्यसंस्थेत काम करावं अशी त्यांची इच्छा होती पण त्यांना हवं तसं

काम मिळालं नसावं. कोणत्याही तऱ्हेने नाट्यसंस्थेशी संबंधित रहाता येईल. म्हणून त्यांनी किर्लोस्कर नाटक कंपनीत डोअर कीपर म्हणून काम स्वीकारले. प्रचंड विजिगिषु वृत्ती असलेला हा माणूस. त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या होत्या. आणि घरात अठरा विश्व दारिद्र्य. पण भाषेवर असलेलं प्रेम त्यांना ~~क~~ शांत बसू देत नव्हतं. त्यांनी अनेक कविता केल्या, नाटिका लिहिल्या. त्यांना सतत काहीतरी स्फुरायचं. वय कमी आणि लिखाणामध्ये सामाजिक रुढी - परंपरा याबद्दलची टीका यामुळे संकोच वाटला असावा म्हणून ते 'सवाई नाटक्या', 'बालकराम' या नावानं लिहायचे. त्यांचा अतिशय जिवाभावाचा धाकटा भाऊ गोविंद प्लेगच्या साथीत गेल्यामुळे त्याच्या स्मरणार्थ ते गोविंदाग्रज या नावाने कविता करायचे.

किर्लोस्कर नाटक कंपनीत असताना त्यांना खूप अवहेलना सहन करावी लागली. नाटक कंपनीत तालमी करणाऱ्या कलाकारांच्या चुका गडकरी दाखवून दयाचे. डोअर कीपर चुका काढतो, अशी तक्रार वरिष्ठ कलाकारांनी गो. ब. देवलांकडे केली. देवलांनी गडकरींच्या नकळत एकदा त्यांचे 'शिकवणे' पाहिले व "उदयापासून गदय शिकविण्याचे काम हाच मुलगा करेल." असे जाहीर केले. हे ऐकून तर वरिष्ठ कलाकारांना धक्काच बसला. ते गेले होते तक्रार करायला आणि झालं उलट. खुद्द देवलांनी त्या डोअर कीपरचं कौतुक करावं, हे पाहून इतर कलाकारांच्या मनात असूया निर्माण झाली. त्यांची खिल्ली उडवायच्या उद्देशाने गडकरींना ते 'मास्तर' म्हणून चिडवू लागले. 'गडकरी मास्तर' हे उपहासाने चिकटलेले नावच पुढे अजरामर

FOR EDUCATIONAL USE

झालं. वैयक्तिक आयुष्यात मात्र गडकरींनी अनेक हालअपेष्टा, मानहानी, अपमान, अवहेलनेचे प्रसंग सोसले. त्यावेळी शंकरराव मुजुमदार किर्लोस्कर कंपनीचे मालक होते. ते तर गडकऱ्यांना पगार देतानाही, "तुला कशाला लागतोय पगार? काडीविडीलाच ना? मग या काड्याविड्याच घे." असे म्हणून विड्यांची बंडलं गडकरी-वर फेकायचे. एकदा मात्र रागाच्या भरात गडकरींनी किर्लोस्कर कंपनी सोडली. त्याला कारणही तसेच झाले. गडकरी आंघोळीसाठी गेले तेव्हा तिथं घंगाळ्यात आधीपासूनच गरम पाणी ठेवलं होतं. त्यांनी ते पाणी घेतलं. तेवढ्यात त्या नाटक संचातील प्रमुख स्त्री पार्टी नट तेथे आला म्हणाला, "मी माझ्यासाठी गरम पाणी काढले होते. तुझी लायकी तरी आहे का गरम पाण्याने आंघोळ करायची?" असे बोलून त्यानं गडकरींना न्हाणीघ-रातून बाहेर काढलं. ही गोष्ट त्यांना खूपच लागली. त्याक्षणी त्यांनी कंपनी सोडत असल्याचं जाहीर केलं आणि "परत जर मी कधी या कंपनीत आलो तर नाटककार म्हणूनच येईन" असंही ठणकावून सांगितलं.

त्यावेळी खाडिलकरांचे 'कीचकवध' नाटक प्रचंड विरोध झाल्यामुळे बंद पाडण्यात आले होते. त्या नाटकावरून हलकल्लोळ माजला होता. गडकरींना वाटले की, आता आपण नाटक लिहायला पाहिजे. म्हणून मग त्यांनी 'गर्वनिर्वाण' (१९११) नाटक लिहिले. तेव्हाचे ज्येष्ठ नट गणपतराव जोशी यांनी त्या नाटकाची तारीफ कृ. प्र. खाडिलकरांकडे केली. त्यांच्या शब्दाखातर खाडिलकरांनी ते वाचलं आणि परत किर्लोस्कर नाटक कंपनीलाच त्यांनी हे नाटक करण्याविषयी सुचवलं. ज्याला एकेकाळी हिणवले होते, त्याच्या नाटकाची तारीफ खुद्द खाडिलकरांनी केली

म्हटल्यावर मुजुमदारांनी ते नाटक घ्यायचं ठरवलं. त्यावेळी गडकरी नागपूरला होते. मुजुमदारांनी ते नाटक त्यांच्याकडून घेतलं आणि ते रेल्वेने मुंबईला आले. मात्र, त्या नाटका-च पुढे काहीच झालं नाही. काही महिन्यांनी त्यांनी गडकरींना पत्र लिहून ट्रेनच्या प्रवासात नाटकाची संहिता गहाळ झाल्याचं कळवल त्यांची माफी मागितली. आश्चर्याची बाब म्हणजे गडकरींनी ते नाटक पुन्हा एक टाकी जसंच्या तसं लिहून काढलं. काय प्रगल्भता होती त्या माणसाची आणि वय ? जेमतेम विशीत. त्या नाटकांच्या तालमी सुरू झाल्या पण कंपनीतील इतर कलाकारांना अजूनही हे 'डोअर कीपर' चे नाटक पचनी पडत नव्हतं. शेवटी गडकरींनी ते नाटक काढून घेतलं. त्यानंतर दुसऱ्या एका नाटक कंपनीने ते आणायचं ठरवलं. पण पहिल्या प्रयोगा-च्या आदल्या रात्री कलाकारांमध्ये काहीतरी वाद झाले आणि नाटकाचा प्रयोगच रद्द झाला. त्या नाटकाने रंगभूमीचा पडदा बघितलाच नाही आणि त्यांच्या ह्यात्तीत परत ते नाटक कधीच होऊ शकलं नाही. पण नाट्यलेखनाची प्रतिभा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. ऐन पंचविशीत त्यांनी 'पुण्यप्रभाव', 'प्रेम संन्यास' ही नाटक लिहिली. ही नाटके सादर होतानाही त्यांना अनेक सायास सोसावे लागले. पण एक अवलिया नाटककार रंगभूमीवर आलाय याची रंगभूमीने दखल घेतली आहे.

या सगळ्या चांगल्या - वाईट दिवसात खाडिलकरांनी गडकऱ्यांना खूप पाठिंबा दिला. गडकरींनाही त्यांच्याविषयी खूप प्रेम आणि आदर होता. नंतर त्यांच्या इतर नाटकांचे प्रयोग झाले. पण गडकरींना हवे तसे पैसे आयुष्यात कधीच मिळाले नाहीत. तरीही ते नाटक लिहित होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नाटकांशी त्यांच्या नाटकांशी तुलना

होऊ लागली. त्यांच्या नाटकांवर अनेक विवादही झाले, पण सगळ्या कसोट्यांवर गडकरींची नाटक श्रेष्ठ ठरली. 'एकच प्याला' किर्लोस्कर' कंपनीसाठी त्यांनी लिहिले. त्यातील सिंधूची भूमिका तर बालगंधर्वांची ओळख बनली होती.

'लग्नाचा बाजार' हा शब्द आज आपण सर्रास वापरतो, पण हा शब्द गडकरींनी आपल्याला दिलेला आहे. 'ठकीचं लग्नं' हा तर विनोदी मराठी साहित्यातील मानदंड आहे.

पुढे किर्लोस्कर कंपनीतून फुटून बाहेर पडलेले सगळे तरुण कलाकार गडकरींच्या भरवशावर एकत्र आले आणि त्यांनी बळवंत नाटक मंडळी काढली. भूगोल, खगोलविज्ञान, ज्योतिषशास्त्र, आयुर्विज्ञान, गुजराती, संस्कृत, इंग्रजी या सगळ्या विषयांचा गडकरींचा अभ्यास होता आणि त्याचे संदर्भ त्यांच्या नाटकात वारंवार येतात. त्याकाळी सगळी व्यावसायिक नाटक चार ते पाच तासांची असायची. त्यावेळी गडकरींनी नाट्य संहितेचे अनेक वेगवेगळे प्रयोग लिहून ठेवले; त्यात दीड पानी नाटकमाला, लहान मुलांची नाटकं, एकांकिका, लघु नाटिका असे अनेक प्रकार त्यांनी हाताळले. त्यावेळेला हे नाट्य साहित्य मंचावर येण्याची शक्यता नसावी पण प्रायोगिक रंगभूमीचे मूळ तिथेच रोवचं गेलं.

गडकरी हे दारुडे होते. हा समज फार नालायक पद्धतीने पसरवला गेला. गडकरी दारुडे नव्हते. ते एखाद-दुसरा पेग घ्यायचे आणि घरी जाताना पूर्ण दारू ओकून मग घरात जायचे, याचेही अनेक संदर्भ आहेत. ते म्हणायचे, "दारू त्या क्षणापुरती मी प्यायलो असलो तरी दारूच्या अंमल घेऊन मी झोपू शकत नाही. दारूच्या अंमलाखाली झोपणे ही संकल्पनाच मला मान्य नाही, म्हणून

मी चित्तशुध्दी करून मगच झोपतो." गडकरींना कुठेही आसक्ती नव्हती हे यावरून स्पष्ट होतं.

बळवंत नाटक कंपनीची स्थापना केल्यावर ते 'राज्यसंन्यास' नाटक लिहित होते. त्यांच्या लिखाणाच्या पध्दतीनुसार अधले-मधले प्रवेश त्यांनी लिहून ठेवले होते पण अजून ते नाटक अपूर्ण होतं. 'राजसंन्यास'ची कल्पना त्यांनी बळवंत नाटक कंपनीला ऐकवली तेव्हा, ते खूप खर्चिक वाटल्याने कंपनीनं ऐकवली तेव्हा, ते खूप खर्चिक वाटल्याने कंपनीनं त्यांच्याकडे खर्चाने स्वस्त होईल अशा नाटकाची मागणी केली. मग त्यांनी 'भावबंधन' नाटक लिहायला घेतले. त्याचवेळी त्यांचं आजारपण वाढलं होतं. त्यांना क्षयाचा खूप त्रास व्हायचा. त्यांनी स्वत:ची पत्रिका मांडली आणि त्यांना कळलं कि आता आपण फार दिवस राहणार नाही. 'भावबंधन' लिहून झालं. शेवटच्या पानावर त्यांनी 'समाप्त' असं लिहिलं. आणि पदरी बाळगलेल्या पांडू नावाच्या मुलाला त्यांनी 'राज्य संन्यास'चे कागद डेस्कवर ठेवायला सांगितले. पाच मिनिटे झोपतो सांगून ते जे झोपले ... ते परत कधी उठलेच नाहीत ... आणि 'राजसंन्यास' अपुरे राहिले ते कायमचेच. गडकरी गेले.

गडकरींचा शेक्सपियरच्या नाटकांचा गाढा अभ्यास होता आणि त्याच्यावर अगाध श्रध्दाही. शेक्सपियरने ३६ नाटके लिहिली तर आपल्या हातून किमान १८ तरी नाटके लिहून व्हावीत अशी त्यांची इच्छा होती.

'भावबंधन' नाटक जेव्हा रंगभूमीवर आले तेव्हा त्या नाटकान अक्षरश: कहर केला. तिकिटाचे दर चार आणे, आठ आणे, एक रूपया, दोन रूपये व तीन रूपये असे होते. सर्वात जास्त किमतीचं

तिकीट तीन रुपये असताना नाटकानं पाच हजार रुपयांचे बुकिंग घेतले होते. उभ्या हयातील त्यांना कधी पैसे बघायला मिळाले नाहीत, ते या नाटकाने त्यांना मिळाले असते पण माणूस दारिद्र्यातच गेला आणि तेसुद्धा ऐन तारुण्यात...

त्यावेळी फक्त बुधवारी व शनिवार - रविवारी रात्री नाटकांचे प्रयोग व्हायचे. कंपनीने दुपारी चार वाजता गडकरींचं नाटक लावायचं ठरवलं. पण चार वाजता नाटकाला कोण येणार? मात्र नाटकाची तारीख जाहीर झाली आणि तिकिटांसाठी लांबच लांब रांगा लागल्या. दुपारी चारचा प्रयोग ही गडकऱ्यांमुळे सुरू झालेली प्रथा आहे. मग 'राजसंन्यास' चा प्रयोग ठरला, पण पुन्हा वेळेची अडचण... म्हणून मग सकाळी ११ वाजता प्रयोग करायचे ठरले आणि तेव्हा-पासून सकाळी ११ चे प्रयोग सुरु झाले. रंगभूमीशी संबंधित अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्याची सुरुवा-त गडकरींमुळे झाली.

त्यांच्या लिखाणाने नंतर अनेक नाट्यसंस्था गर्भश्रीमंत झाल्या. भारतीय रंगभूमीची परंपरा ही सुखां-तिकेची असताना गडकरींनी नाटकांतून शोकांतिका मांडल्या. या नुसत्या शोकांतिका नव्हत्या तर जगण्याची पाच तत्व त्यांनी त्यांच्या पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन, प्रेमसंन्यास आणि राजसंन्यास या नाटकातून मांडली. आयुष्याचे अनेक आयाम, अनेक पात्र, चित्रविचित्र संकल्पना त्यांनी लिखाणातून मांडल्या. आयुष्याच्या बौद्धिक, मानसिक व विनोदी परामर्श घेणारी त्यांची भाषा आतिशय प्रगल्भ होती. त्याकाळी त्यांचा इतका दबदबा निर्माण झाला होता की तत्कालीन नाटक-करांना त्यांची भीती वाटायची. जगण्याची असोशी

असलेला हा माणूस ऐन तारुण्यातच गेला. त्यांनी किती विपुल लिखाण केलं याचा प्रत्यय समग्र गडकरी वाचताना येतो. त्यांच्या नाटकांचा अभ्यास करायचा सोडून आजही जातीचे घाणेरडे राजकारण करून त्यांची अवहेलना केली जाते हीच खरी शतकोत्तरी शोकांतिका आहे.

FOR EDUCATIONAL USE

# 'एकच प्याला'... शंभर वर्षांचा !

'एकच प्याला' हे नाटक शंभर वर्षांनंतरही लोकांच्या लक्षात राहते म्हणजे काय होते? एखादे नाटक लोकप्रिय, 'क्लासिक' बनते की विशिष्ट समाज ते बनवतो? नाटक त्यातल्या गाण्यांसाठी, ती गाणाऱ्या अव्वल नटासाठी लक्षात राहते की त्यातल्या सकसपणाच्या कसोटीवर लक्षात राहते? 'एकच प्याला'च्या शताब्दीनिमित्त या मुद्द्यांचाही परामर्ष घेणे गरजेचे आहे.

बालगंधर्वांच्या रंगभूमीवरल्या कारकीर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'रत्नाकर' मासिकाने १९३१ मधल्या जुलैच्या अंक 'गंधर्व अंक' काढला होता. त्यानिमित्ताने 'बालगंधर्वांची सर्वोत्कृष्ट भूमिका कोणती?' असा प्रश्न वाचकांना त्यांच्या 'एकच प्याला' मधल्या सिंधूला सर्वाधिक पसंती दिली होती. नंतरच्या काळातही कितीतरी थोरामोठ्यांनी 'एकच प्याला' केलं, त्यातल्या वेगवेगळ्या भूमिका वठवल्या आणि त्याबद्दल लिहिलं. यात चित्तरंजन कोल्हटकर, शरद तळवलकर, डॉ. श्रीराम लागू यांच्यापासून ते मोहन गोखलेंनाही 'एकच प्याला' करायचे होते, असे माझ्या एका मैत्रिणीकडून कळले. याशिवाय राज्य नाट्यस्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा आणि पारंपारिक मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात दारू पिण्यातून होणाऱ्या नीती-अनीतीबद्दलच्या एवढ्या चर्चांतून 'एकच प्याला'ची चर्चा होऊन दारू पिण्या-विषयीचा हेटाळणीयुक्त आणि सुधारकी ढोंगी सूर वेळोवेळी निघतच असतो. मग असं लक्षात येतं, की

'एकच प्याला' हे एक नावाजलेलं नाटकच नाही, तर विशिष्ट मूल्यधारणा असणाऱ्या वर्तुळांमध्ये फिरणारे एक मिथकही आहे.

'एकच प्याला'ची आजच्या काळाच्या नजरेतून भेट घेण्याची संधी पुण्याच्या 'नाटक कंपनी' या नाट्य-संस्थेमुळे मला मिळाली. दिग्दर्शक आलोक राजवाडे आणि ओंकार गोवर्धन यांच्याबरोबर विचार करत आकाराला आलं 'नाटक कंपनी' निमित्त 'सिंधु, सुधाकर, रम आणि इतर' हे माझं वॉटरमार्क प्रकाशनाने प्रकाशित केलेलं नाटक. 'एकच प्याला' किती ग्रेट आहे किंवा त्यात काय कमी आहे, या चर्चेपेक्षा महाराष्ट्रातल्या एका संस्कृती समाजाच्या अवस्थेच्या आणि चलनवलनाच्या मागोवा घेत आजच्या काळात 'एकच प्याला' कडे बघण्याचा प्रयत्न मी माझ्या या नाट्यलेखनातून केला. आजच्या काळातील विवाह- कुटुंबसंस्थेची बदलती रूपे, स्त्री- पुरुषांमधले गुंतागुंतीचे नातेसंबंध, जात- धर्माच्या अंगावर येणाऱ्या भिंती, व्यक्तिस्वातंत्र्याचा होणारा संकोच आणि कलारूपांची नाविन्यपूर्ण रूपे या पार्श्वभूमीवर 'सिंधु, सुधाकर, रम आणि इतर' या नाटकाची उभारणी झाली. यानिमित्ताने राम गणेश गडकरी नव्याने समोर आले. यांच्याबरोबरीने देवल, कोल्हटकर, खाडिलकरही आले आणि तो वेगळा काळही आला. 'एकच प्याला'त लिहिलंय तसं 'आकाशातील नक्षत्रांच्या शर्यतींच्या, आर्थिक- सामाजिक- राजकीय घुसळणींच्या आणि देवाणघेवाणीचा हा काळ 'एकच प्याला' आले म्हणजे टिळकयुग संपेपर्यंतचा १९२० पर्यंतचा

काळ आला: सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य, सनातनी आणि पुरोगामी ब्राह्मण्य, ब्राह्मणी, अब्राह्मणी चळवळी, नैतिकतेच्या बदलत्या कल्पना, बालविधवा विवाह, स्त्रियांचे शिक्षण, पुरुषी वर्चस्व, धर्म आणि स्त्री-पुरुष नाते, शारदा कायदा, राष्ट्रवाद, शेक्सपीअर, कालिदास, शोकांतिका, संगीत नाटक, नाटक कंपन्यांची भरभराट होत होत त्यांचे कर्जबाजारी होणे असे सारे आले. मधल्या काळात मूकपट-बोलपट आले. शिवाय मराठी नाटक पाहणाऱ्यांच्या मनावर प्रभाव टाकणारे 'बालगंधर्व' युग बहरले तेही याच काळात.

'भुलाबी कोडे' टाकण्याबरोबर 'स्मशानातले गाणे' आणि प्रसिद्ध असे 'श्री महाराष्ट्र गीत' लिहिणारे राम गणेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज उर्फ बाळकराम हे प्रमाण मराठी भाषेतून वाचकांच्या मनाच्या खोलवर जाऊन ठाव घेणाऱ्या साहित्यनिर्मितीचे कर्ते. भाषेच्या अभिमान बाळगणाऱ्यांसाठी निश्चितच नवं काही शिकविणारा, भारावून टाकणारा विसाव्या शतकातला पहिल्या काही दशकांतला हा काळ. काही लोक भेटायला गेल्यावर मकमेकांना मिठाई किंवा इतर काही भेटवस्तू देतात. इथे राम गणेश गडकरी गो. ब. देवलांना भेटायला गेल्यावर 'वंदन नाट्यमिलिंदा गोविंदा लव पदारविंदाना' या ओळीने सुरू होणाऱ्या आर्या त्यांनी भेट केली. मकमेकांचे जिगरी दोस्त असलेले गडकरी आणि बालकवी मकमेकांना न कळविता आपल्या कवितेचा विषय निवडत. पुढे मकमेकांच्या कवितेला प्रतिसाद देत आपापल्या कविता लिहीत. असा हा काल आणि राम गणेश गडकरी वेगवेगळ्या काळात समोर येत राहतात. यावेळचे निमित्त... 'मकच प्याला'! अवघ्या चौतीस वर्षांचं

आयुष्य लाभलेल्या राम गणेश गडकऱ्यांची 'प्रेमसंन्यास' (१९१३), 'पुण्यप्रभाव' (१९१७), 'एकच प्याला' (१९१९), 'भावबंधन' (१९20) व राजसंन्यास' (१९22 अपूर्ण) एवढीच नाट्यलेखन कारकीर्द (त्यांनी अजून एक नाटक लिहिलेले आहे. अशी नोंद आहे. परंतु मी ते वाचलेलं नाही.) याचबरोबरीने 'गोविंदाग्रज' या नावाने लिहिलेला 'वाग्वैजयंती (१९२१) हा कवितासंग्रह आणि 'संपूर्ण बाळकराम' (१९२५) या नावाचा त्यांचा विनोदी लेखसंग्रह प्रकाशित आहे. १९६२ मध्ये 'अप्रकाशित गडकरी' या नावाने प्रल्हाद केशव अत्रे यांनी गडकऱ्यांच्या उर्वरित लेखनाचे संपादन केले आहे. शिवाय किर्लोस्कर नाटक मंडळीत सुरूवातीला गडकऱ्यांनी डोअर-कीपर म्हणून काम केलेले. एवढ्या नाट्यलेखन कारकीर्दीवरून त्यांना 'महाराष्ट्राच्या शेक्सपीअर' वगैरे उपमा दिल्या आहेत, हेही वैशिष्ट्यपूर्ण! अतिस्तोम माजवून नानाविध विशेषणांचा अबीर-गुलाल उधळणाऱ्या मराठी समाजात हे काही आश्चर्यजनक नाही. इथे शेक्सपीअरशी तुलना करताना वसाहतवादी वृत्ती तर दिसतेच; पण एकाहून एक सरस अशी नाट्य-रूपभान असणाऱ्या, बहुआयामी नाटके लिहिलेल्या शेक्सपीअरच्या ३७ नाटकांशी चार-साडेचार नाटके लिहिलेल्या नाटककाराची तुलना करण्याचे आततायी धाडस हे गडकऱ्यांच्या प्रखर आणि उग्र लेखणीसारखेच! इथे किती नाटके लिहिली, हा मुद्दा नाही; तर मुद्दा असा आहे, की अशी ढोबळ तुलना न करताही गडकऱ्यांचे महत्त्व किंवा काही असेल ते अधोरेखित करता आले असते. शिवाय एका बाजूला

शेक्सपीअरच्या रंगभानावरोबरच त्याच्या आगेमागे आकारलेल्या पाश्चात्य संस्कृतीतले त्याचे थोरपण समजावून घेत दुसऱ्या बाजूला मराठी संस्कृतीत आकारत गेलेल्या (इतिहासाने नोंदवलेल्या, तसेच आकलेल्या) ज्ञात-अज्ञात सादरीकरणाच्या परंपरा, कलाकार आणि कलाकृतींचाही साकल्याने विचार करता आला असता. मग 'महाराष्ट्राच्या शेक्सपीअर' ही उपमा चपखल आहे का, असाही विचार आपल्याला करता येईल. काही असो; पण 'एकच प्याला' हे नाटक चुचकारते, विचार करायला लावते. नाटक इतके ओपन आहे, की त्यात चांगल्या अभिनेत्याला स्वतः चे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळते.

बालगंधर्वांसारख्या अव्वल गायकाला कोणतेही पौराणिक वा ऐतिहासिक संदर्भ नसलेली 'सिंधु' या पात्राची भूमिका करावीशी वाटली, यावरून हे नाटक त्याकाळी किती महत्त्वाचे असावे याचा अंदाज यावा. पात्रात शिरून त्याचे मनोवकाश समजून घेण्याचे अभिनय तंत्र आत्मसात करून मराठी नाटक उभे करणाऱ्यांना 'एकच प्याला'तील लांबलचक स्वगते, पल्लेदार आणि भावविवश करणारी भाषा जवळची वाटू शकते याचे मला आश्चर्य वाटत नाही. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात नवसुशिक्षित वर्ग नाटक पाहायला येऊ लागला तसे रंगमंचावरील भावप्रकटन व व्यक्तित्वदर्शन या दोन्ही बाबी महत्त्वाच्या मानल्या जाऊ लागल्या. लोकप्रिय आणि व्यवसाय करणाऱ्या नाटक कंपन्यांना नटांना भाषण चांगले करायला येणे महत्त्वाचे वाटू लागले. समकालीन मराठी मध्यमवर्गाला

प्रमाण भाषेचे एक उत्तम मॉडेल 'एकच प्याला' सारख्या नाटकात दिसले.

संगीत नाटकांतील पदे भाराऊन म्हणत, "आमची संगीत नाटक परंपरा थोर' असे म्हणतानाच या नाटकांतील गाणी नाटकाच्या संविधानकात सहज आणि ऑरगॅनिकली येत नसत, हेही दिसत होतं. 'एकच प्याला' हे याचं उत्तम उदाहरण. नाटक गडकऱ्यांनी लिहिले, तर त्यातील पदे त्यांच्या आज्ञेने वि. सी. गुर्जरांनी लिहिली. गुर्जरांनी लिहिलेली पदे किती उत्तम झाली व नाटकात ती किती चपखल बसतात, हा विचार ज्याच्या त्याने करावा. परंतु नाट्य-रूपाचा अभ्यास करणाऱ्याला नाट्यपदांची ही 'ठिगळ' लावण्याची तऱ्हा निश्चितच विचार करायला लावणारी आहे. सिंधूसारख्या मर्यादित आयाम असलेल्या पात्राची भूमिका बालगंधर्वांसारख्या थोर गायकाने वठवली. सिंधूच्या अभिनयासाठी बालगंधर्वांना प्रसिद्धी मिळाली. या नाटकातल्या गाण्यांच्या चाली सुंदराबाई जाधवांनी लावल्या. परंतु सुंदराबाई कोण, कुठल्या, हे फारसं वाचायला मिळत नाही. या नाट्येतिहासातनं गायबच आहेत. लक्षात ठेवले गेलेत ते फक्त बालगंधर्व आणि गडकरी. त्याकाळच्या आणि नंतरच्या नाटकावरल्या लिखाणातून असे दिसून येते की, सिंधू या पात्रापेक्षा सिंधूच्या पदांत नटाला, नाटक कंपनीला आणि नाट्यविश्वाला अधिक रस वाटला आहे. पुढल्या काळात नव्या-जुन्या पिढीने आपापल्या परीने मराठीपणाच्या पोळ्या या गाण्यांवर भाजून घेतल्या. बालगंधर्व कसे गायले, त्यांनी हात कसा पुढे केला, मान कशी वळवली, वगैरेंवर कधी सिनेमावाल्यांनी, तर कधी ऑर्केस्ट्रावाल्यांनी, कधी एकपात्री अभिनय-

वाल्यांनी, तर कधी पहाटेची आणि रात्रीची गाणी गाणाऱ्यांनी आपापल्या परीने कमावले. अर्थात् हे सगळं होत असताना ना. सी. फडके यांनी केलेली कठोर चिकित्सा, प्र. के. अत्रे, रा. शं. वाळिंबे, स. गं. मालशे यांची समीक्षा, डॉ. अशोक दा. रानडे यांनी मांडलेले महाराष्ट्रीय संगीत-चिंतन, पं. वसंतराव देशपांडे या अवलिया गायकाच्या आवाज आणि त्यांनी मांडलेला इतिहास विचार करायला लावणारा आणि नाट्य-इतिहासाच्या अभ्यासाला दिशा देणारा ठरला आहे.

समाजाच्या अभिरुचीवर प्रभाव टाकणारे गडकरी मला वेगळेच मिश्रण वाटत राहिले आहेत. म्हणजे इतक्या भारावून टाकणाऱ्या काळात ते 'केसरी' सारखे वृत्तपत्र चोरून वाचत. 'कीचकवधा' च्या वेळी 'महाराष्ट्र लक्ष्मी' नावाचे 'जहाल' नाटक त्यांनी लिहिले होते. पण 'कीचकवधा' वर घातलेली बंदी पाहून त्यांनी आपले ते नाटक जाळून टाकले होते, अशी नोंद अत्रेंनी ठेवलेली आहे. टिळकांच्या उल्लेख 'प्रेमसंन्यास' मध्ये येत असला तरी स्वातंत्र्य चळवळ वा सामाजिक चळवळी यांबद्दलचे कुठे गडकऱ्यांच्या नाटकात येत नाहीत. 'एकच प्याला' मधले 'रामलाल' हे पात्र तर सरळसरळ राष्ट्रवाद आणि स्त्रीचे पातिव्रत्य यांची सांगड घालत, असे लिहितात त्याप्रमाणे हिंदू समाजामधील पारंपरिक मूल्यांच्या पुरस्कार करताना दिसते. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक

लेखकाने त्याच्या समकालावर वा प्रत्येक घटनांवर प्रतिक्रिया द्यायला हवी किंवा तथाकथित भूमिका घ्यायला हवी. परंतु भवताल कवेत घेऊन आत्मबोध घेणाऱ्यांकडून नवनिर्मिती करणारे सकस साहित्य आकाराला येते, असा साधा विचार मनात ठेवून 'एकच प्याला' हे नाटक अशी साहित्यकृती आहे काय, असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. आता त्याचे 'नाही' हे उत्तर आपल्यापैकी बऱ्याच जणांना ऐकू येऊ शकते.

'एकच प्याला' लिहीत असताना गडकऱ्यांसमोर शेक्सपीअरचे 'हॅम्लेट' नाटक होते असे दिसते. 'एकच प्याला' मध्ये दारूच्या नशेत आपल्या वकिलीसह सर्वच गमावत चाललेल्या सुधाकर आणि त्याची पतिव्रता पत्नी सिंधूची शोकांतिका आहे. दारूच्या नशेत सुधाकार एका क्षणी आपल्या मुलालाही मारतो. पुढे सिंधूचाही मृत्यू होतो आणि सुधाकर आत्महत्या करतो. म्हणायला सुधाकर या पात्राचे थोडे कंगोरे या नाटकात येतात. सिंधू मात्र एकदम पतिव्रता... काही झालं तरी नवऱ्याला आडवे न जाणारी दाखवली आहे. बालगंधर्वांनी अजरामर केलेले 'सिंधू' हे पात्र म्हणजे नवराशरण होताना पुरुषसत्ताक अवस्थेला शरण गेलेले 'पॅसिव्ह' पात्र आहे. तशीच बाकीची पात्रंही पुरुषीपणाची एकही संधी न सोडता वावरणारी. आता कुणी म्हणेल की, 'अहो, हेच तर मांडायचेय. 'एकच प्याला' तून... सिंधूसारख्या बाईची ट्रॅजेडी.' माझ्या 'सिंधू, सुधाकर, रम आणि इतर' मधले ॲपल हे पात्र विचारते: 'आस्सं? जातो, काठी घेतो

आणि दाणदिशी पोराच्या डोक्यात घालतो... अशी ट्रॅजेडी होते? गडकऱ्यांनी 'एकच प्याला' ही ट्रॅजेडी लिहिली किंवा मराठीतील ट्रॅजेडी पुढे नेली, असा दावा केला जात असला तरी निव्वळ दारू पिण्याने होणाऱ्या वाताहतीच्या काही घटनांनी ट्रॅजेडी तयार होत नाही. 'हॅम्लेट'ची ट्रॅजेडी फक्त हॅम्लेट आणि त्याच्या आई-बाबा-काका-कुटुंबापुरती राहत नाही, तर अख्ख्या समाज, सत्ताकारण, नातेसंबंध यांमधल्या परस्पर संघर्षातून 'हॅम्लेट' येतो, म्हणून ती होते. नाट्यावकाश मांडणीसाठी 'एकच प्याला'मध्ये अवकाश मर्यादित दिसतो आणि विचक्षण वाचकाला नाट्यरचनेतला ढिसाळपणा दिसतो.

शंभर वर्षांनंतर नाटक लक्षात राहते म्हणजे काय होते, एखादे नाटक 'लोकप्रिय', 'क्लासिक' बनते, की विशिष्ट समाज ते बनवतो? एखादी कलाकृती आपोआप थोर होते, की वेळोवेळचे इतिहासलेखन तिला थोर करते? एखादे नाटक त्यातल्या गायलेल्या गाण्यांसाठी, गाणे गाणाऱ्या अव्वल नटासाठी लक्षात राहते, की त्यातल्या एकूण सकसपणाच्या कसोटीवर ते लक्षात राहते? अशा काही मुद्द्यांच्या नाटकीय वेध घेत मी 'सिंधू, सुधाकर, रम आणि इतर' हे नाटक लिहिले. ते मला किती जमले, नाटक उभे करणारे कलाकार किती यशस्वी झाले, असे प्रश्न येतीलच. किंबहुना, कुठल्याही मुद्द्यावर स्तोम माजवून माणसं आणि साधनसामग्री छिन्नविछिन्न करणाऱ्या भयग्रस्त समाजात प्रश्न विचारले जाणे, हे मला महत्त्वाचे वाटते.

राम गणेश गडकरी आणि त्यांचे 'एकच प्याला' हे नाटक प्रश्न विचारण्याची संधी देतं, यासाठी मला ते नाटक आपलं वाटतं.

गडकऱ्यांनी आपले 'एकच प्याला' हे तिसरे नाटक १९१७ च्या नोव्हेंबरमध्ये लिहून पुरे केले; तथापि ते नाटक 'गंधर्व नाटक मंडळी' च्या रंगभूमीवर गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर दहा-अकरा महिन्यांनी आले. सदर नाटकाची बरीचशी पदे गडकऱ्यांचे 'बंधुतुल्य' मित्र गुर्जर यांनी लिहिली आणि या नाटकाची 'प्रस्तावना लिहिण्याचे कामसुद्धा त्यांच्याकडेच आले. या प्रस्तावनेत 'एकच प्याला'ची उभारणी गडकऱ्यांनी आपल्या 'खऱ्याखुऱ्या' अनुभवावर केली' असे अतिरिक्त विधान करून गडकरी हे एक अट्टल दारूबाज होते, अशी साऱ्या महाराष्ट्रात त्यांनी त्यांची कारण नसता बदनामी केली; किंबहुना 'एकच प्याला' हे नाटक म्हणजे सुधाकरचे चित्र नसून ते गडकऱ्यांचे स्वतःचेच चरित्र होय, असे म्हणण्यापर्यंत काही लोकांची मजल गेली.

गडकऱ्यांनी मद्यपाननिषेधावर नाटक लिहिण्यासाठी 'मूकनायक' नाटकाचा साचा घेतला, असे भा. वि. वरेरकर म्हणतात. अर्थात गडकऱ्यांच्या आधी मद्यासंबंधाने लिहिलेल्या 'मूकनायक' आणि 'विद्याहरण' या नाटकांवरून याच विषयावर नवीन नाटक लिहिण्याची कल्पना गडकऱ्यांना सुचली नसेल, असे मी म्हणत नाही. परंतु 'एकच प्याला' हे नाव, त्यातील मुख्य तत्त्वज्ञान आणि कथानकाचा साचा यांच्या कल्पनांचा उगम

दुसरीकडे आहे.

'एकच प्याला' हे नाटक गडकऱ्यांना शेक्सपीअरच्या 'ऑथेल्लो' वरून सुचले, असे जर मी सांगितले, तर कोणी त्यावर विश्वास ठेवील काय? पण ती खरी गोष्ट आहे. ऑथेल्लो म्हणजे सुधाकर, डेस्डिमोना म्हणजे सिंधू आयोगा म्हणजे तळीराम आणि एलिमिया म्हणजे गीता ही चार पात्रे डोळ्यांसमोर ठेवून आणि 'संशया' चे रूपांतर मद्यपानात करून ऑथेल्लो' ची आणि 'एकच प्याला' ची जर तुलना केली, तर त्या दोन्ही नाटकांमधील साम्य लक्षात येईल. एवढेच नव्हे, तर 'एकच प्याला' हे नावदेखील गडकऱ्यांना 'ऑथेल्लो' वरूनच सुचलेले आहे.

तुर्की आरमाराचा ऑथेल्लोने पराभव केल्यानंतर त्या विजयाच्या आनंदाने त्याच्या छावणीतले सारे सैनिक आधीच बेहोश होतात आणि मग त्या रात्री काय जल्लोष केला असेल, याची कल्पनाही करता येणार नाही. ऑथेल्लोचा दुय्यम साहाय्यक कॅशियो म्हणून होता. त्याला दारू फार चढे म्हणून त्याने त्या रात्री फक्त 'एकच प्याला' (one cup only) घेतला होता त्याला दारू पाजून बेहोश करण्याच्या उद्देशाने त्या नाटकातला खलपुरुष आयागो त्याला फक्त 'एकच प्याला' आणखी पिण्याचा आग्रह करतो. सारांश माणसाच्या पिण्याची जी ठरावीक मर्यादा असते, तिच्यात आणखी 'एकच प्याला' ची भर पडली, पर तो पशू होतो, ही जी शेक्सपीअरची कल्पना आहे, ती गडकऱ्यांनी सुधाकरच्या तोंडी चौथ्या अंकात वदविली आहे. 'एकच प्याला' चा मूळ सिद्धान्त आणि पात्र चोकट गडकऱ्यांना शेक्सपीअरच्या 'ऑथेल्लो' वरून सुचली असली,

तरी 'एकच प्याला'चे मूळ कथानक गडकऱ्यांनी ह. ना. आपटे यांच्या 'अल्प चुकीचे घोर परिणाम' या दीर्घ-कथेवरून घेतलेले असले पाहिजे, याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

'एकच प्याला' नाटकात मरणोन्मुख तळीरामला एकाच वेळी वैद्याने आणि डॉक्टरने तपासण्याची जी विनोदी घटना गडकऱ्यांनी चितारली आहे, ती त्यांनी फ्रेंच नाटककार मोलियरच्या 'ला मूर मेडेसिन' ('प्रेम हाच खरा वैद्य') या नाटकाच्या दुसऱ्या अंकातल्या चौथ्या प्रवेशामधून घेतलेली आहे. एवढे सगळे सांगून झाले, तरी 'एकच प्याला' हे नाटक केवळ गडकऱ्यांच्या अलौकिक आणि देदीप्यमान प्रतिभेचा स्वतंत्र विलास आहे, यात काय शंका?

'प्रेमसंन्यास' आणि 'पुण्यप्रभाव' या दोन नाटकांपेक्षा तंत्राच्या, भाषेच्या नि परिणामकारकतेच्या दृष्टीने 'एकच प्याला' हे नाटक सर्वस्वी वेगळे आणि वरचढ आहे. 'एकच प्याला' या नुसत्या नावानेच या नाटकाची लढाई निम्मी जिंकलेली आहे. इतके सूचक, प्रभावी नि सुंदर नाव कोणत्याही मराठी नाटकाला यापूर्वी मिळालेले नव्हते. 'एकच प्याला' हे नाव उच्चारताच सर्व जगाचा नाश करणारा तो दारूचा राक्षसी एकच प्याला आपल्या डोळ्यांपुढे उभा राहतो आणि नाटकाच्या स्वरूपाची प्रेक्षकांना तात्काळ कल्पना येते. 'प्रेमसंन्यास' नि 'पुण्यप्रभाव'ची भाषा, काही म्हटले तरी नटवी, कृत्रिम आणि दीर्घसूत्री होती. संवाद लांबलचक आणि कंटाळवाणे होते; पण

त्याचा लवलेशाही 'एकच प्याला'त कोठे आढळणार नाही. मराठी भाषेच्या अत्यंत सुबोध, सोज्वळ आणि सात्त्विक स्वरूपाचे या नाटकात सर्वत्र दर्शन होते. दारूच्या व्यसनामुळे सुधाकरसारखा एक बुद्धिमान, तेजस्वी आणि स्वाभिमानी माणूस स्वतःचा, आपल्या साध्वी पत्नीचा आणि आपल्या संसाराचा कसा नाश करून घेतो, ही भयानक गोष्ट गडकऱ्यांनी अत्यंत प्रभावी भाषेतून नि रोमांचकारी घटनांमधून प्रेक्षकांना विलक्षण परिणामकारक रीतीने सांगितलेली आहे. ती गोष्ट पाहात असताना प्रेक्षकांच्या काळजांना पावलोपावली पीळ पडतो आणि पाहून झाल्यानंतर त्यांचा मेंदू काही काळ तरी सुन्न होतो. प्रेक्षकांच्या भावना ढेचून आणि भरडून काढणारे एवढे प्रभावी नाटक मराठी भाषेत तर दुसरे नाहीच; पण इतर भाषांत असेल की नाही हे ठाऊक नाही. मद्यपानाच्या व्यसनाची अत्यंत मूलभूत आणि शास्त्रीय मीमांसा गडकऱ्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण आणि नाट्यपूर्ण भाषेत या नाटकात केली आहे.

अतिरेक आणि अतिशयोक्ती हा सर्वच रसांचा आधारस्तंभ आहे. त्याखेरीज परिणामकारक रसपरिपोष निर्माण होत नाही. मद्यपानाचे दुष्परिणामच जर रेखाटावयाचे असतील, तर जेवढ्या भडकपणे आणि भीषणपणे ते रेखाटले येतील तेवढा प्रेक्षकांच्या मनावर त्याचा परिणाम खोल होणार. मग त्यासाठी वास्तवता आणि शक्याशक्यता यांचा बळी द्यावा लागला तरी चालेल. 'एकच प्याला'त गडकऱ्यांनी तेच केले आहे. पतीचे व्यसन आणि पत्नीची निष्ठा यांच्या संघर्षातून 'एकच प्याला'चे शोकनाट्य निर्माण होते.

पतीची पराकोटीची व्यसनासक्ती आणि पत्नीची पराकोटीची पतिभक्ती यांच्यातला हा संघर्ष आहे.

दारूचे व्यसन मनुष्याला एकदा लागले, की त्याच्यापायी त्याच्या नि त्याच्या संसाराच्या केवढा भयंकर विध्वंस होतो, एवढे एकच चित्र गडकऱ्यांना जास्तीत जास्त भयानक, चिदारक आणि थरारकरीतीने या नाटकात चितारावयाचे होते. तेवढ्यासाठी त्यांना आवश्यक आणि पोषक असलेला जेवढा काही मालमसाला मिळवता आला मग तो शक्य नसो, असो तो त्यांनी या नाटकामध्ये ठासून भरलेला आहे. एकदा मदिरेने सुधाकराचा कब्जा घेतल्यावर त्याची सनद रद्द होणे, कायमची रद्द होणे, त्याला नोकरी न मिळणे, अठराविश्वे दारिद्र्य हात धुवून मागे लागणे, पत्नीच्या शीलाच्या संशय येणे आणि त्याच्या हातून स्वतःच्या मुलाच्या खून होणे या संकटरूपी सर्व डाकिणी सुधाकरच्या मुसक्या बांधून त्याला धक्के मारीत आणि खेचीत खेचीत आत्महत्येच्या मुक्कामावर नेऊन पोहोचवितात. एवढ्या मोठ्या माणसाचा तो क्रूर अधःपात प्रेक्षकांना आपले श्वास अवरोधून बघावा लागतो. तोही त्यांनी एखादे वेळी बघितलला असता; पण सुधाकरच्या घरादारावरून विध्वंसाचा जो भेसूर रणगाडा फिरू लागतो, त्याच्याखाली सिंधूसारख्या एका निरपराध नि देवतातुल्य साध्वीच्या शरीराचा जो जाहक चुराडा होतो, तो मात्र प्रेक्षकांना बघवत नाही. करुण रसाला त्यामुळे उधाण येते आणि सर्वत्र हुंदक्यांच्या कल्लकल्लोळ उठतो. भीषण रसाच्या नि करुण रसाच्या हा जो मुख्य प्रवाह भरपूर महापूर आलेल्या नदीच्या लोंढ्याप्रमाणे नाटकामधून फुंफाटत जातो, त्याच्या वेग किंवा विस्तार कमी करण्याच्या दृष्टीने गडकऱ्यांनी कोठेही या नाटकात अपप्रयत्न

केलेला नाही, हेच त्याचे सर्वात मोठे यश ! या नाटकाच्या यशाचे सर्वात मोठे सामर्थ्य म्हणजे सुधाकर आणि सिंधू यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण आणि काळजाला हात घालणारे विलक्षण प्रभावी संवाद. या बाबतीत आपल्या इतर नाटकांपेक्षा गडकऱ्यांनी स्वतः वरच येथे मात केलेली आहे.

# गणदेवी - राम गणेश गडकरी यांचे जन्मगाव

मी नवसारीला २०१७ साली गेलो होतो. गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह जेथे केला त्या दांडीला जाण्यासाठी. राम गणेश गडकरी यांचा जन्म नवसारी तालुक्यात झाला होता हे मला माहीत होते. तेही औत्सुक्य होतेच. तेथे बरीच मराठी वस्ती होती. काही प्रमाणात अजूनही आहे, पण ते लोक गुजराथी होऊन गेले आहेत. गडकरी यांचे स्मारक होणार अशी तेव्हा बातमी होती. मी त्याबाबत चौकशी करत फिरलो, पण गडकरी जेथे काही काळ राहत होते. ते घर काही सापडले नाही. एका चौकात गडकरी यांचा पुतळा उभारण्याचा बेत होता असे कळले. त्या चौकात नुसता चौथरा दिसला.

गडकरी यांचा जन्म गुजरातेतील नवसारी तालुक्यात गणदेवी या गावात २६ मे १८८५ रोजी झाला. नवसारी प्रांत हा सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानाचा भाग होता. बडोदा धरून, मेहेसाणा, अमरेली आणि व्दारका हे विस्तारही गायकवाड यांच्या ताब्यात होते. गणदेवीची लोकवस्ती सतरा हजार आहे.

मी गडकरी यांचा जन्म ज्या घरात झाला ते पाहण्यास बिलिमोरा जंक्शनहून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या गणदेवी या गावी गेलो. माझे तेथील मित्र (माझ्या मित्राचे) निखिल यांनी मला ते छोटे हिरवेगार गाव मोटारसायकलवरून (बुलेट) फिरवले. जो रस्ता गडकरी यांच्या घराकडे जातो त्या रस्त्याला त्यांचे नाव आहे. गडकरी हे मराठीत महान नाटककार आणि कवी होऊन गेले हे बऱ्याच गणदेवीकरांना माहित आहे! राम गणेश गडकरी ज्या जागी राहत होते त्या जागी गांडाभाई मुरारभाई पटेल नावाचे गृहस्थ राहतात. ते भेटू शकले नाहीत.

महाराष्ट्र सरकार ते घर गडकरी जन्मशताब्दीच्या वेळी विकत घेऊन स्मारक बनवणार होते असे स्थानिकांनी सांगितले, पण पटेल घर विकत देण्यास तयार झाले नाहीत, त्यामुळे तो बेत बारगळला.

गडकरी यांचे वडील वयाच्या सहाव्या वर्षीच निवर्तले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचा धाकटा भाऊ गोविंदही अकालीच मरण पावला. त्या कौटुंबिक धक्क्यातून सावरताना गडकरी यांचे कुटुंब पुण्याला स्थायिक झाले. गडकरी यांचे शालेय शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व त्यानंतरचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात झाले.

गडकरी महाविद्यालयात शिकत असताना ओळखी ओळखीने 'किर्लोस्कर नाटक मंडळीत' दाखल झाले. एकीकडे कविता व अन्य लेखांसोबतच ते नाट्यलेखनही करत असत. गडकऱ्यांच्या अनेक नाटकांची नावे ही पाच अक्षरी आहेत. त्यांची नाटके हा आजही अनेकांच्या अभ्यासाचा विषय आहे. 'भावबंधन', 'एकच प्याला' यांसारख्या नाटकांची तर आजही एव्हरग्रीन म्हणून जाहिरात केली जाते. 'वेड्यांचा बाजार' आणि 'राजसंन्यास' ही त्यांची नाटके मात्र अपूर्ण राहिली. गडकरी यांचा मराठीचे शेक्सपियर असा सार्थ उल्लेख होतो. त्यांची 'सुधाकर', 'सिंधू', 'तळीराम', 'घनश्याम', 'लतिका' वगैरे पात्रेही अजरामर झाली आहेत. काळ बदलला, खरे तर गडकऱ्यांनी हाताळलेले दारुबंदीसारखे विषयही कालबाह्य झाले, पण गडकऱ्यांची नाटके सदाहरित राहिली याचे श्रेय त्या देवदुर्लभ अशा लेखणीलाच द्यायला हवे.

गणदेवी हे गाव बागायती आहे. सर्वत्र चिकू, केळी आणि नाना प्रकारच्या फळबागा आहेत. तेथील फळे निर्यात होत असल्याने गाव समृद्ध आहे. तेथे सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या 'अमिधारा' फॅक्टरीतून अनेक प्रकारच्या

भाज्या, फळे आणि लोणची प्रक्रिया करून परदेशी पाठवली जातात. 'अमिधारा' नावाने शीतपेयही परदेशी जाते. बुर्ज खलिफाला तेथील रोपवाटिकेतून फुले पाठवली होती. तसेच, आमिर खानही तेथून रोपे मागवतो असे कळले.

गणदेवीला ऐतिहासिक महत्त्व आहे. त्या गावचे लोक हळदीघाटीच्या आणि १८५७ च्या लढाईत सामील झाले होते. तात्या टोपे एकोणीस दिवस त्या गावात राहिले होते असे एकजण सांगत होता. गाव राजकीय बाबतीतही जागरूक आहे. एकदा ठाकोरभाई नायक यांनी गणदेवी विभागातून मोरारजी देसाई यांना निवडणुकीत हरवले होते. 'गणदेवी साखर कारखाना' हा फार जुन्यांपैकी. गावात सगळी कामे सहकारी तत्त्वावर चालतात. पेट्रोलपंपही सहकारी संस्थेचा आहे.

गणदेवीचे 'गडकर' वाचनालय पाहून कोणीही चाट पडेल. ते गडकरी यांच्या जन्माआधी दहा वर्षे स्थापन झाले आहे. गावाला वाचनाचा नाद आहे. इतके नीटनेटके आणि सुस्थितीतील वाचनालय क्वचित पाहण्यास मिळते. ते वाचनालय ई-पुस्तकांनी भरणार आहेत.

गडकऱ्यांचे जन्मघर पाहण्यास म्हणून गेलो आणि नवसारी व गणदेवी या दोन सुसंस्कृत गावांशीही ओळख झाली. गणदेवीत प्रदूषण नाही. ते तेथे श्वास घेताना कळते.

तेथील जानकीआई नावाचे मंदिर हे सीकेपी लोकांचे आराध्य दैवत आहे. महाराष्ट्रातून बरीच मंडळी तेथे दर्शनाला येतात. अनेक सीकेपी कुटुंबे महाराष्ट्रातून गायकवाड संस्थानात दोनशे वर्षांपूर्वी दाखल झाली. काहींनी त्यांच्या हुशारीने संस्थानात हुद्द्यांच्या जागा मिळवल्या. त्यामुळे ते काठेवाडात अमरेली प्रांतात मेहसाणा; तसेच, नवसारी प्रांतात सापडत.

पण त्यांची वस्ती सगळ्यात ठिकाणी कमी आहे असे आढळले.

पूर्वी गणदेवीत दहा-बारा कुटुंब मराठी बोलणारे होते. काही बडोदे, सुरत, वापी गावी नोकरीसाठी गेले. सध्या सूर्यकांत सुर्वे यांचे एकत्र कुटुंब आहे. ते बँक ऑफ बडोदात नोकरी करतात. त्यांना गणदेवी फार आवडते. ते गाव ते सोडणार नाहीत असे म्हणाले.

जमशेटजी नसरवानजी टाटा यांचा जन्म नवसारीला जेथे झाला ते घर 'टाटा सन्स' यांनी जसेच्या तसे जतन केले आहे. तेथे पारशी अग्यारी व सुंदर लायब्ररी आहे. एकेकाळी पारशांची बरीच वस्ती तेथे होती.

— निनेश शिंदे 9323343406

info@thinkmaharashtra.com

(पूर्वप्रसिद्धी - 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम')

८८ ५

# गजानन दिगंबर माडगूळकर - मराठी साहित्य व चित्रपट सृष्टीतील अलौकिक प्रतिभा

कवी, कथा-पटकथा-संवादलेखक, अभिनेते, निर्माते अशा अनेक क्षेत्रांत एकाच वेळी त्यांचा वावर होता. ते म्हणजे गजानन दिगंबर माडगूळकर अर्थात 'गदिमा'. त्यांची समग्र माहिती आता एका क्लिकवर 'गदिमांचे नातू सुमित्र यांनी Gadima.com वर मांडली आहे.

'गदिमा' हे अष्टपैलू कलाकार होतेच, मात्र त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुपेडी होते. त्यांच्या त्या विविध छटा चिमटीत पकडून ठेवणे शक्य नाही. तरीही त्यांची अलौकिक प्रतिभा व कलाविष्कार पुढील पिढ्यांना कळावा, या हेतूने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यांच्या नातवाने काही प्रभावी करायचे ठरवले. ते वर्ष होते १९९८, त्यांचे इंजिनीअरिंग नुकतेच पूर्ण झाले होते. त्यावेळी आजच्यासारखा सोशलमीडिया नव्हता. त्यावेळी मराठीत एक-दोन वेबसाईट होत्या. तेव्हा त्यांनी 'गदिमाडॉटकॉम' ही साईट सुरु केली. तेव्हा इंटरनेटचा विस्तार फार नव्हता. त्यामुळे साईटवरील सर्व तपशिलांचा समावेश असलेली एक सीडी काढली होती, त्यावेळी तिला चांगला प्रतिसाद लाभला होता.

या साईटचे रूप पालटले ते 'गीतरामायणा'च्या सुवर्ण-महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने. एप्रिल २०१४ मध्ये त्याची सुरुवात झाली. त्यावेळी साईटवर 'गीतरामायणाचे एक फेसबुक पेज सुरु केले. त्याला मोठ्या प्रमाणावर व्हिजिटर्स लाभले. तेव्हा गदिमा साईट अपडेट करण्याची कल्पना सुचली. त्या साईटवर गदिमांची सातशे चित्रपटगीते ऐकण्याची व वाचण्याचीही सुविधा आहे. शिर्डी साईबाबांची काकडआरती 'गदिमांच्या लेखणीतून उतरली आहे. त्या काकडआरतीसाठी गदिमांनी 'रामगुलाम' हे टोपणनाव घेतले होते. त्या आरतीला सी. रामचंद्र यांनी चाल लावली आहे. ती आरतीही साईटवर आहे.

गदिमांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता, त्यावेळी त्यांनी जे काव्य रचले ते 'शाहीर बोऱ्या भगवान' या टोपणनावाने प्रसिद्ध आहे. 'फडके-माडगूळकर' जोडीच्या गीतरामायणाची दोन व्हर्जन्स आहेत. पहिले आकाशवाणीवरून प्रसारित झालेले विविध गायकांच्या आवाजातील गीते व दुसऱ्या व्हर्जनमध्ये बाबूजींच्या आवाजातील छप्पन गीते ऐकायला मिळतात.

गदिमांनी पेशवाईवर 'गंगाकाठी' या नावाने काव्यकथा लिहिली होती. अथर्वशीर्षाचे मराठीत रूपांतरही 'गदिमांनी' केले आहे. हे सर्व साईटवर आहे. गदिमांचा उल्लेख कोणी महाकवी असा केला, की ते गमतीने म्हणत असत- "अहो, मी महाकवी नाही, महाकाय कवी आहे! 'जोगिया' या पहिल्या काव्यसंग्रहाच्या मनोगतामध्ये ते म्हणतात, जीवनव्यवसाय म्हणून लेखणीशी अनेकदा बेइमानी करण्याचा प्रसंग आला/येतो. त्या संग्रहातील कविता व्रतस्थपणे केलेली काव्यनिर्मिती आहे म्हणून त्याला 'जोगिया' असे नाव दिले आहे.

गदिमांनी एकशे अठ्ठावन्न मराठी चित्रपटांसाठी कथा-लेखन केले. त्यातील अनेक चित्रपटांच्या कथा-पटकथा व संवादही त्यांच्या लेखणीतून उतरले. त्यांचा संचार केवळ मराठी चित्रसृष्टीतच नव्हता, तर हिंदीतही त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यांच्या कथेवर पंचवीस हिंदी सिनेमांची निर्मिती झाली असून त्यात 'तुफान और दिया', 'दो आँखे बारह हाथ', 'नवरंग', 'आदमी सडक का' यांचा समावेश आहे.

गदिमांच्या अनेक गीतांमध्ये जगण्याचे तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत मांडले. 'इथे फुलांना मरण जन्मता, दगडांना परी चिरंजीविता, बोरी-बाभळी उगाच जगती, चंदन माथी कुठार, अजब तुझे सरकार'... किंवा 'एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे, जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे'...

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

900 7

गदिमांची चिंतनशील वृत्ती यात दिसून येते.

'गदिमां'चा आवाज प्रत्यक्ष ऐकायला मिळणे, हे आता शक्य नाही. 'जोगिया' ही त्यांची आवडती कविता 'जत्रेच्या रात्री' आणि 'पूजास्थान' या कविता खुद्द त्यांच्या आवाजात साईटवर आहेत. पण येथे गणेशोत्सवात केलेले एक तासाचे भाषणही आहे. त्यात गदिमांनी ते कवी कसे झाले, त्यांच्यावर कोणते संस्कार झाले, त्यांची जडणघडण कशी झाली, याचे सविस्तर कथन केले आहे.

जुन्या काळातील कलाकारांची छायाचित्रे मिळणे ही कठीण गोष्ट, पण या साइटवर 'गदिमां'ची तब्बल पाचशे छायाचित्रे पाहता येतात. या छायाचित्रांत घरातले, साहित्यातले, चित्रपटातले व राजकारणातले गदिमा वेगवेगळ्या भूमिकांत दिसतात.

साईटवर गदिमांच्या उपलब्ध पुस्तकांची सूची व ती विकत घेण्यासाठी ऑनलाइन सुविधाही आहेत. गदिमांचा अभ्यास करून त्यांची थोरवी समजत गेली. गदिमांविषयी जिज्ञासा निर्माण झाली. त्यामुळे ही साइट निर्माण झाली असे गदिमांचे नातू सुमित्र म्हणाले होते.

– नितेश शिंदे 9323343406

info@thinkmaharashtra.com

(लेखक 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चे उपसंपादक आहेत.)

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# आठवणीतले 'स्नेहल' स्वर

बाबुजी, गदिमा आणि पुल यांच्या जन्मशताब्दीला आवर्जून सर्वत्र उल्लेख होत असताना संगीतकार स्नेहल भाटकर हे नाव कळत-नकळत अस्फुट राहिले. कभी तनहाईयो मे यूँ हमारी याद आयेगी हे त्यांनी स्वरबद्ध केलेले प्रसिद्ध गीत या गीतातील पहिल्या ओळीतले विधान जणू प्रश्नचिन्ह बनून रसिकांना विचारते आहे, "कभी तनहाईयोमें यूँ हमारी याद आयेगी ?" वासूदेव (स्नेहल) भाटकर यांच्या संगीतमय कामगिरीचे हे ठळक व कौतिके अज्ञात पैलू आहे आणि पहिली ध्वनीमुद्रणे भाटकरांनी केली.

नायक राज कपूर यांना पहिला आवाज स्नेहल भाटकरांनी दिला. विष्णूपंत पागनीसांच्या 'संत तुकाराम' हिंदीत करताना हिंदी गाणी भाटकरांनी गायिली. 'आदि बीजे एक रे, बीज अंकुरके रोप बढ गये' अशी ती गाणी होती.

दाक्षिणात्य गायिका विदुषी सुब्बलक्ष्मी यांचे पहिले 'हिंदुस्तानी' संगीतगुरु स्नेहल भाटकर सुरुवातीला त्या मीरा भजने भाटकरांकडून शिकल्या पण 'मीरा' हा चित्रपट भाटकरांना मिळाला नाही. तरीही प्रचंड हट्ट करुन सुब्बलक्ष्मी यांनी भाटकरांचेच गाणे चित्रपटात ठेवून घेतले. हे गाणे म्हणजे 'पग घुंगरु बांध मीरा नाची रे'

अभिनेत्री नूतनला सहा महिने तालीम देऊन तिला यशस्वी गायिका म्हणून त्यांनी उभे केले. (गाने - ये मेरे हमसफर) स्वतःच्या संगीताव्यतिरिक्त हिंदीत त्यांनी अनिल विश्वास, सी रामचंद्र भरत व्यास आणि के दत्त यांच्या निर्देशनाखालीही गायिलेली आहे.

वासुदेव (भाटकर) - सुधीर (फडके) ही मराठीतील पहिली संगीतकार जोडी (चित्रपट - रुक्मिणी स्वयंवर) मात्र भाटकरांचा हिंदी चित्रपटसृष्टीतला गायक - संगीतकार म्हणून प्रवेश १९४३-४४ साली आलेल्या 'कलियाँ' चित्रपटामधूनच झाला होता.

केदार शर्मा कोलकत्याहून मुंबईला येताना हा तयार चित्रपट घेऊन आले होते. यातली गाणी दोन-दोन मिनिटांची होती. ती तीन मिनिटांची करायचे. मग हे करताना त्यांनी दोन नवी गाणी वाढवली 'कलिया' चे संगीत आणि गायन भाटकरांचे होते.

शास्त्रीय संगीतातल्या गायकांबरोबर त्यांचे घनिष्ट मैत्र होते. सुब्बलक्ष्मीचा उल्लेख वर झालेलाच आहे.

पंडिता केसरबाई केरकर यांनी जी मुक्त ध्वनीमुद्रिका अंतराळात जतन केली आहे. तिच्यासाठी हार्मोनियम वादन स्नेहल भाटकरांनी केलेले आहे.

पं. मल्लिकार्जुन मन्सूर आणि पं. मोगूबाई कुर्डिकर यांनी भाटकरांकडे 'लाईट म्युझिक' गायलेले आहे.

उस्ताद निसार हुसेन खाँ साहेबांना भाटकरांची हार्मोनियम साथ आवडत असे.

हिंदी आणि मराठी चित्रपटांबरोबरीज काही मराठी नाटकांना त्यांनी दिलेले संगीत अजरामर आहे. ('लिलाव' या नाटकात पं. प्रभा अत्रे नायिका होत्या.)

स्नेहल भाटकर संत तुकारामाची भूमिका करायला तयार नसल्यामुळे आचार्य अत्रे यांनी 'तुकाराम' हे नाटक कधीच लिहिले नाही.

'गीतायन' या महाकाव्याचे गायन भाटकर करत होते. या संपूर्ण महाकाव्याच्या अठ्ठावीस हजार ओळी 'चंद्रकांता' या मुक्तच वृत्तात आहेत. त्यांनी त्यातल्या सातशे ओळी स्वरबद्ध केल्या होत्या.

सुरेश भटांच्या मागणीसाठी ते काही काळ गझल गायन करत होते. फडकती भावगी (तुला बघुन) आणि आह्यालिक भावगी (कसे कसे बाई) हा फरक त्यांनी ठसठशीतपणे दाखवला आहे. एक महान भजनी कलावंत 'कभी तनहाइयों में यूँ हमारी याद आयेगी' या चित्रपटातील गाण्यामुळे जगाला ओळख बनून राहिला.

FOR EDUCATIONAL USE

कित्येक गरिबांचे संसार त्यांनी उभे करून दिले हे त्यांचे मोठेपण!